साप्ताहिक

# माणूस

७ जुलै ८४ / दोन रुपये




## अरुण सरनाईक —

आशा काळे यांचा विशेष लेख.

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : चोविसावे

अंक : सहावा

□

७ जुलै १९८४

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :

साप्ताहिक माणूस


१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ

संजय पवार



## मुंबापुरी

### □ सेन्सलेस व्हॉयलन्स

भिवंडीची दंगल शमली हे पाहून आम्हाला हायसे वाटले. आता पत्रकार कॉकटेल पार्टी आणि परिसंवाद भरवायला मोकळे झाले. दिवस सुगीचे सुरू जाहले, ओला चारा... असे आम्ही म्हणत आहोत तोच खेरवाडीला गडबड सुरू झाली. याचे पडसाद कुर्ल्यालाही उमटले. गेल्या आठवड्यात मुंबापुरीत एकूण बहा खून पडले आणि जवळजवळ हजार लोकांना अटक झाली. खेरवाडी, मजासवाडी, नागपाडा, आग्रीपाडा, कामाठीपुरा अशा सर्व ठिकाणी पुन्हा एकदा आर्मी आणली गेली. म्हणजे परत गाडी मूळ पदावर!

या शहराचे दुर्दैव असे आहे की पोलीस आणि आर्मी सोडली तर ही दंगल थांबवायला पुढे येण्याइतके नैतिक धैर्य कोणत्याही पुढाऱ्याकडे नाही!

गेल्या आठवड्यात कुर्ल्याला रात्री खून झाला. त्याच्या निषेधार्थ राष्ट्रीय संजय विचार मंचाने कुर्ल्यात बंदचे आवाहन केले होते आणि यामुळेच येथील वातावरण तंग झाले.

आम्ही कुर्ल्याला जाऊन चौकशी केली तेव्हा समजले की, पोलिसांनी यासंबंधात तीन गुंडांना अटक केली होती. त्यापैकी एका अठरा वर्षांच्या मुलाने गुन्हा कबूलही केला. काहीही कारण नसताना रात्री दारूच्या नशेत त्याच्या हातून हे कृत्य घडले होते. कुर्ला पोलीस स्टेशनवर आम्ही त्याच्याकडून जप्त केलेला सुरादेखील पाहिला. ज्याला आपण सेन्सलेस व्हॉयलन्स म्हणतो असे प्रकार फक्त मुंबापुरीतच घडू शकतात. या खुनामुळे आणि नंतर झालेल्या बंदमुळे कुर्ल्यामधील वातावरण तंग झाले होते आणि त्याचमुळे दुसऱ्या दिवशी आणखी एक खून या भागात पडला. संजय विचार मंचाने या घटनांच्या विचार करायला हवा!

### □ पत्रकारांचा अनुभव

सुप्रसिद्ध ब्रिटिश नाटककार अरनॉल्ड वेस्कर हे एकोणिसशेबहात्तरमध्ये लंडनच्या संडे टाइम्समध्ये तीन आठवडे राहिले. त्यांना पत्रकार ह्या विषयावर नाटक लिहायाचे होते. ब्रिटिश पत्रकारांचा त्यांना जो अनुभव आला त्यावर त्यांनी नाटक लिहिण्याआधी 'जर्नी इन टू जर्नेलिझम' हे पुस्तक लिहिले. हे पुस्तक प्रसिद्ध करायला लेखनस्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या संडे टाइम्सच्या पत्रकारांनीही विरोध केला. सरते शेवटी पुस्तक एकोणिसशेसत्त्याहत्तरमध्ये प्रसिद्ध झाले. या पुस्तकात त्यांनी ब्रिटिश पत्रकारांबद्दल जे मत व्यक्त केले आहे ते येथील पत्रकारांनाही लागू पडते. मासल्यादाखल त्यांचे काही निष्कर्ष आम्ही येथे देत आहोत–

'लिहिताना पत्रकारांसमोर वाचक हे दुसरे पत्रकारच असतात. वाचकांऐवजी ज्यांच्याबरोबर ते खातात–पितात त्यांच्यासाठीच ते लिहितात. हे सगळे करताना वाचकाला नेमके काय पाहिजे ह्याचा कुणालाच पत्ता नसतो. ह्यामुळेच वृत्तपत्रे नेहमी वाचकांच्या मताचा कौल घेत राहतात.'

□

'पत्रकारिता म्हणजे स्वतःच्या दोषांकडे दुर्लक्ष करून दुसऱ्यांचे दोष काढणे. नेमक्या ह्याच कारणामुळे उत्तम पत्रकारांचा आपण कुणी तरी मोठे आहोत वा आपला मानसिक छळ चालला आहे असा भ्रम राहातो.'

□

वृत्तपत्र म्हणजे काय हे भाषांतराऐवजी वेस्कर ह्यांच्या शब्दातच वाचण्यात गंमत आहे.

'People sitting around in offices

lost, that's all a newspaper is, sitting around waiting for ideas to come, wondering what the hell to do next'

□ नजरकैदेत

अमिताभ बच्चन ब्रीच कँडी हॉस्पिटलमधून त्याच्या जुहू येथील घरी परतले हे ऐकून आम्हाला फार हायसे वाटले. त्याना मायस्थेनिया ग्राव्हिस हा स्नायूचा विकार जडला होता. ह्या रोगामुळे त्याना हिंदी चित्रपटात काम करता येणे आता शक्य होणार नाही अशा अफवा पसरल्याने आम्ही फारच हवालदील झालो. आम्हाला तर वाटले आता मनमोहन देसायानी मायस्थेनिया ग्राव्हिसवरच जर पिक्चर काढले तर त्यात नायकाची भूमिका अमिताभ करू शकेल; पण आता ते घरी परतले असून जया बच्चन ह्यांच्या करड्या नजरेखाली त्याच्या प्रकृतीत वेगाने सुधारणा होत आहे.

गेल्या शुक्रवारी रेखाने सिने ब्लिट्झच्या कार्यालयात फोन करून सांगितले की, गुरुवारी रात्री बारा वाजता तिच्या 'ब्ल्यूबर्ड' ह्या घरी तीन अनोळखी माणसानी दारावर थाप मारली. तिने दरवाजा उघडताच या माणसानी आत शिरायचा प्रयत्न केला. बाईंनी ताबडतोब दरवाजा बंद करून वांद्रे पोलीस स्टेशनला फोन केला. झाल्या प्रसंगामुळे त्या इतक्या घाबरल्या की, उरलेली सगळी रात्र त्यानी सी रॉक हॉटेलमध्ये बसून काढली! (आमच्या घरी असे झाले असते तर आम्ही उरलेली सगळी रात्री माळ्यावर बसून काढली असती! असो. आम्ही म्हणजे काही सौंदर्याचे ॲटमबॉंब नाही!)

सिने ब्लिट्झच्या पत्रकाराने रेखाला तिने दरवाजा का उघडला असे विचारताच ती म्हणाली, 'Oh, I thought it was Amitabh Bachhan!'

—म्हणूनच आम्ही तुम्हाला सांगितले की अमिताभ बच्चन ह्यांची प्रकृती सध्या जया बच्चन ह्यांच्या करड्या नजरेखाली सुधारत आहे!

—विष्णू जयदेव

राजधानी दिल्ली

# दारे ठोठावण्याचा मोसम

सुटीमध्ये विद्यापीठात जाताना कसे सुनसान वाटायचे! रखरखीत उन्हामध्ये निःशब्दपणे तापणाऱ्या विद्यापीठाच्या इमारती उन्हाळ्याचा भकासपणा वाढवीत असायच्या. विद्यापीठाच्या सदाबहार वातावरणातले रंग जणू कुणी तरी खरवडून टाकल्यासारखे वाटायचे. ग्रंथालयातल्या रिकाम्यारिकाम्या खुर्च्या वातावरणाचा उदासपणा जास्तच लक्षात आणून द्यायच्या. विद्यापीठाच्या मार्गावरील एरवी ओसंडून वाहणाऱ्या बसेसमध्येही गर्दी नसायची. येताजाता बिनबोभाट बसायला जागा मिळायची आणि उन्हामुळे झापडणाऱ्या डोळ्यानी पेंगत्पेंगत प्रवास आरामात झाला, तरी कसे चुकल्याचुकल्यासारखे वाटायचे.

साधारण महिन्यापूर्वी १२ वीचा निकाल लागला आणि त्यानतर हे वातावरण हळूहळू बदलू लागले. पंधरा दिवसापूर्वी मी विद्यापीठाकडे जाणाऱ्या बसमध्ये पाऊल ठेवले आणि एकदम हा बदल तीव्रतेने जाणवला. कर्फ्यूमध्ये दोन तासांची ढील दिल्यावर रस्त्यातून हिंडताना येतो, तसा हा अनुभव होता. उत्साहाने फुललेल्या, बडबड करणाऱ्या तरुण मुलामुलींनी बस पूर्णपणे भरून गेली होती. खळखळणाऱ्या हास्याची कारंजी ठिकठिकाणी उडत होती. पंजाबच्या कारवाईमुळे शहरात सर्वत्र मळभलेले वातावरण असूनही विद्यापीठाच्या बसमध्ये त्याचा मागमूसही नव्हता. विद्यापीठाच्या परिसरातले वातावरणही उत्साहाच्या नव्या लहरींनी भारलेले होते.

हळूहळू ह्या लहरीची तीव्रता वाढतवाढत गेली आणि आता सध्या तर कॉलेज–प्रवेशाचा मोसम अगदी भरात आलेला आहे. महाराष्ट्रात आता एव्हाना महाविद्यालये सुरूही झाली असतील. इथे मात्र उन्हाळ्याची सुटी १५ जुलैपर्यंत असते. १६ जुलैला शाळा–कॉलेजे उघडतात. त्यामुळे १२ वीचा निकाल लागून महिना होत आला, तरी महाविद्यालयातून प्रवेशाचे फॉर्म्स बऱ्याच उशीरा उपलब्ध होऊ लागले, यंदा जवळजवळ ४८०० विद्यार्थी केवळ दिल्लीमधून बारावी उत्तीर्ण झाले. बाहेरून दिल्लीत येणारे यापेक्षा वेगळेच आणि कॉलेजामध्ये तर जास्तीत जास्त ३००० पर्यंतच विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतात. या वर्षी सगळ्या महाविद्यालयानी सीट्स वाढवल्या, तरी किमान हजार–बाराशे विद्यार्थी तरी असे उरतील की, ज्याना कुठेही प्रवेश मिळणे शक्य होणार नाही!

कॉलेज–प्रवेशाची गर्दी उशीरा सुरू होण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्रवेश-परीक्षा. वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालयात इकडे महाराष्ट्रातल्याप्रमाणे केवळ बारावीच्या गुणावर प्रवेश मिळत नाही. त्यासाठी स्वतंत्र प्रवेशपरीक्षा घेतल्या जातात. शेकडो विद्यार्थी–विद्यार्थिनी आधी या परीक्षाना बसतात आणि मग विज्ञान-शाखेच्या महाविद्यालयाकडे प्रवेशासाठी वळतात.

एका महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा प्रयत्न करायचा आणि तिथे शक्य न झाल्यास दुसऱ्या महाविद्यालयाकडे वळायचे, असे करून भागण्यासारखे नसते. कारण महाविद्यालयीन प्रवेशाला एखाद्या शर्यतीचे स्वरूप आलेले आहे. शर्यतीत जो एकदा मागे पडला, तो संपला. सगळ्या महाविद्यालयाची प्रवेशाचे अर्ज भरण्याची, मुलाखतीची आणि अंतिम निर्णयाची तारीख जवळपास एकाच सुमारास असते. त्यामुळे 'ट्रायल ॲंड एरर मेथड'ला वाव नसतो. त्यावर उपाय म्हणून प्रत्येकजण चारपाच तरी महाविद्यालयामध्ये अर्ज भरून ठेवतो. गोळी लागेल तिथे लागेल. त्यामुळे सध्या 'तुझा माझा प्रवास आहे, कॉलेजापासून कॉलेजकडे'

करीत प्रवेशोत्सुक मुले–मुली ह्या कॉलेज-कडून त्या कॉलेजकडे धावताना आढळत आहेत. काहीजणांचे वैतागमलेले पालकही त्याच्याबरोबर फरपटताना दिसत आहेत. रामजस कॉलेज, हिंदू कॉलेज, सेंट स्टीफन्स कॉलेज, दौलतराम कॉलेज, श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्स, मिरांडा हाउस, खालसा कॉलेज, किरोरीमल कॉलेज आणि हसराज कॉलेज एवढी महाविद्यालये विद्यापीठाच्या परिसरातच असल्यामुळे विद्यापीठाचा अवघा परिसर अशा प्रवेशोत्सुकानी फुलून गेला आहे. प्रत्येकाच्या हातात एकदोन महाविद्यालयांची माहिती–पत्रके फडफडताना दिसत आहेत आणि घोळक्याघोळक्यात गप्पांचे विषयही, आपण कुठल्याकुठल्या महाविद्यालयात अर्ज दाखल केले, आणखी कुठे करणार आहोत, कुठले महाविद्यालय कुठल्या विषयासाठी चांगले, हेच हटकून आहेत. पंजाबची परिस्थिती, आवडत्या नटनटयांची लफडी, विंबल्डन मॅचेस, ऑलिंपिक गेम्स आणि नवीन चित्रपट हे विषय उगीच चवीपुरते मधूनमधून केवळ तोंडी लावले जात आहेत. उत्साह आणि अनिश्चितता यांचे एक मजेदार मिश्रण सगळयाच्या चेहऱ्यांवर दिसून येत आहे.

### विद्यार्थ्यांचे अतोनात लाड

कुठे कुठे प्रवेश–अर्ज केलेत ते एकमेकाना सागताना ज्या कॉलेजांची नावे घेतली जात आहेत, ती ऐकल्यावर आणखी एक गोष्ट लक्षात येते. तीन–चार वर्षांपूर्वीपर्यंत काही विशिष्ट महाविद्यालयांच्या नावाना एक खास प्रतिष्ठा असायची. त्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळणे म्हणजे मोठा बहुमान वाटायचा. आधी त्या महाविद्यालयामध्ये प्रयत्न करणे हे प्रवेशोत्सुक मुला–मुलीचे धोरण असायचे. उदाहरणार्थ मिरांडा हाउस हे केवळ मुलीचे महाविद्यालय. तिथे प्रवेश मिळणे हे प्रत्येक तरुण विद्यार्थिनीचे स्वप्न असायचे. सेंट स्टीफन्स कॉलेज आणि श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्स ही विद्यापीठाच्या परिसरातील महाविद्यालये याच पगतीतली. बारावीच्या गुणवत्ता–यादीमध्ये येणारे विद्यार्थी–विद्यार्थिनी या तिन्हीपैकी कुठल्या तरी महाविद्यालयात हटकून सापडायचे. आता मात्र या तिन्ही महाविद्यालयांबाबत ही 'क्रेझ' उरलेली नाही. याची कारणे अनेक; पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे 'केवळ निष्ठावान ज्ञानोपासनेची केंद्रे' म्हणून या या तीन महाविद्यालयांना जी पिढयानु–पिढयाची प्रतिष्ठा लाभलेली होती, ती आता उरलेली नाही. अतिशय फालतू गोष्टीसाठी मिरांडा हाउसच्या विद्यार्थिनी संप करतात. इतर कुठल्याही महाविद्यालयाप्रमाणे सेंट स्टीफन्सचे प्राध्यापकही आदोलनात सहभागी होतात, श्रीराम कॉलेज ऑफ कॉमर्समध्येही 'बाहेरच्या' शक्ती कार्यप्रवण होताना आढळतात. ही तिन्ही महाविद्यालये आपापल्या ठुवताऱ्यावरून उतरून आता पृथ्वीवर घसरली आहेत. त्याचबरोबर शहरात अन्य भागांमध्ये काही चांगली महाविद्यालये भरभराटीला येत आहेत. त्याच्या नेत्रदीपक प्रगतीचा प्रभाव वाढत आहे. उदाहरणार्थ, दिल्लीच्या दक्षिण भागात राहणाऱ्या बहुतेक मुलींची पहिली निवड आता लेडी श्रीराम कॉलेज ही झालेली आहे. वाणिज्यशाखेमध्ये कालकाजीचे भगतसिह कॉलेज जास्तीत जास्त लोकप्रिय होत आहे. विज्ञानशाखेमध्ये धौलाकुआंचे वेंकटेश्वर कॉलेज जास्त गर्दी खेचत आहे. विद्यापीठाच्या परिसरामध्येच महाविद्यालयीन शैक्षणिक चळवळीचे केंद्र जे एकवटलेले होते, ती स्थिती हळूहळू बदलत आहे. त्यात वाढत्या विद्यार्थीसख्येची भर. मुळात महाविद्यालयात प्रवेश मिळणे हीच अनिश्चित गोष्ट झाल्यावर मिळेल तिथे प्रवेश घेणे हे आद्य कर्तव्य ठरते. त्यामुळे विशिष्ट महाविद्यालयाचे ग्लॅमर पुसट होत जाते. सोयीला महत्त्व देण्याची प्रवृत्ती वाढत जाते.

त्यामुळे कुठल्या तरी महाविद्यालयात एकदाचा प्रवेश मिळाला की ही तरुणपिढी धन्यधन्य होणार आहे. तीन वर्षे मग अनिश्चितता दूर ठेवून एका निश्चित सरळ रेषेत जगण्याची संधी त्याना त्यामुळे मिळणार आहे. आणखीही बरेच काही मिळणार आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी बनणे म्हणजे किती फायदे पदरात पाडून घेणे आहे, हे त्याना हळूहळू कळणार आहे. खरोखर दिल्लीइतके महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लाड बाकी कुठल्याच शहरात होत नसतील! त्यातली सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे बसचा पास. कोणत्याही विद्यार्थ्याला अत्यल्प भाड्यात तीन महिन्यांचा सर्व रूटसचा बसचा पास मिळतो. त्या पासवर दिवसातून कितीही वेळा कोणत्याही बसने कुठूनही कुठेही प्रवास करता येतो. अवाढव्यपणे पसरलेला दिल्लीचा विस्तार लक्षात घेता बसपासची ही सवलत म्हणजे एक वरदानच आहे. आपल्याकडे महाराष्ट्रातही बसपासची सवलत आहे; परंतु तेथे ठराविक बसरूटनेच दिवसातून फक्त एकदाच बसचा प्रवास करता येतो. रोज कडक्टर पास पंच करतो. इथे ती भानगड नाही. खिशात बसपास ठेवा आणि मनसोक्त दिल्लीभर कुठेही कसेही भटका! याखेरीज डी. सी. एम (दिल्ली क्लॉथ मिल्स)-सारख्या चांगल्या गिरणीचे कापड विद्यार्थ्यांना आयडेंटिटी कार्डवर चाळीस टक्के सवलतीत मिळते. दिल्लीच्या सर्व भागातून ठराविक वेळांना विद्यापीठ–परिसर आणि


विनोदी साहित्य निर्माण करणाऱ्या लेखकाची बुद्धिमत्ता असामान्य असावी लागते व वृत्ती चौकस. कल्पकतेचं नैसर्गिक वरदान त्याला असावं लागतं. श्यामच्या या कथा वाचताना या साऱ्या गुणांचा प्रत्यय आपल्याला येत रहातो. –अभिप्राय 'महाराष्ट्र टाइम्स

काही दिवस श्यामचे, काही राधाचे

लेखक : फिरोझ रानडे

मूल्य : २५ रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

विविध महाविद्यालयांसाठी 'युनिव्हर्सिटी स्पेशल' बसेस असतात.

## एजिटेशन्स टर्म

आणि मुख्य म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थी झाल्यावर एक नवी शक्ती प्राप्त झाल्याचा साक्षात्कार होतो. सगळ्या राजकीय पक्षांच्या कार्यक्रमांची मदार विद्यार्थी–वर्गावर असते. त्यामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना दिल्लीच्या सामाजिक आणि राजकीय जीवनात महत्त्वाचे स्थान लाभलेले आहे. एका दृष्टीने या युवाशक्तीला सगळे टरकून असतात. आमच्या घराजवळ सलवान कॉलेज आहे. गुंडगिरीसाठी हे कॉलेज खूप प्रसिद्ध आहे. वर्षातून तीन–चारदा तरी या कॉलेजातील विद्यार्थ्यांचे काही ना काही बिनसते. कधी विद्यार्थ्यांच्या दोन गटांत मारामाऱ्या होतात, कधी महाविद्यालयाविरुद्ध विद्यार्थ्यांची निदर्शने होतात, कधी डी. टी. सी. च्या कंडक्टरशी विद्यार्थ्यांचे भांडण होते. काही तरी निमित्त घडते आणि हे विद्यार्थी रस्त्यावर येतात. त्यांच्या रागाचा तडाखा बसतो डी. टी. सी. च्या बसेसना. दोन–चार बसेसच्या काचा फोडल्या जातात. येणाऱ्या–जाणाऱ्या बसेस अडवून, पॅसेंजर्सना खाली उतरवून, त्या रस्त्यात आडव्या-तिडव्या उभ्या करून रस्ते बंद केले जातात. तास–दीड तास हैदोस घातला जातो. मग पोलीस येतात. रस्ते खुले करतात. विद्यार्थ्यांना पळवून लावतात. हे सगळे गेल्या सहा वर्षांत आमच्या पूर्ण परिचयाचे झाले आहे. संतप्त युवाशक्तीचा हा केवळ एक नमुना. थोड्याफार फरकाने सगळीकडे असेच घडते. गेल्या वर्षी विद्यापीठपरिसरातील खालसा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचे डी. टी. सी. च्या कर्मचाऱ्यांशी भांडण (म्हणजे चक्क मारामारीच) झाले होते. विद्यार्थ्यांनी आमच्या डिपार्टमेंटच्या समोरच एक बस जाळली होती. डी. टी. सी. ने विद्यापीठपरिसरात बस नेण्याच बंद केले होते. जवळजवळ महिनाभर रोज आम्हाला घंटाघरपर्यंत बसने जाऊन तिथून मैलभर चालत जावे लागले होते.

आमच्याकडे काही जण विनोदाने म्हणतात की, दिल्लीमध्ये पहिली टर्म (१६ जुलै ते ३० सप्टेंबर ही 'अॅडमिशन्सची' टर्म असते, दुसरी टर्म (१६ ऑक्टोबर ते २४ डिसेंबर) ही 'अॅजिटेशन्स'ची टर्म असते आणि तिसरी टर्म (७ जानेवारीनंतर) ही 'एक्झॅमिनेशन्स'ची टर्म असते. या सगळ्यातच मधूनमधून काय अभ्यास होईल तो खरा. काही प्राध्यापकांच्या मते, अध्यापनाचा खरा काळ 'झेंडा टू झेंडा' असा असतो. म्हणजे स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजवंदनाला अध्यापनाला सुरुवात होते. तोवर अॅडमिशन्स, इंटरव्ह्यूज, टाइम-टेबल्स वगैरे भानगडी उरकतात; आणि प्रजासत्ताकदिनाच्या ध्वजवंदनाला अध्यापनाची समाप्ती होते. कारण तोवर परीक्षांचे वेध सुरू होतात आणि विद्यार्थी हळूहळू तासाला उपस्थित राहण्याचे बंद करतात!

पण हे आपले उगीच विनोदाखातर. माझा तर अनुभव असा आहे की, दिल्लीचे विद्यार्थी आपल्याकडच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेने अभ्यासात जास्त सिन्सिअर असतात. अर्थात महाविद्यालयीन पातळीवरील विद्यार्थ्यांचा मला अनुभव नाही; पण पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या बाबतीत माझे हे विधान शंभर टक्के खरे आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या एकेका पायरीसाठी मागील परीक्षेत किमान ५५ टक्के गुणांची आवश्यकता हे त्याचे कदाचित कारण असेल. एम. ए. ला ५५ टक्के गुण मिळाल्याशिवाय एम. फिलला प्रवेश नाही आणि ५५ टक्केशिवाय पीएचडीलाही प्रवेश नाही. या कारणामुळे, की अन्य कशामुळे कुणास ठाऊक; पण वर्षभर विविध आंदोलनांत सक्रिय भाग घेऊनही दिल्लीचे विद्यार्थी परीक्षेत नेमका अभ्यास करून दाखवतात!

पण हे सगळे पुढचे रामायण झाले. सध्या तरी महाविद्यालयीन प्रवेशासाठी दारे ठोठावण्याचा मोसम चालू आहे. डॉ. माधुरी शाह यांच्या प्रेरणेने विद्यापीठ अनुदान मंडळाने काही नवीन व्यावसायिक अभ्यासक्रम सुचवलेले आहेत. ते काही महाविद्यालयांनी स्वीकारलेले आहेत; परंतु या नव्या अभ्यासक्रमांच्या स्वरूपाबाबत अजून नेमकी रूपरेषा कुणालाच माहीत नाही. विद्यार्थीवर्गात त्याविषयी प्रचंड कुतूहल आहे; परंतु ज्या महाविद्यालयांनी नवे अभ्यासक्रम घोषित केलेले आहेत, तेथेही त्यांना नीट माहिती पुरविली जात नाही, ही वस्तुस्थिती आहे. एकूण सगळीच दारे सध्या बंद आहेत. ठोठावणी चालू आहे!

—निशिकांत मिरजकर






# कलकत्ता

## क्रंदन करते हे नंदनवन!

● अशोक कृष्णाजी कुलकर्णी ●

**आ**म्ही कलकत्त्याला निघालो होतो...

'कलकत्ता' ही पश्चिम बंगालची राजधानी असली तरी तिला स्वतःचे स्टेशनच नाही. कलकत्त्याला जायचे म्हणजे हावड्याला जायचे. तेथे जाण्यास मुंबईहून 'गीतांजली एक्सप्रेस'सारखी सुपरफास्ट गाडी नाही असं ऐकलं. त्याप्रमाणे आम्ही गीतांजलीनेच कलकत्त्याला जायला निघालो. नवल म्हणजे ऐकलं ते अगदी खरं निघालं. ऐलपैल दोन हजार किलोमीटरच्या प्रवासात फक्त सात–आठ महत्त्वाच्या स्टेशनांवर गाडी थांबली. एरवी गाडी जोरात पळत होती.

खरगपूरजवळ गाडी आली आणि बंगालमधील खेड्यांतील छोटी छोटी तळी, त्यात फुललेली कमळे, जवळच्या मातीच्या झोपड्या, केळी–नारळीच्या झाडांतून लचकत जाणाऱ्या पाऊलवाटा, पाण्याच्या ओहोळावरील छोटेछोटे पूल, पाण्याच्या कळशा घेऊन जाणाऱ्या ग्रामकन्यका अशी सुंदर दृश्ये पाहून मन प्रसन्न झाले. गुरुदेव टागोरांच्या प्रतिभेचा झरा बंगालमधल्या अशाच एखाद्या रम्य खेड्यातून झुळझुळायला लागला असावा आणि शांतिनिकेतनच्या स्वप्नात साकार झाला असावा.

हळूहळू हावडा स्टेशन जवळ येऊ लागलं. खेड्यांतील दृश्यात बदल होऊ लागला. शहरी दृश्ये दिसू लागली. तेवढ्यात सौ. ने मला ढोसले, 'अहो, अहो, ती बस पहा'– सौ. म्हणाली, 'बसमध्ये काय पाहायचंय ?' मी विचारलं.

'अहो, पहा तर खरी !' सौ.

मी अनिच्छेनेच बसकडे पाहिलं. ती बस माणसानी अगदी लदलेली होती. बसच्या आत, दाराशी, टपावर, टपावर चढण्याच्या शिडीवर सर्वत्र माणसे लोंबकळत होती. मेलेल्या झुरळाला प्रचंड संख्येने मुंग्या डसाव्यात तशी माणसे बसला डसली होती. कुठल्याही प्रकारचे नियम, शिस्त न पाळणता बस प्रवाशांना वाहून नेत होती. कलकत्त्याची ही पहिलीच सलामी मनात घर करून राहिली !

हावडा स्टेशन आलं. आम्ही प्लॅटफॉर्मवर उतरलो.

रेल्वेच्या हमालांनी आम्हाला तापवलं आणि त्याचबरोबर साध्या कपड्यातल्या अपरिचित माणसांनी तावलं. आम्ही रेल्वेचे अधिकारी आहोत. तुमच्याकडे आक्षेपार्ह सामान आहे. आम्हाला पैसे द्या ! आम्ही ते बरोबर सोडवतो. खरं तर ते रेल्वेअधिकारी नसावेत, लोकांना नाबदिणारे भामटे असावेत. त्यांना फुटवल्यावर आम्ही स्टेशनबाहेर पडलो.

स्टेशनाबाहेर पडल्याबरोबर 'हावडा–ब्रिज'ने आमचं लक्ष वेधून घेतलं. लहानपणी कधी तरी पाहिलेला 'हावडाब्रिज' चित्रपटातला हा ब्रिज मनात घोळत होता. प्रत्यक्ष पाहिल्यावर त्याची भव्यता चांगलीच जाणवली. हावडा स्टेशनातून शहराकडे जाणारी वाहतूक या ब्रिजवरूनच जाते. त्यामुळे यावर वाहनांची प्रचंड गर्दी असते. 'हुगळी' नदीवरील जुना 'पोंटूनब्रिज' काढून १९४३ साली हा नवा ब्रिज बांधला गेला. याचा अजस्त्रपणा पाहून आम्ही चक्रावूनच गेलो. कॉलेजात असताना स्ट्रेंग्थ ऑफ मटेरियल' शिकताना कँटीलिव्हरच्या स्ट्रेसेस काढताना कोण तारांबळ उडायची आमची ! मग हा प्रचंड डोलारा उभा करताना केवढी गणितं, केवढा विचार, केवढं नियोजन करावं लागलं असेल ! या ब्रिजला नदीमध्ये कुठेही आधाराला खांब नाही. नदीच्या दोन्ही तीरांवर असलेल्या चार खांबांवर हा ब्रिज लटकलेला आहे. या खांबांचा पाया खणून आत बांधकाम करतानाच केवढा त्रास झाला. आत खणलं की थोड्याच वेळात खणलेला खड्डा जमिनीत झिरपलेल्या पाण्याने भरून जाई, मग पाणी आत येऊ नये म्हणून खड्ड्यात हवेचा प्रचंड दाब निर्माण केला. आता या प्रचंड दाबाखाली कामगारांना काम करताना त्रास होऊ लागला. मग त्यांना या दाबाची सवय होईपर्यंत काम थांबवले गेले. कामगारांना सवय झाल्यावर पुन्हा काम सुरू झाले. अशा अनेक अडचणी पार करीत या ब्रिजने हुगळीनदी ओलांडली.

या ब्रिजवरील गर्दीतून वाट काढत बसने आम्ही हॉटेलपाशी आलो आणि चार महिने आधी रिझर्वेशन करूनसुद्धा हॉटेलात जागा नाही, असं ऐकायला लागलं. त्यावर हॉटेलमॅनेजरशी चकमक झडली. रिसीट काढून दाखवल्यावर मॅनेजर भानावर आला. तेथेच राहायला जागाही मिळाली आणि कलकत्ता पाहायला आम्ही मोकळे झालो.

कलकत्त्यात काय काय पाहायचं ? तशा कुठल्याही शहरात पाहण्यासारख्या अनेक गोष्टी असतात. सर्वच पाहणं आपल्याला

कलकत्ता शहर पर्यटकाच्या नजरेतून कसं दिसलं त्याचं हे चित्र. कलकत्त्यातली पर्यटनस्थळं बघता-बघता तिथली गर्दी, शहराचं बेशिस्त नियोजन, तिथले दंगेधोपे आणि गुंडगिरी आणि औद्योगीकरणाचा झपाटा हेही लेखकानं नकळत डोळ्यासमोर उभं केलं आहे.

हा लेख वाचून प्रश्न पडतो-

कलकत्याची धुमसती संस्कृती खरी की इथल्या मठ-मंदिरांची उदात्त भव्य संस्कृती खरी ?

कलकत्याला जायचं असेल तर हा लेख वाचा ....

शक्य नसतं. आपल्याला जमेल तेवढ्या पाहायच्या. प्रत्येक भारतीयाप्रमाणे आम्हा-लाही विवेकानंद, रामकृष्ण परमहंस वगैरे व्यक्तींचं आकर्षण वाटत होतं. त्यामुळं प्रेक्षणीय स्थळांपैकी प्रथम बेलूरमठ पाहायचा ठरवला.

विवेकानंदांनी या मठाची स्थापना १८९८ मध्ये केली होती. त्यांचे गुरू 'रामकृष्ण परमहंस' यांच्या महाप्रयाणानंतर विवेकानंद येथे त्यांच्या इतर साधक-मित्रांना घेऊन रहात असत. येथे त्या सर्वांची पूजा, पाठ, ध्यानधारणा चालत असे. रामकृष्णांच्या जन्मशताब्दीला विवेकानंदांनी त्यांचे भव्य मंदिर येथे भक्तमंडळींकडून आलेल्या देणग्यातून (सुमारे ९ लाख) बांधून घेतले.

## मठ आणि मंदिरं

सकाळी ८॥ च्या सुमारास आम्ही बेलूर-मठाच्या आवारात पोचलो. सकाळची तिरपी कोवळी उन्हे मठाच्या आवारातील मऊ हिरवळीवर खेळत होती. वातावरण कसे प्रसन्न होते. आम्ही चालत मंदिराच्या प्रवेश-द्वाराशी आलो. उंचावरील भव्य प्रवेश-द्वाराच्या वरच्या बाजूला 'नागाच्या वर्तुळातील पाण्याच्या लाटांवरील उगवलेला सूर्य, पाण्यावर फुललेले कमळपुष्प व त्यात पोहणारा हंस' हे रामकृष्णांचे आध्यात्मिक चिन्ह कोरलेले आहे. त्यातील पाण्याच्या लाटा म्हणजे 'कर्म', उगवता सूर्य म्हणजे 'ज्ञान', कमलपुष्प म्हणजे 'भक्ती', वर्तुळाकार सर्प म्हणजेच 'योगाद्वारे जागृत झालेली कुंड-लिनीशक्ती आणि 'हंस' म्हणजे 'परमात्मा' या चित्राचा थोडक्यात अर्थ म्हणजे कर्म, *ज्ञान, भक्ती आणि योग यांच्या साहाय्याने* परमात्म्याकडे जाता येते

असं म्हणतात की, या मंदिराच्या रचनेत चर्च, मंदिर, मशीद या तिन्हींचीही वैशिष्ट्ये आहेत. चर्चचे वैशिष्ट्य म्हणजे प्रवेशद्वार व सभामंडपातील कमानी; पण हे कमानीचे वैशिष्ट्य भारतातील बुद्धगुंफात आढळते. मशिदीचे वैशिष्ट्य म्हणजे वरचा घुमट व त्यावरील कळस; पण घुमट व वरचा कळस हे तर हिंदु ब्राह्मणाच्या डोक्यावरील गोटा, भागील घेरा आणि शेंडी यांच्याशी साम्य दाखवतं. काहीही असलं तरी या मंदिराचं स्थापत्य नजरेत भरणारं आहे. नक्षीदार खांब, भिंतीवरील जाळीदार गवाक्षे, नक्षी-दार सज्जे वगैरे पाहून आम्ही खूष झालो. मंदिरातील, सभामंडपातील चकचकीत जमिनीवरुन चालताना मन भरून आले आणि चालत चालत रामकृष्णांच्या भव्य आणि शुभ्र मूर्तीपुढे आपोआपच नतमस्तक झालो.

मंदिरातून बाहेर पडल्यावर मठाच्या आवारातील विवेकानंदांची खोली पाहिली. तेथे विवेकानंद वापरीत असलेल्या वस्तू ठेव-लेल्या आहेत. त्यांची वीणासुद्धा तेथे आहे. त्याशिवाय मठाच्या आवारात रामकृष्णांच्या पत्नी शारदामाता यांचं, विवेकानंदांचं-ब्रह्मा-नंदांचं जेथे दहन झालं तेथे त्यांची छोटी मंदिरे आहेत. विवेकानंदांच्या मंदिरात त्यांचं आध्यात्मिक चिन्ह ॐ आहे. अर्थात हा ॐ बंगाली पद्धतीने काढलेला आहे.

या सर्व मंदिरांतून फिरल्यानंतर मठा-जवळून वाहणाऱ्या हुगळीनदीच्या काठावर आम्ही गेलो. नदीचे पात्र सूर्यकिरणांनी चम-चमत होते. पात्रात कुठे तरी तुरळक होड्या दिसत होत्या. वातावरण कसं अगदी शांत आणि उदात्त वाटत होतं. मी हिला म्हटलं, 'आध्यात्मिक प्रगतीसाठी माणसाला हिमालय गाठायची काही आवश्यकता नाही. कल-कत्त्यासारख्या शहरातील अशा ठिकाणीही ते साधू शकेल !'

कलकत्त्यातील सर्व प्रेक्षणीय ठिकाणं अशीच सुंदर असतील का ? असा मनात विचार करीत असताना आम्ही कालीमंदिरा-पाशी केव्हा येऊन पोचलो ते कळलंच नाही.

दोनशे वर्षांच्या या जुन्या मंदिराचे पूर्वीचे नाव 'कालिक्षेत्र' असे होते. या शब्दाचा अपभ्रंश होऊनच पुढे या शहराला कलकत्ता हे नाव पडले. कलकत्ता शहराचा हा उगम कसा आहे ते पाहण्यासाठी मी उत्सुक होतोच. आम्ही आत शिरलो. तेथे हिंदू देवळाची सर्व वैशिष्ट्ये एकवटली आहेत. देवीच्या ओटीसाठी खण-नारळ घेण्यासाठी मागे लागणारे दुकानदार, चपला सुरक्षित ठेवण्यासाठी करावी लागणारी धडपड, जागोजाग दक्षिणेसाठी पुढे पुढे करणारे काळे ढेरपोटे भटजी, देवीच्या दर्शनासाठी भक्तांची चाललेली खेचाखेच, तेलकट कुबट जमिनी, भिंती, खांब, अंधारा गाभारा आणि देवीची *डोळे वटारलेली, लाल लाल जीभ बाहेर* आलेली आणि नुसता चेहराच दिसणारी भीतिदायक मूर्ती!... सर्व काही यथासांग होतं. देवीच्या दर्शनासाठीसुद्धा एका भटजीला पैसे देऊन आत घुसवून घ्यावं लागलं. अगदी

वैतागून बाहेर पडलो. पुढच दक्षिणेश्वरीचं मंदिर असच असेल तर जाण्यात अर्थ काय? यावर आमची चर्चा झाली; पण आमच्या ग्रुपमध्ये स्त्रियाचा भरणा जास्त असल्याने 'दक्षिणेश्वरीला जायचंच' असं त्यानी ठासून सागितल. बहुमतापुढं नाइलाज झाला. दक्षिणेश्वरीच्या आवारापाशी आम्ही आलो.

मंदिराबाहेर देवीचे फोटो, ओटीचे सामान इ. विकणारी दुकाने, चपला सांभाळण्यासाठी गर्दी करणारी लहान मुले वगैरे पाहून वाटलं, 'आता कालीमदिराचीच दुसरी आवृत्ती पाहाणार!' मंदिराच्या मोठ्या प्रवेशद्वारातून आतील प्रागणात प्रवेश केला आणि तेथील स्वच्छता पाहून आश्चर्याचा धक्काच बसला.

आत गेल्यावर लांबलचक विस्तीर्ण असे फरसबंद आवार लागले फरसबंद आवाराच्या डाव्या बाजूला उंच चौथऱ्यावर राधाकृष्णमंदिर आणि दक्षिणेश्वरीचे मदिर आहे आणि आवाराच्या उजव्या बाजूला उंच चौथऱ्यावर ओळीने बारा शिवलिगाची मदिरे आहेत. प्रथम आम्ही राधाकृष्ण मंदिरात गेलो. हे मदिर उत्तर भारतीय पद्धतीने बाधलेले आहे. त्यावरील छद सपाट आहे आणि त्यावर कळस नाही नंतर आम्ही दक्षिणेश्वरीच्या देवळाकडे गेलो. हे मदिर एकदम भव्य दिसले. या आवारातील सर्वच मंदिरे उच चौथऱ्यावर असल्यामुळे त्यांच्या भव्यतेत आणखीच भर पडते. दक्षिणेश्वरीचे मदिर पूर्वभारतातील नऊ मनोऱ्याची जी विशिष्ट शैली आहे त्या पद्धतीने बाधलेले आहे. या पद्धतीत मंदिराच्या छतावर घुमट, कळस या ऐवजी नऊ मनोरे असतात. हे मनोरे उच असून त्यांच्या वरच्या भागावर छोटे घुमट असतात. छताच्या मध्यावर एक उंच मनोरा आणि प्रत्येक कोपऱ्यात एकाआत एक असे दोन मनोरे याप्रमाणे चारही कोपऱ्यातील आठ मनोरे अशी रचना असते. या देवळातही देवीच्या दर्शनासाठी तिची ओटी भरण्यासाठी भक्तजनाची खूपच गर्दी होती; पण काळीमदिरासारखी खेचाखेच नव्हती, तर स्त्रियाची व पुरुषांची वेगळी रांग होती. ज्यांना रांगेत उभ राहायला वेळ नव्हता त्याना लांबूनही देवीचं दर्शन घेता येत येतं. मंदिराच्या समोरच कथा-कीर्तनासाठी भव्य सभामडप आहे.

## कालीमंदिर-दुर्गामंदिर

दोन्ही मदिरातील देवतांचे दर्शन घेतल्यावर आम्ही पायऱ्या उतरून खालच्या फरसबद आवारात आलो. ऊन वाढल्यामुळे पायाला थोडे चटके बसायला लागले. ते आवार ओलांडून पुन्हा पायऱ्या चढल्या आणि शिवमदिराच्या रागेकडे गेलो. या सर्व बारा मंदिराच स्थापत्य विशिष्ट बंगाली पद्धतीचं आहे. मूळ बंगाली झोपडीचाच आकार विकसित होऊन या पद्धतीच स्थापत्य तयार झालं. या प्रत्येक मदिराच्या आत सुबकशी शिवलिंगे आहेत. मला वाटल ही बारा ज्योर्तिलिंगाची प्रतीके असतील; पण तसं नाही. ही फक्त शिवमंदिरेच आहेत. या मदिराच्या मागील बाजूला हुगळीचे विशाल पात्र दिसले. नदीवरील 'विवेकानंद' ब्रिजही येथून दिसतो.

मंदिराच्या आवारात रामकृष्ण परमहंसांची खोली आहे. रामकृष्णांनी आपली आध्यात्मिक प्रगती भक्तिमार्गाने येथेच राहून केली. विवेकानदांची व त्यांची भेट येथेच घडली व विवेकानंद त्याचे शिष्य बनले. विवेकानदाच्या मनात सन्यासी होण्याचे विचार घोळू लागले; पण त्याचे कुटुब आर्थिक अडचणीत होते. त्याची काही तरी नीट व्यवस्था लागली की, आपण संन्यास घ्यायला मोकळे होऊ असं त्याना वाटे. त्यानी आपली व्यथा रामकृष्णाना सांगितली. रामकृष्ण म्हणाले, 'तू देवीकडे जा आणि तुझ्या कुटुबियाच्या व्यवस्थेसाठी देवीकडे मागणे माग!' त्याप्रमाणे विवेकानंद देवीकडे गेले. त्यानी देवीसमोर हात जोडले आणि त्याच्या तोडून आपोआप शब्द बाहेर पडले. 'देवी, मला सन्यास दे!' देवळातून बाहेर आल्यावर रामकृष्णांनी त्याना विचारलं, 'काय मागितलंस देवीकडे?' विवेकानदानी काय घडलं ते सागितल्यावर रामकृष्ण म्हणाले, 'हात् वेडया, पुन्हा आत जा आणि देवीकडे नीट मागून घे काय पाहिजे ते!' पण विवेकानंदानी आत जाऊन पुन्हा देवीकडे संन्यासच मागितला. हा प्रकार तीनदा घडला. तेव्हा विवेकानंद मनात काय ते समजले आणि पुन्हा देवीकडे ते गेले नाहीत.

रामकृष्ण परमहंस याच मंदिरात का राहत होते? त्यांचा या मदिराशी संबंध काय? तर हे देऊळ मुळात कोळयांची राणी राशमतीने बांधले. एका कोळिणीने हे मदिर बांधले आहे म्हणून त्या काळी कुणीही ब्राह्मण मंदीरातील नेहमीची पूजाअर्चा करायला तयार होईना. कोळिणीच्या मंदिरात ब्राह्मण कसा येणार? त्या वेळी सनातनी ब्राह्मणांच्या विरोधाला न जुमानता रामकृष्णाचे थोरले बंधू पूजेस तयार झाले. त्यामुळे रामकृष्ण लहानपणापासूनच या मदिरात वाढले, बागडले आणि शेवटी महत्पदालाही चढले!

कलकत्त्यात कालीमदिर आणि दुर्गामंदिरे भरपूर आहेत. सर्वच काही पाहणे शक्य नव्हतं आणि आतापर्यंत महत्त्वाची दोन मंदिरे पाहिली होती त्यामुळ पुढचं मदिर जैनधर्मीयाच पाहायचं ठरवलं.

शंभर वर्षांपूर्वीचं हे जुने मंदिर शेठ रायबहाद्दूर बद्रीदास या हिऱ्याच्या व्यापाऱ्यानी अमाप पैसे खर्चून बांधले. जैनांच्या चोवीस तीर्थंकरपैकी दहावा तीर्थंकर शीतलनाथचे हे मदिर भव्य असले तरीही अगदी नाजूक दिसते. सडपातळ खांब, वरच्या बाजूच्या नाजूक शिखराच्या रागा या सर्वांमुळे मंदीर नाजूक दिसत असावे. मंदिराच्या सजावटीत आतून व बाहेरून रगीत काचाचे तुकडे, रंगीत दगडाचे तुकडे याचा नक्षीकामासाठी सढळ वापर केलेला आहे त्यामुळे मंदिराच्या झगमगाटांत भर पडते. आत गेल्यावर पाहिलं तो छतावर, खावांवर सर्वत्र रगीत काचाचं सुदर नक्षीकाम आहे. नक्षीकामात विविधताही भरपूर आहे. एक नक्षी दुसऱ्यासारखी नाही. या सर्वांचं प्रतिबिंब तेथील खाबावरील, भिंतीवरील असख्य आरशाच्या तुकडयात पडते आणि रंगांचा नयनमनोहर खेळ दिसतो त्याशिवाय छताला इटली, स्पेन वगैरे देशांतून आणलेली काचेची भव्य आणि नाजूक अशी रगीबेरंगी झुबरे टांगलेली आहेत. जमिनीवरील सगमरवरात छोटया छोटया रंगीत दगडांच डिझाइन इतक्या कलात्मकतेने केलंय की ते दगड वेगळे वाटतच नाहीत. जणू जमिनीवरच ते डिझाइन रंगवलंय अस वाटत. देवळाचा गाभारा तर सर्व वैभवाचा कळसच आहे. आतील सर्व सजावट सोन्याचादीची आहे. शीतलनाथच्या संगमरवरी मूर्तीच्या कपाळावरील हिऱ्याचीच किंमत पंचवीस लाख आहे म्हणे! शीतलनाथचं दर्शन घेतल्यावर आम्ही मूर्तीभोवती प्रदक्षिणा घातली. प्रदक्षि-

णे चा सर्व मार्ग दोन्ही बाजूनी उत्तम प्रकारच्या आरशानी मढविलेला आहे. तेथील एका कोनाडयात मंदिरस्थापनेपासून आजतागायत तेवत असलेली अखंड ज्योत आहे. भिंतीवर एके ठिकाणी शीतलनाथची दोन चित्रे आहेत. पैकी एकावर जडावाचे काम केलेले आहे. मंदिराबाहेर आल्यावर आवारातही एक चक्कर मारली. या आवारात उत्तम पुष्करिणी, कारंजे, बागबगीचा वगैरे सर्व सजावट उत्तम असल्याने मदिराची शोभा आणखी वाढली आहे.

ही वैभवशाली कलाकृती पाहिल्यावर आमच्यापैकी एकाने शेरा मारला, 'अशी पैशाची उधळपट्टी करण्यापेक्षा एखादा कारखाना काढला असता तर चार लोकांना रोजगार मिळाला असता!' एखाद्या कलाकृतीला असा पर्याय मांडणे हेच चुकीचं आहे. कलाकृती झाल्या नाहीत तर कलाकारांनी काय करावं? त्यांना काम कसं मिळणार? हा विचार कुणी शेरेबाजी करताना करतच नाही.

कलकत्त्यातली प्रमुख मदिरे पाहिली. आता म्युझियम्स पाहावी अस ठरवलं. कुठल्याही शहरात अनेक म्युझियम्स असतात. येथे तर विविध प्रकारच्या म्युझियम्सची रेलचेल आहे. आम्ही महत्त्वाची म्युझियम्स पाहायची ठरवली,

प्रथम चौरंगी भागातलं प्रमुख म्युझियम पाहायचं ठरवल. याचं नावच 'इडियन म्युझियम' आहे, शहरातल हे सर्वांत जुनं म्युझियम आहे. येथे काय नाही? अगदी छोटया कीटकापासून ते हत्ती, डायनोसॉस, देवमासा यासारख्या प्राण्याचे प्रचड सागाडे, जुनी भाडीकुंडी, जुनी शिल्पे, कपडे, स्टॅम्प्स, हस्तलिखिते वगैरे सर्व काही आहे थोडक्यात म्युझियममध्ये असणाऱ्या सर्व स्टॅंडर्ड वस्तू येथे आहेत. त्या त्या विषयातील अभ्यासकांना येथे ज्ञानाचे प्रचड भाडार खुले आहे; पण सर्वसामान्य माणसाला एवढा वेळ असतो कुठे? फक्त तेथील एका दालनात निरनिराळ्या आदिवासी जमातीच्या घरगुती जीवनाची झलक दाखविणारी दृश्ये पुतळ्याच्या साहाय्याने उभी केली आहेत. ती पाहताना वेळ बरा गेला. एरवी पायपिटीने अगदी वैतागलो.

नंतर आम्ही 'नेहरू बॉल म्युझियम' पाहायला गेलो. 'इंडियन म्युझियम'च्या तुलनेने हे म्युझियम छोटं आहे. देशोदेशीच्या उत्तमोत्तम बाहुल्या पाहताना बरोबरची लहान मुले अगदी रगून जातात आणि त्याच्याबरोबरची मोठी माणसेही रगतात. या म्युझियममध्ये एका दालनात रामायण आणि महाभारत या कथा बाहुल्याच्या साहाय्याने निरनिराळी दृश्ये उभी करून दाखविलेल्या आहेत. एक एक दृश्य पाहात पुढे जायचं. संपूर्ण कथा उलगडत जाते.

## म्युझियम्स

बाहुल्याचं म्युझियम हे हल्लीच आहे; पण ब्रिटिश अमदानीचे अवशेष असलेल 'व्हिक्टोरिया मेमोरियल' हे म्युझियम त्याच्या स्थापत्यासाठी, त्यातील शिल्पासाठी, पेंटिंग्जसाठी एकदा नजरेखालून घालायला हरकत नाही. १६० फूट उचीचं हे सगमरवरी स्मारक ब्रिटिश अमदानीचे अवशेष मिरवीत दिमाखाने उभं आहे. जगात अनेक राजे, राण्या होऊन गेल्या; पण व्हिक्टोरिया राणीइतक जास्त काळ साम्राज्य उपभोगलेली राणी जगात दुसरी नाही! या ब्रिटनच्या आवडत्या राणीचं स्मारक बनविण्यासाठी लॉर्ड कर्झनने खूप कष्ट घेतले. लॉर्ड कर्झन इतिहासाच्या पानातून मनात जो उभा राहिला होता त्यापेक्षा किती तरी ठळकपणे त्याच्या 'माणूस' या स्वरूपात तो उभा राहिला म्हणजे मनातल्या फोटोचित्राचा आता एक पुतळा घडला गेला.

प्रथम कर्झनने या स्मारकासाठी पैसा जमा करण्यासाठी भारतीय जनता व सस्थानिकाना आवाहन केल. सत्तेवरील सूर्याला वदन करण्यात पटाईत असलेल्या आपल्या भारतीय सस्थानिकानी एवढया देणग्या द्यायला सुरुवात केली की, कर्झनला त्यावर सीलिंग आणावं लागलं! या इमारतीचं स्थापत्य भारतीय पद्धतीचं होऊ नये म्हणून ब्रिटिश इन्स्टिटयूट ऑफ आर्किटेक्टच्या अध्यक्षाना पाचारण करण्यात आलं; पण शेवटी जे डिझाइन तयार झालं ते पाहिलं तर लक्षात येतं की या इमारतीचं स्थापत्य ताजमहालशी साधर्म्य दाखवितं. अर्थात या संगमरवरी इमारतीचं वैशिष्टय म्हणजे ती अतिशय भव्य आहे; पण जैन मदिरासारखी ती नाजूक वाटत नाही. या स्मारकासाठी अथेन्सहून संगमरवर आणला; पण तो भारतीय हवामानात टिकेना. मग जोधपूरच्या मकरानाखाणीतून नाइलाजाने भारतीय सगमरवर आणावा लागला. खाणीपासून कलकत्त्यापर्यंत भारतीय रेल्वेने त्याची वाहतूक फुकट केली. ही सर्व प्रचड इमारत एका राफ्टवर उभी केली आहे. तो राफ्ट खचू नये म्हणून चार दिशांना पाण्याचे तलाव बांधून त्यातील पाण्याची पातळी समप्रमाणात ठेवण्याची व्यवस्था झाली.

या स्मारकात राणीचे पुतळे, तिचे कपडे, तिचं लिहिण्याच टेबल, अनेक पेंटिंग्ज भारतात राज्य करून गेलेल्या व्हाइसरॉयची पेंटिंग्ज वगैरे अनेक वस्तू आहेत. एडवर्ड सातव्या सन्मानार्थ जयपूरमध्ये निघालेल्या भव्य मिरवणुकीचं तितकच भव्य पेंटिंग या स्मारकात पाहिलं. हे जगातील दुसऱ्या क्रमाकाच मोठ पेंटिंग आहे. प्रचड मोठं असलं तरी त्यातील हत्ती, घोडे, माणसे इ. सर्वांची प्रमाणबद्धता व्यवस्थित साधलेली आहे. हे चित्र काढल होत एका रशियन चित्रकाराने आणि त्याची मालकी होती एका अमेरिकन माणसाकडे. कर्झनला ते चित्र या स्मारकासाठी हव होतं. मग त्याने अमेरिकन वकिलातीला मध्यस्थी करावयास लावून त्या अमेरिकन माणसाला ते चित्र १५०० पौंडाना विकावयास तयार केले; पण एवढी प्रचड किंमत देऊन ते चित्र कोण विकत घेणार? जयपूरमधल्या मिरवणुकीच हे चित्र म्हणून कर्झनने जयपूरच्या महाराजांनाच ते विकत घ्यावयास लावले. शेवटी जयपूरच्या महाराजांना ते चित्र व्हिक्टोरिया मेमोरियलला देणगीदाखल देण्यास सागितले. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ठेवण्याचा हा प्रकार फारच छान आहे. व्हाइसरॉयच्या पदावर असताना व पदावरून उतरल्यावर सुद्धा कर्झन हे स्मारक होण्यासाठी सतत

**कलकत्त्यातली प्रमुख मंदिरं पाहिली. आता म्युझियम्स पाहावी असं ठरवलं.**

प्रयत्नशील राहिला. वीस वर्षांच्या प्रयत्नानंतर हे स्मारक उभं राहिलं. एक परकीय माणूस आपल्या आवडत्या राणीचं स्मारक परक्या देशात उभं करण्यासाठी केवढे कष्ट घेतो आणि त्याचबरोबर गुलामी मनोवृत्तीचे आपले संस्थानिक आणि प्रजा त्यास अहमहमिकेने लागेल ती मदत करते. या गुलामी मनोवृत्तीचे भारताला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे लोटल्यावरसुद्धा संपूर्ण उच्चाटण झालेले नाही. इंग्लंडच्या राणीच्या विवाहाची सचित्र माहिती आठ कॉलमी मथळ्याखाली रकानेच्या रकाने भरून देण्यात आपली इंग्रजी वृत्तपत्रे आघाडीवर असतात.

ही गुलामी मनोवृत्ती कलकत्त्यातही कधी तरी डोके वर काढी. आमच्या म्हाताऱ्या गाईडबाईचा आग्रह चालला होता की, 'मार्बल पॅलेस' मधील वस्तुसंग्रहालय पाहायला जाऊ या. मी विचारलं, 'तिकडेच जाण्याचा आग्रह कशाला? काय वैशिष्ट्य आहे त्या संग्रहाचे?' तर गाईडबाईने उत्तर दिलं, 'तेथील सर्व वस्तू इंपोर्टेड आहेत!' तो संग्रह चांगला असेलही; पण इंपोर्टेड म्हणून त्याचे वैशिष्ट्य आमच्या गाईड-आजीला वाटत होतं. आम्हाला वेळेअभावी हे संग्रहालय पाहता आलं नाही. त्याऐवजी आम्ही 'बिर्ला इंडस्ट्रियल अँड टेक्निकल म्युझियम' पाहायला गेलो. सायन्स व इंजिनिअरिंग शाखेतील विद्यार्थ्यांसाठी हे म्युझियम अगदी उपयुक्त आहे. हे तीन मजली म्युझियम पाहायला वेळ अगदी कमी होता. थोडचा वेळात जेवढ पाहता येईल, तेवढं पाहिलं. तेथे अनेक प्रकारची हलती मॉडेल्स आहेत. ती बटण दाबून चालू करून पाहता येतात. उदा. स्टीम इंजिन्स, इलेक्ट्रिक इंजिन्स, अणूची रचना वगैरे. गिअरट्रेन्सचे तर तेथे एवढे विविध प्रकार आहेत की ते पाहून मी तर थक्कच झालो! अर्थात कलकत्त्यातील विजेचा फटका येथेही बसला. वीज चालू नसल्याने हलत्या मॉडेल्सची गमत पाहता आली नाही!

कलकत्त्यातली महत्त्वाची म्युझियम्स पाहिली; पण म्युझियम पाहणे हा प्रकार भरपूर वेळ जवळ असताना करणं जास्त चांगलं, म्हणजे काही तरी नीट पाहिल्याचं समाधान मिळेल. एरवी पायपीट होते आणि डोक्यात नुसती खिचडी होऊन जाते.

मुंबईत ट्राम हा प्रकार इतिहासजमा झालाय; पण कलकत्त्यात अजून ट्राम आहेत. त्यात फर्स्ट क्लास आणि सेकंड क्लास असे दोन डबे असतात. दोन्ही क्लासमध्ये फरक म्हणजे फर्स्ट क्लासच्या डब्यात एक भला मोठा विजेचा पंखा गरगरत असतो. अर्थात कलकत्त्याच्या या प्रचंड गर्दीत आणि विलक्षण उकाड्यात विजेचा पंखा ही फार मोठी लक्झरी म्हणता येईल.

कलकत्ता शहराचे रस्ते, दुकानं, सार्वजनिक वाहनं येथे दिसणारी प्रमुख गोष्ट म्हणजे प्रचंड गर्दी! यत्र, तत्र, सर्वत्र नुसती वाहनांची, माणसांची गर्दीच गर्दी! सकाळी, दुपारी, संध्याकाळी महत्त्वाच्या रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होण्याचे प्रकार सर्रास चालू. हावडा-ब्रिजवरून तर नेहमी गोगलगाईच्या गतीने वाहतूक चालू असते. 'कलकत्त्यात अपघाताचं प्रमाण इतर शहरांपेक्षा अगदी कमी आहे.' असं आमच्या गाईडनं अभिमानानं सांगितलं. हा वृथा अभिमान आहे. वाहतुकीची कोंडी एवढी जबरदस्त की वाहने वेगाने चालूच शकत नाहीत. त्यामुळे अपघात होणारच कसे? हे म्हणजे, 'एखाद्या कामात चुका होऊ नयेत म्हणून ते कामच न करणे अशासारखे आहे ही वाहतुकीची कोंडी कलकत्तेकराच्या एवढी अंगवळणी पडलेली दिसली की, त्याचं कुणाला काही सोयरसुतकच नाही.

## वाहतुकीची कोंडी

रस्त्यावर जी तऱ्हा तीच हायवेवर! चौपदरी हायवेच्या दोन्ही कडांच्या पदरावर अनेक ट्रक्स पार्क करून ठेवलेले दिसले. शिवाय गाई-म्हशी वगैरे प्राणिमात्रही सुखेनैव भटकताना दिसले. मधल्या दोन पदरावर मुंगीच्या पावलांनी वाहतूक चाललेली. हायवेवर ही अवस्था तर गल्ली-बोळात काय असेल! कलकत्त्यातल्या काही गल्ल्या तर कचऱ्याच्या प्रचंड ढिगांनी वाहतुकीला पूर्णपणे बंद झालेल्या आहेत.

या वाहतुकीच्या समस्येला तोंड देण्यासाठी भुयारी रेल्वेचा उपाय काढला गेला. गेली दहा वर्षे या भुयारी रेल्वेचं काम चाललंय. त्यासाठी 'मेट्रो रेलभवन' नावाची एक अनेक मजली इमारतही उभी केलीय. दहा वर्षांनंतर आतासा कुठे तरी एक बारकासा मार्ग तयार झाला आहे. हा भुयारी' रेल्वेचा उपाय म्हणजे रोगापेक्षा उपाय भयंकर असा प्रकार झालाय. या रेल्वेच्या कामासाठी ठिकठिकाणी रस्ते खोदून ठेवलेले आहेत. त्यामुळे उडणाऱ्या धुळीमुळे प्रदूषणात भर पडली आहे. भर रस्त्यात हे खोदकाम झाल्यामुळे वाहतुकीची आणखी कोंडी झाली. भुयारी रेल्वेसाठी खोदकाम हे करावंच लागणार; पण ते झटपट पुरं होईल याकडे कुणाचच लक्ष नाही. तेही बरोबरच आहे म्हणा. कारण मेट्रो रेलभवनच्या उंच इमारतीतून खालील रस्त्यावरील अडचणी दिसणार कशा?

ही वाहतुकीची समस्या एवढी मोठी का झाली? त्याचं कारण कलकत्त्यात वाढलेली बेसुमार लोकवस्ती! कलकत्ता हे भारतातील प्रमुख बंदर आहे. त्याचं वैशिष्ट्य म्हणजे समुद्रापासून ते १०० मैल आत असलं तरी भारतातील ४५% आयात-निर्यात येथूनच होते! त्यात कलकत्त्यात असलेल्या अनेक इंडस्ट्रीज! या दोन्ही कारणामुळे रोजगारासाठी बांगलादेश, बिहार, आसाम, अरुणाचल वगैरे सर्व शेजारी राज्यातून येथे माणसे येतात. रस्त्यावरून जाताना कुठेही पाहिलं तरी माणसेच माणसे दिसतात. येथील सर्व सार्वजनिक वाहने माणसांनी लडबडलेली असतात आणि या वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याचे काय उपाय चाललेले आहेत? एक तर लोकसंख्येला, बाहेरून येणाऱ्या माणसांना आळा घालायला हवा किंवा त्यांच्यासाठी आवश्यक त्या सोई करायला हव्यात. प्रत्यक्षात दोन्ही होत नाही किंवा जे होतंय ते फार हळहळू होतंय. या बाहेरून येणाऱ्या लोकांच्या प्रश्नाचा तडाखा आम्हाला परतीच्या प्रवासातही मिळाला.

कलकत्त्याच्या वाहतुकीच्या कोंडीला घाबरून आम्ही सर्व दोन तास आधीच स्टेशनवर हजर झालो. हमाल ठरवले. त्यांनी हातगाड्यावर सामान लादून गाड्या प्लॅटफॉर्मवर आणून ठेवल्या. ते लबाड हमाल नतर जे गायब झाले ते गाडी आल्यानंतर आमचं आम्ही सामान गाडीत चढवल्यानंतर हजर झाले ते पैसे मागायला!

स्टेशनवर आणि बोगीत गर्दी एवढी जबरदस्त की, त्या गर्दीत सामान चढवणे हे एक दिव्यच. सामान चढवून झाल्यावर आम्ही आमच्या जागांचा ताबा घ्यायला गेलो तर आमच्या रिझर्व जागावर इतर अनेक माणसे बसलेली. आम्ही आमचं रिझर्वेशन दाखवून त्यांना त्यांची तिकिटें दाखवायला सांगितली तर, 'आमची तिकिटे विचारणारे तुम्ही कोण ? टि. सी. *आल्यावर आम्ही आमची तिकिटे दाखवू !'* असं उर्मट उत्तर मिळालं. मग सतापून गाडीची साखळी खेचली. रेल्वेचा कुणीही माणूस आला नाही; पण गाडी मात्र थाबलेली पुन्हा चालू झाली. हा प्रकार तीनदा घडला; पण रेल्वेचा कुणीही माणूस चौकशीला तर आला नाहीच; पण रेल्वेच्या लोकांनी साखळीचं आणि ब्रेकच कनेक्शन तोडून गाडी चालू केली. साखळी खेचूनही उपयोग होईना. शेवटी आमच्या ग्रुपमधील आम्ही सर्व पुरुषांनी आमच्या सीटवरील या अनाहूत पाहुण्यांना अक्षरशः बकोटीला धरून उचलून हटवलं. ही अनाहूत माणसं पुढच्याच स्टेशनला उतरून गेली. त्यानंतर सावकाश टि. सी. आमची तिकिटे तपासायला आले. या सर्व प्रकारचा अर्थ हाच की, लोकल रेल्वेची अपुरी व्यवस्था ! हल्ली या सर्व प्रकारांना आळा घालणं रेल्वेने सुरू केलय असं कळलंय; पण एकूणच रेल्वेचा येथील कारभार अनागोंदी आहेच. आमच्या ग्रुपमधील नवऱ्याला एका *बोगीत आणि पत्नीला एका बोगीत स्लीपर* रिझर्वेशन देण्याचा चमत्कारही येथील रेल्वे-अधिकाऱ्यानी केलेला आहे !

असा येथील रेल्वेचा कारभार; तसाच येथील वीजमंडळाचा कारभार. येथील लोड शेडिंग या प्रकाराने नवा मनुष्य अगदी रंजीस येतो. हॉटेलातील वीज केव्हा जाईल याला काही निश्चित वेळेचंही बंधन नाही. केव्हाही वीज जायची. एकदा वीज गेली की, पाण्याचे पंप बंद, गिजर बंद ! गिजर बंद झाल्याने फार तर गरम पाणी बंद होईल. कलकत्त्यातील या विलक्षण उकाड्यात गरम पाणी बंद झाल्याने काही बिघडत नाही; पण पाण्याचे पंप बंद झाले की, हॉटेलातील पाणी गायब ! काही वेळा तर प्रातर्विधीलासुद्धा पाणी नसे. शेवटी हॉटेलात टँकरने पाणी आणावे लागे. वीज गेल्यामुळे पखे बद व्हायचे. मग हॉटेलातल्या खोल्यांत उकाड्याने रात्रभर अक्षरशः तळमळायला व्हायचं. उकाड्यानं हैराण झालेले आम्ही तर रात्रभर गॅलरीत झोपू लागलो. रात्री जेवताना वीज जाणं हा प्रकार म्हणजे अगदी वैताग. महाभारतात अर्जुन रात्री जेवत असताना एकदा दिवा गेला त्या वेळी त्याच्या लक्षात आलं की, जेवताना अंधारातसुद्धा घास तोंडातच जातो, मग आपल्याला अंधारातही लक्ष्यावर बाण सोडता यायला पाहिजे. त्याप्रमाणे त्याने अंधारात लक्ष्यावर बाण सोडण्याची सवय केली आणि आम्ही मात्र वैतागून दिवसाढवळ्या हॉटेल-मॅनेजरवर शाब्दिक बाण सोडले.

कलकत्त्यात विजेचा जरी तुटवडा असला तरी प्रदूषणाचा तुटवडा नाही. येथील अनेक कारखाने, नदीतून जाणारी जहाजे, रस्त्यातून जाणारे ट्रक्स, रस्ते खोदल्याने उडणारी धूळ, रस्त्यावर साठलेला कचरा या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे प्रदूषण ! येथे दर चौरस मैलात ६० टन सूक्ष्म धूलिकण आहेत कलकत्त्यात चोवीस तास राहणे म्हणजे वीस सिगारेट ओढण्यासारखे आहे. रवींद्रनाथ टागोरांनी कलकत्त्याचं 'Half Dead World' असं *वर्णन केलय. शांतिनिकेतनच्या स्वप्नात* मश्गूल असणाऱ्या कवीचा एक डोळा कलकत्त्याचे हे रूप पाहून किती हबकला होता हेच यावरून समजेल

कलकत्त्यातील हवा जशी प्रदूषित तसच पाणीही ! पाण्याची चव तर अगदी खराब असते. एखादं भांडभर पाणी उकळून काढलं तर भांड्याच्या तळाशी क्षार भरपूर साठतात. पाण्यात साबण घातला तर अजिबात फेस येत नाही. साबणाच्या तोंडालाही फेस न आणणारे हे प्रदूषित पाणी शहरात रोगराई फैलावू लागले म्हणून शहरात ट्यूबवेलची खोदाई चालू असते. ज्यातून मोठमोठी जहाजे जाऊ शकतात अशी प्रचंड मोठी हुगळीनदी कलकत्त्यातून वाहात असतानाही पाण्याचे हाल आहेतच.

कलकत्त्यात या सर्व अडचणी असल्या तरीही हे शहर राजकीयदृष्ट्या अतिशय जागरूक आहे. येथे इंदिरा कॉंग्रेसची भली मोठी मिरवणूक पाहिली. इंदिरा गांधींचं भल मोठं चित्र घेऊन बंगाली घोषणा देत मिरवणूक चालली होती. मिरवणुकीतून *जाणाऱ्यांच्या चेहऱ्यांवरचे भाव फार मोठं* सत्कृत्य करत असल्यासारखे होते. त्याचबरोबर एके ठिकाणी विळा-कोयत्याचे लाल झेंडे असलेला कम्युनिस्ट पक्षाचा भला मोठा मंडप उभारण्याचे काम प्रचंड उत्साहात चालले होते. बर, आम्ही गेली त्या वेळी कुठल्याही निवडणुका नव्हत्या तरीही पक्षाचे काही तरी कार्यक्रम जोरात चालले होते.

### महाराष्ट्रनिवासाचं आतिथ्य

राजकीयदृष्ट्या जागरूक असणाऱ्या येथील लोकाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे येथील माणसे मदतीला तत्पर असतात आपल्याला माहिती नसलेली सर्व माहिती येथील माणसे अगदी तत्परतेने देतात. एकाच वेळी तीन-चार माणसेसुद्धा एकदम माहिती देण्यास, मदत करण्यास तयार असतात. त्यातून तुम्ही मोडक्या-तोडक्या बंगालीत जर एक-दोन शब्द बोललात तर लोक आणखी खूष होऊन मदत करतात. म्हणजे इतक्या अडचणी असूनही हे शहर माणूस म्हणून जगतंय.

'खरेदी' हा प्रवासाचाच एक भाग आहे. त्यात बरोबर स्त्रिया असल्या की खरेदीला अगदी उधाण येते. मी व सौ खरेदीला निघालो. खरेदीसाठी कलकत्त्यातल्या शंभर वर्षांच्या जुन्या 'न्यू मार्केट'मध्ये जायचं ठरवलं 'न्यू' मार्केटचं बाह्यदर्शन अगदीच 'ओल्ड' आहे. याचं सर्व बांधकाम विटाचं आहे या सर्व विटा काळवंडलेल्या असल्यामुळे हे मार्केट एखाद्या जुन्या कापडगिरणीसारखं दिसतं. बाह्यदर्शनामुळं आत जावसच वाटेना; पण सौ. च्या आग्रहानं आत गेलो आणि पाहिलं तो काय अल्लाउद्दीनचा खजिनाच उघडल्यासारखा वाटला. आतमध्ये

**कलकत्त्यात विजेचा जरी तुटवडा असला तरी प्रदूषणाचा तुटवडा नाही !**

दोन हजारच्यावर दुकाने आहेत. दुकानांतून काय मिळत नाही हाच प्रश्न आहे. 'पिन टू पियानो' हे सर्व पोस्टल पिन नं. च्या सफाईने मिळू शकतात आणि येथील छोटया छोटया दुकानदारांची आतिथ्यशीलता ही बंगाली रसगुल्ल्यासारखी जोडीला असते.

आम्ही एखाद्या दुकानापाशी उभे राहिलो की लगेच दुकानदार म्हणे, 'आशोन दिदी माँ, आशोन!' म्हणजे 'यावे, आईसाहेब यावे!' हे सौ. ला उद्देशून आणि मला 'आशोन मोशाय, बोशोन!' म्हणजे 'या साहेब, बसा!' असं आदराचं आमंत्रण मिळे. कलकत्त्यातल्या विलक्षण उष्णतेमुळे तहान खूप लागे. तर आत गेल्यावर दुकानदार विचारीत, 'जल खावे?' पहिल्यांदा मी तर चक्रावूनच गेलो. 'जल' आणि 'खावे?' पाणी खायचं? पण बंगाली भाषेत खाणे, पिणे या सर्वाला 'खावे' हाच शब्द आहे. एवढंच काय पण 'सिगरेट ओढणे' यासाठी-सुद्धा 'सिगरेट खावे' असंच म्हणतात. तसंच बंगालीत मला आवडलेलं वाक्य म्हणजे 'आमी तोमाके खूब भालो बाछी.' म्हणजे मला तुम्ही खूप आवडता' याच वाक्यातल्या शेवटच्या शब्दाचा उपयोग आम्ही एखादी वस्तू आवडली की करत असू. वस्तू आवडली की 'आमाके खूब भालो बाछी' म्हणत असू. अर्थात हे बरोबर की चूक कोणी पाहात नसे. दुकानदार आपले आमच्या बंगाली उत्साहाला समजून घेत.

कलकत्त्यात बरीच वर्षे वास्तव्य केलेल्या एका मराठी बाईने आम्हाला सांगितलं की, न्यू मार्केटमध्ये एकदम सांगितलेल्या भावाच्या अर्धा भाव मागायचा. त्याप्रमाणे आम्ही घासाघीस सुरू केली; पण प्रत्यक्षात निम्म्या भावात वस्तू मिळत नाही. साधारणपणे दोन तृतीयांश ते तीनचतुर्थांश भावात वस्तू मिळते. न्यू मार्केटमध्ये शांतिनिकेतन फॅशनच्या चामडी पिशव्या, कटवर्क केलेल्या चादरी चांगल्या मिळतात. चामड्याच्या वस्तूही स्वस्त मिळतात. मुंबईत ज्या चामड्याच्या पाकिटांना पन्नास रुपये पडतात त्यांना येथे पंचवीस रुपये पडतात. स्त्रियांच्या चामड्याच्या पर्सेससी मुंबईच्या निम्म्या भावात येथे मिळतात.

आमची इतर सर्व खरेदी झाली; पण बंगाली साड्या कुठे घ्यायच्या? आमच्या ग्रुपमधील बऱ्याच स्त्रियांना बंगाली साड्या घ्यायच्या होत्या. त्यासाठी वणवण फिरायला वेळ नव्हता. फसवणूक न होता चांगल्या साड्या कुठे मिळतील याची आम्ही चौकशी केली. तेव्हा महाराष्ट्र निवासच्या मागच्या बाजूला दोन महाराष्ट्रीय स्त्रियांनी एक साड्यांचे घरगुती दुकान चालवलेले आहे असं कळलं आणि तेथील माल खात्रीचा असतो हेही कळलं. आम्ही सर्व तेथे गेलो. बंगाली साड्यांच्या घड्या म्हणजे अगदी सुरळीसारख्या असतात त्या सुरळ्यांच्या खजिन्यात बायका बसल्या. आम्ही पुरुष दुसऱ्या खोलीत बसलो. दोन तास बायकांची खरेदी चालली होती! बायकांच्या साडी-खरेदीत मात्र एक गमत असते. सौ. कुलकर्णींना सौ. बापट पाहात असलेली साडी पसंत पडते आणि सौ. बापटांना सौ. जकातदारांच्या हातातली साडी पसंत पडते. हा सर्व घोळ संपल्यावर, आमची खिसा-पाकिटं हलकी झाल्यावर आम्ही बाहेर पडलो आणि मुक्कामी आलो.

कलकत्त्यात गेलेला महाराष्ट्रीय माणूस 'महाराष्ट्र निवासात' गेला नाही असं क्वचितच घडतं. मात्र कलकत्त्यात 'महाराष्ट्र भवन' नावाचं एक राहण्या-जेवण्याचं गुजरात्यांनी चालवलेलं हॉटेल आहे. त्याचा 'महाराष्ट्र निवास' शी काही संबंध नाही. महाराष्ट्रीय लोकांसाठी कार्य करणारी 'महाराष्ट्र निवास' हीच संस्था आहे. या संस्थेकडे स्वतःची मोठी इमारत आहे. त्यात मोठा हॉल आहे. हॉलमध्ये कार्यक्रमासाठी स्टेज आहे. मोठा डायनिंगहॉल आहे. तेथे महाराष्ट्रियन पद्धतीचे रुचकर जेवण सकाळी आठपासून मिळते. राहण्यासाठी स्वतंत्र खोल्याही मिळतात. महाराष्ट्रीय पर्यटकांसाठी स्थलदर्शनाची येथे सोय होते. मोठ्या ग्रुपसाठी स्वतंत्र गाईडही मिळण्याची व्यवस्था येथे होते. येथे मराठी वर्तमानपत्रे येतात. मराठी चित्रपट येथील हॉलमध्ये दाखविले जातात. एवढंच नव्हे, महाराष्ट्रीय लोकांना परतीच्या प्रवासाची-गाडीची, विमानाची वगैरे सर्व तिकिटांची व्यवस्था येथील कर्मचारी करतात. महाराष्ट्र निवासच्या येथील कार्याबाबत येथील मॅनेजरशी गप्पा मारीत असता मी त्यांना विचारलं, 'येथील महाराष्ट्रियन लोकांसाठी बंगाली भाषेचे वर्ग वगैरे तुम्ही चालवता का?' त्यावर ते म्हणाले, 'अहो, बंगाली वर्ग कसले चालवता? खरी गरज आहे ती मराठी भाषेचेच वर्ग चालविण्याची. कारण कलकत्त्यात राहिलेल्या मराठी कुटुंबातली मुलं इंग्रजी शिकतात. बंगाली वातावरणामुळे आणि शाळेतील एक विषय म्हणून त्यांना बंगाली येतच असतं. त्यांना मराठी मात्र नीट येत नाही, त्यामुळे मराठीचेच वर्ग सुरू करायला हवेत!' किती बोलकी समस्या आहे ही! मुंबई-पुण्यात मोठ्या घरची इंग्लिश मीडियमची मुलं नाही का मराठीला पारखी होत? 'Daddı, what is Shravani (श्रावणी)?' हा प्रश्न मूल विचारते, तेव्हा त्या डॅडी-मम्मींना अधुकपणे फक्त श्रावणमहिनाच आठवतअसतो. असो. तर थोडक्यात 'महाराष्ट्र निवास' ही संस्था कलकत्त्यात येणाऱ्या मराठी माणसांना सर्वतोपरी सहाय्य करण्यासाठी सतत प्रयत्नशील असते.

आम्ही कलकत्त्यातलं स्थल-दर्शन बरचसं उरकलं होतं. अजून बोटॅनिकल गार्डन पाहायचं राहिलं होतं. बोटॅनिकल गार्डनकडे जायला आमच्या गाईड आजीबाईंचा विरोध होता. त्याचं म्हणणं, 'एवढ्या लांब त्या बागेत जायचं आणि पाहायचं काय तर २०० वर्षांचं जुनं वडाचं झाड! त्या म्हाताऱ्या झाडासाठी जाऊन पुन्हा वाहतुकीच्या कोंडीनं अडकायचं यात काय अर्थ आहे?' मनात आलं, आजीबाईंना स्वतःची वयस्कता विसरण्यासाठी तिकडं जाणं नको वाटत असेल! गाईड आजीबाईंचा बोटॅनिकल गार्डनला विरोध पाहिल्यावर आमच्या सौ. उसळल्या. त्यांनी आपला स्त्रीसुलभ विरोध प्रकटीत म्हटलं, 'काही नाही हो, आपण जायचंच बोटॅनिकल गार्डन पाहायला!'

स्त्रीहट्ट पुरा करण्यास आम्ही निघालो बोटॅनिकल गार्डनकडे!...

## हा तर स्वर्गच!

हुगळीनदीच्या पश्चिम तीरावर ईस्ट इंडिया कंपनीने १७८७ साली २७३ एकर जमिनीवर हा बगीचा तयार केला आहे. आता एवढे दोनशे त्र्याहत्तर एकर फिरणं काही शक्य नव्हतं. त्यामुळं फक्त वडाचं झाड पाहून परत यावं या विचारानं आत शिरलो.

दुपारची वेळ असल्याने ऊन चांगलंच तापलं होतं; पण आत शिरताच हिरवीगार झाडी आणि सुंदर हिरवळीचं दर्शन घडल्यावर डोळ्यांना चांगलाच थंडावा मिळाला. या बगीच्यात सर्वत्र फिरण्यासाठी उत्तम रस्ते केलेले आहेत. त्यावरून मिनीबसेस जाऊ शकतात; पण येथे पायी रमत-गमत

फिरण्यात खरी मजा आहे. आम्ही चालू लागलो. दोन्ही बाजूना हिरवळी आणि रस्त्याच्या कडेने वेगवेगळ्या प्रकारची झाडे पहात पहात निघालो. माणसांची गर्दी अजिबात नाही. कलकत्त्यात आहो, असं वाटतच नव्हतं. कलकत्त्यातली गर्दी, धावपळ, गलका, कोलाहल डोक्यामधून पार उतरून गेला होता.

ताडाची झाडं दिसू लागली. ताडाची झाड माडासारखी सरळसोट वाढतात आणि त्याच्या शेवटच्या टोकावर पानाचे झुबके पंखांसारखे दिसतात; पण येथे त्याचं खोड अर्ध्या उंचीपर्यंत सरळ वाढल्यावर त्यातून गलोलीसारखी दोन खोडे बाहेर पडून वरच्या बाजूला त्याची दोन स्वतत्र झाडे तयार झालेली दिसली. एके ठिकाणी तर विलक्षणच पाहिलं. पायाशी असलेल्या तीन ताडाच्या खोडांची आकाशात तेरा स्वतत्र झाडे दिसत होती ! एखाद्या गोष्टीचे 'तीन-तेरा' होणे म्हणजे नाश होणे, असा आपला मराठी वाक्प्रचार आहे. इथे या ताड-वृक्षानी तीन-तेराच्या मूळ अर्थाचेच 'तीन-तेरा' वाजवले !

आणखी थोडं पुढ गेल्यावर...आम्ही अवाक् होऊन पाहू लागलो. पाण्याच्या निळ्याभोर जलाशयावर कमळाची हिरवीगार पानं तरंगत होती...आणि त्यावर लालसर गुलाबी कमळे फुलली होती...वा...वा! मी डोळे चोळून पुन्हा पुन्हा हेच दृश्य पाहू लागलो....प्रश्न पडला मी देवांच्या नदनवनात तर नाही ना ?...कसाबसा अनिच्छेनेच पुढे निघालो.. पुढे आणखी एक सुदर दृश्य आमची वाट पहात होते रस्त्याच्या कडेला आणखी एक जलाशय दिसला. गुजराती लोक जेवताना ज्या मोठमोठ्या पितळी थाळ्या पूर्वी वापरीत त्याच्या दुप्पट-तिप्पट आकाराच्या हिरव्या थाळ्या तलावभर पसरल्या होत्या; पण थाळी म्हणजे जो ओबडधोबडपणा नजरेसमोर येतो, तो इथे नव्हता, तर निसर्गाने केलेली नाजूक कलाकुसर तेथे होती. ही पाने वरून हिरवीगार आणि थाळीच्या उचललेल्या कडाना आकर्षक लालसर दिसत होती. याचं नाव 'जायंट वॉटर-लिली' मध्यभागी या लिलीचा मोठा कळा दिसत होता. हा कळा पाण्यात बुडतो आणि त्यापासून सुंदर लालसर कडांच्या हिरव्या रंगाच्या थाळ्या बाहेर पडून आपल्या सौंदर्याने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करीत पाण्यावर तरंगत राहतात.

पुढे निघालो...वाटेत गुजाचं झाड पाहिलं. एके काळी सोन्याला तोलण्यासाठी वापरात असलेल्या काळ्या टोपीच्या लालभडक गुजांच झाड प्रत्यक्ष पाहिल. मला गुजांच नेहमीच कुतूहल वाटतं. सकाळ नि रात्र या इवल्याशा बीवर सतत एकत्र उभे असतात. थडगार सावली देत जमिनीवर गुजाचा सडा टाकीत हे झाड उभं होत... पुढे निघालो... निलगिरीचं झाड पाहिल्यावर त्याची पानं चुरडून त्याचा सुवास घेतला. बकुल, नागचाफा वगैरे झाडाचे प्रकार पाहिले... एका झाडाच्या पानाचा आकार वेडावाकडा होता. त्यातून पुन्हा एक पान दुसऱ्या पानासारखं नाही. त्याचं नाव 'पगला झाड'. पुढे निघालो. बाहेरून पाहिल तर सपूर्णपणे हिरव्यागार वेलीनी झाकलेला भला मोठा मडप... याचं नाव 'पाम हाउस. आत प्रवेश केला आणि पाहिलं तो काय.. वर, खाली, आजूबाजूला, समोर, मागे सर्वत्र हिरव्या नेत्रसुखद रगाचं साम्राज्य पसरलेल होत... या हिरव्या सावलीत कुंड्यांमध्ये, मातीच्या आळ्यामध्ये पामचे एक हजार प्रकार वाढीसाठी ठेवलेले आहेत... वरती पाहिलं तो दिवळं ऊन वरच्या हिरव्या वेलीवर पडून 'पाम हाउसचं' छत विलक्षण पोपटी तेजाने झळाळत होतं... या हिरव्या रंगोत्सवातून बाहेर पडूच नये असं वाटत होतं... सर्व बोटॅनिकल गार्डन हे नदनवन आहे तर त्यातील 'पाम हाउस' हा 'स्वर्ग' आहे... चालत चालत आम्ही बागेच्या शेवटच्या टोकाला पोचलो.

२०० वर्षांचा जुना वटवृक्ष पाहण्यापूर्वी अशी कल्पना होती की, या वडाचे खोड म्हणजे दहा-बारा माणसे वटपौर्णिमेला वडाला घेराव घालावा तसे आपले दोन्ही हात पसरून गोल करून उभी राहिली तर जेवढा परिघ होईल तेवढ्या परिघाचे प्रचंड जाडजूड खोड असेल आणि त्याची उंचीही प्रचड असेल अशी कल्पना होती; पण त्या वृक्षाने आपलं स्वरूप वेगळंच दाखवलं... लाबून पाहिलं तो हिरव्या सळसळत्या पानांचा प्रचड संभार आपल्याकडे सरकतोय असं वाटलं... जसजसे जवळ गेलो तसतशी अनेक खोडे जमिनीवर उभी असलेली दिसली... दक्षिणेतील देवळांमध्ये जसे हजार खांबी मंडप असतात... तसा अनेक खांबी वडाच्या खोडावर वडाच्या पानाचा प्रचंड संभार घेतलेल्या भल्या मोठ्या मडपासारखा हा वृक्ष दिसत होता. मूळ वृक्षातून फुटलेल्या पारंब्या पद्धतशीरपणे जमिनीत रुजवून त्यातून फुटलेल्या पारंब्या पुन्हा पुढील जमिनीत रुजवून हा वृक्ष वाढला आहे. पारंब्याची अनेक खोडे जमिनीत रुजत-वाढत ऑक्टोपसच्या पायाप्रमाणे या वृक्षाचा विस्तार पसरत गेलेला आहे. कालातराने या वृक्षाचे मूळ खोड कापून टाकले आहे. या वृक्षाभोवती घातलेले ताराचे कुंपणही या वृक्षाने ओलाडले आहे तेथील एका फलकावर वृक्षाचा परिघ, त्याची एकूण खोडे, उंची वगैरे सर्व आकडेवारी दिलेली आहे; पण माझे तिकडे लक्षच नव्हते वाटलं आतापर्यंतचा वेळ कसा नितातरम्यतेत निघून गेला ते कळलंच नाही... आता थोड्याच वेळात शेवटचं दृश्य दिसेल... या स्वर्गातील, नंदनवनातील सर्व देव आता या वृक्षमंडपाखाली जमतील... वाद्ये जुळतील... या मंडपाच्या खांबाखांबातून सुदर अप्सरा बाहेर पडतील... त्याचे नृत्य सुरू होईल... नृत्य-गीताचे सुस्वर, वाद्याचे—पैंजणाचे झंकार कानावर येतील... पण.. पण... मला काय ऐकू येतय हे... क्रंदन ! कुणाच ? का ?...

क्रंदन ऐकतच बोटॅनिकल गार्डनबाहेर पडलो आणि पाहिले... गार्डनजवळचे कलकत्त्याचे जग व्यवहारी वाणिज्यव्यवहारात संपूर्ण बुडून गेले होते, गढून गेले होते. त्यातच गरगरत होते. सौदे होत होते. बंदरावरील बोटी माल रिता करून पाण्यावर डुलत होत्या कारखान्यांतील धुराड्यानी प्रदूषण करून पोखरलेले ढग दाटीवाटीने काळोख अधिकाधिक गडद करीत होते. ट्यूबलाइटची भेंडोळी मालाची जाहिरातबाजी करीत होती. व्यापार-उदीमाचे सट्ट्याबट्ट्याचे व्यवहार तिजोरीच्या बदिस्त पेटाऱ्यात उद्याच्या उलाढालीची वाट पहात उभे होते. या सर्व व्यवहारी आपमतलबी जगाचे या गार्डनकडे लक्षच नव्हते. नदनवनासारख्या या गार्डनला कुणी स्वतःकडे पाहावे अशी गरजच नव्हती; पण गरज नसली तरी आपण या कुठल्या जगात येऊन पडलोय ही आग धुमसत होती आणि म्हणूनच या नंदनवनाचे क्रंदन माझ्या कानी आले...

... आणि कलकत्त्याहून कैक किलोमीटर दूर...

... कोणार्कला आलो तरीही...

ते क्रंदन मनात उमटतच राहिले... धुमसत राहिले...

□

# पॅब्लो नेरूदांच्या आठवणी...

● रघुपती भट्ट ●

ती कवी आपल्या कवितांचे वाचन करीत होता. हजारो श्रोते कानात प्राण आणून ऐकत होते. त्या कवितांमध्ये पददलितांचा आवाज होता, मानवी सहनशीलतेची तारीफ होती. कष्टकरी समाजाच्या जिद्दीची पोच होती. अचानक एक माणूस उठला. त्याचा अवतार पाहून तो खाणकामगार आहे हे स्पष्ट होत होते. खपाटी पोटाचा, दुःख-दैन्य यांनी गंजलेल्या चेहऱ्याचा तो कामगार थेट कवीजवळ गेला. त्याने आपला हात पुढे केला आणि खोल आवाजात तो म्हणाला,

'खूप दिवसांपासून मी तुला ओळखतोय माझ्या भावा.'

कवीच्या आणि जमलेल्या हजारो लोकांच्या डोळ्यांत आसवं उभी राहिली. त्या कवीचे आतापर्यंत खूप सन्मान झाले होते. अनेक भाषांतून त्याच्या कवितांची भाषांतरे झाली होती; पण त्या सामान्य कामगाराच्या शब्दांनी त्याला जे समाधान मिळाले ते त्याला आतापर्यंत कोणी देऊ शकला नव्हता.

जनसामान्यांच्या हृदयात विराजमान झालेल्या त्या महाकवीचे नाव 'पॅब्लो नेरूदा.'

'पॅब्लो'चा जन्म चिलीमध्ये एका रेल्वेकामगाराच्या पोटी झाला; पण त्याच्या कवितांनी अखे जग जिंकले. पॅब्लोच्या कवितांमध्ये क्रांतीचे बीज होते. स्पेनमध्ये नागरी युद्धाच्या धामधुमीत त्याच्या कविता गुणगुणत वीरांनी हौतात्म्य पत्करले. सगळ्या लॅटिन अमेरिकेत त्याच्या कवितांचा प्रभाव होता. फिडेल कॅस्ट्रो, चे गव्हेरा, एवढेच नव्हे तर क्रूरवर्मा म्हणून नावाजला गेलेला स्टालिनसुद्धा त्याच्या कवितांचा भोक्ता होता. चे गव्हेराच्या डायरीत पॅब्लो नेरुदा या एकाच कवीचा उल्लेख मिळतो. 'कॅंटो जनरल' ही कविता त्याला नुसती तोंडपाठ नव्हती तर हा जगविख्यात क्रांतिकारक आपल्या सहकाऱ्यांना प्रथम ही कविता ऐकवी आणि मगच त्याचे प्रशिक्षण सुरू करी.

एकाहत्तर सालचे 'नोबेल प्राईझ' पॅब्लोंना मिळाले. कदाचित साम्यवादी विचारसरणी असणाऱ्या प्रभावी विचारवंतांमध्ये हा मान क्वचितच मिळाला आहे. पॅब्लोंच्या शब्दांचे सामर्थ्य, जगावरचा त्यांचा प्रभाव आणि अमेरिकेत असणारी त्यांची लोकप्रियता या गोष्टींमुळेच नोबेल प्राईझ कमिटीला त्यांना डावलता आले नसावे.

पॅब्लो बेफाम आयुष्य जगले. जवळजवळ सगळ्या जगाचा त्यांनी संचार केला. अनेक वर्षे ते चिलीचे वेगवेगळ्या देशांमध्ये राजदूत होते. त्यांच्या कवितांनी त्यांना ते जेथे जातील तेथे प्रियतम मित्र मिळवून दिले. अफाट लोकप्रियता मिळवून दिली. चिलीमध्ये सरकार बदलल्यावर त्यांना निर्वासितांसारखे देशोधडी व्हावे लागले; पण त्यांच्या कवितांनी त्यांना साथ केली. पॅब्लोंना त्या निर्वासित अवस्थेत असंख्य चाहत्यांनी वाटेल ती मदत केली.

पुन्हा ते जेव्हा आपल्या देशात आले तेव्हा चिलीच्या कम्युनिस्ट पक्षाने पॅब्लोंना राष्ट्राध्यक्षपदासाठी उभे केले; पण तो त्यांचा पिंड नव्हता. सुदैवाने त्याच वेळी त्यांचा जवळचा मित्र डॉ. साल्वादोर आयेंद (Allende) याची उमेदवारी जाहीर झाली आणि आपल्या मित्रासाठी त्यांनी उमेदवारी मागे घेतली; पण आयेंदेच्या प्रचारमोहिमांत भाग घेऊन त्याला यशस्वी करण्यात त्यांनी सहभाग घेतला. आयेंदेनी त्यांना पॅरिसला चिलीचे राजदूत म्हणून पाठवले. त्याच वर्षी त्यांना नोबेल प्राईझ मिळाले. नोव्हेंबर ७२ मध्ये तब्येत बरी नसल्याने ते आपल्या देशात परत आले. सप्टेंबर ७३ मध्ये ११ तारखेला सैन्याच्या उठावात साल्वादोर आयेंदेचा खून झाला आणि त्यानंतर बारा दिवसांनी पॅब्लो मरण पावले!

आयुष्यभर पॅब्लो 'अधिकारशाही' बरोबर झगडले. सामान्य माणसाच्या दुःखात सहभागी झाले. लॅटिन अमेरिकेत अमेरिकन सत्ताधाऱ्यांच्या कारवायांनी ते सतत व्यथित असत. प्रत्येक हुकुमशहाविरुद्ध त्यांनी आवाज उठवला. प्रत्येक अन्यायाविरुद्ध त्यांनी काव्याची तोफ डागली. त्याचबरोबर

'पॅब्लो'चा जन्म चिलीमध्ये एका रेल्वेकामगाराच्या पोटी झाला; पण त्यांच्या कवितांनी अख्खे जग जिकले. पॅब्लोंच्या कवितांमध्ये क्रांतीचे बीज होते. स्पेनमध्ये नागरी युद्धाच्या धामधुमीत त्याच्या कविता गुणगुणत वीरांनी हौतात्म्य पत्करले. सगळचा लॅटीन अमेरिकेत त्यांच्या कवितांचा प्रभाव होता. फिडेल कॅस्ट्रो, चे गव्हेरा एवढेच नव्हे तर क्रूरकर्मा म्हणून नावाजला गेलेला स्टालिनसुद्धा त्यांच्या कवितांचा भोक्ता होता.

एकाहत्तर सालचे 'नोबेल प्राइझ' पॅब्लोंना मिळाले.

साम्यवादी विचारसरणी असणाऱ्या प्रभावी विचारवंतांमध्ये हा मान क्वचितच कुणाला मिळाला आहे.

जवळजवळ सगळचा जगाचा त्यांनी संचार केला. अनेक वर्षे ते चिलीचे वेगवेगळचा देशांमध्ये राजदूत होते.

असे वेगळे आयुष्य जगलेल्या पॅब्लो नेरूदांच्या काही आठवणी....

कामगार–श्रमिकांच्या सहनशीलतेबद्दल, लढयाबद्दल अभिमान बाळगला. म्हणून केवळ लॅटिन अमेरिकाच नव्हे तर सगळे श्रमिकाचे, पददलितांचे जग पॅब्लो नेरुदांच्या कवितांना आपले बायबल मानते आणि म्हणूनच ते खाणकामगारांना कविता वाचून दाखवत असताना तो एक कामगार उठून म्हणाला होता,

'खूप दिवसापासून मी तुला ओळखतोय माझ्या भावा!'

### भारताचं दर्शन

पॅब्लोनी आपलं आत्मकथन लिहिलय. अगदी साल्वाडोर आयदेच्या खुनापर्यंत म्हणजे त्यांच्या मृत्यूपूर्वी फक्त बारा दिवस ते लिहीतच होते. त्याचे हे आत्मकथन म्हणजे एका लोककवीने अनुभवलेला या शतकाचा इतिहासच आहे. त्यात या शतकातील अनेक प्रमुख घटनांच्या नोंदी आहेत. अनेक इतिहास घडवणाऱ्या व्यक्तीशी मुलाखती आणि त्यावरील टिपणे आहेत. मूळ स्पॅनिश भाषेतील हे आत्मकथन त्याच्या मृत्यूनंतर सहा महिन्यानी प्रकाशित झाले.

पहिल्या दोन प्रकरणांत पॅब्लोनी आपल्या बालपणचे आणि तारुण्यातील दिवसाचे वर्णन दिले आहे. आपले पहिले पुस्तक 'क्रेपुस्कुलारिओ' (Crepusculario) याच्या प्रकाशनाविषयी ते लिहितात—

'१९२३ मध्ये माझे पहिले पुस्तक प्रकाशित झाले. त्याच्या छपाईसाठी पैसे देण्यासाठी मला दररोज यातायात करावी लागली. माझ्याजवळचं फर्निचर मी विकलं, माझ्या वडिलानी गंभीरपणे दिलेलं घडयाळ, ज्यावर त्यानी दोन छोटे ध्वज कोरून घेतले होते त्याचीही लवकरच वाट लागली! माझा सूट घडयाळाच्या वाटेनेच गेला. मुद्रक भलताच हट्टी निघाला. शेवटी जेव्हा पुस्तक कव्हरसह तयार झाले तेव्हा लाल डोळे करून तो मला म्हणाला, 'नाही. सगळे पैसे दिल्याशिवाय एक प्रतही न्यायला मिळणार नाही!' अलोन या समीक्षकाने राहिलेले पैसे दिल्यावर मी माझी पुस्तके खांद्यावर घेऊन बाहेर पडलो. पायांत फाटलेला बूट होता; पण माझा आनंद काय सांगावा?'

या संग्रहातील एक कविता 'फेअरवेल' नावाची आत्यंतिक लोकप्रिय झाली. पुन्हा पॅब्लोंना आढळलं की, या कवितेने खूप दूरवर प्रवास केला आहे. अनेकांनी या कवितेची पारायणे केली. अनेक ठिकाणी पॅब्लो जात तेव्हा पॅब्लोचे नाव घेतल्याबरोबर कोणी तरी मुलगी उंच आवाजात 'फेअरवेल'चे बोल गुणगुणू लागे. काही वेळा तर काही मंत्रीसुद्धा प्रथम लष्करी सलाम करून या कवितेचा प्रथम चरण म्हणत असत!

पॅब्लोचे नाव साहित्यिक–वर्तुळात प्रसिद्ध होते न होते एवढयात पॅब्लोची राजदूत म्हणून निवड झाली आणि त्यानंतर पॅब्लो जगभर फिरत राहिले. प्रथम त्याना रंगूनला जायचे होते. त्या वेळी त्यांना भारताचे दर्शन घडले. कालीघाटावरील कालीपूजा त्यांनी पाहिली आणि

'आजचा दिवस चांगला आहे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेनास आम्ही हजर आहोत. स्वातंत्र्यलढयात गुतलेला देश. गॅलरीमध्ये हजारो कार्यकर्त्यांनी गर्दी केलेली आहे. मी गांधीना भेटतो आणि पंडित मोतीलाल नेहरूनाही. चळवळीचे आणखी एक अध्वर्यु आणि त्याचे चिरंजीव–तरुण रुबाबदार, इग्लंडहून नुकतेच परतलेले जवाहरलाल! नेहरूना स्वातंत्र्य हवे आहे, तर गांधी पहिली पायरी म्हणून साध्या स्वायत्ततेला अनुकूल आहेत. गांधी चतुर कोल्ह्याप्रमाणे एक व्यवहारी मनुष्य. आमच्या क्रिओल नेत्याच्या रांगेतील एक राजकारणी, समित्या मागचा मेंदू. कठोर राजकारणी, न दमणारा. लोकांचा जमाव त्यांच्या धोतराला आदराने हात लावून 'गांधीजी गांधीजी' म्हणत पुढे सरकताना ते हात जोडत आहेत आणि चष्मा न काढता स्मित हास्य करत आहेत. ते संदेश स्वीकारत आहेत. ते वाचून दाखवताहेत. तारांना उत्तरे देताहेत; पण कसलीही

धांदल नाही. अजिबात न दमणारे सत आहेत ते. नेहरू, त्यांच्या क्रांतीचा बुद्धिमान प्रचारक !

अधिवेशनाला हजर असणाऱ्यात आणखी एक मोठी व्यक्ती म्हणजे 'सुभाषचंद्र बोस' लोकांच्या भावना चेतवणारा वादळी नेता ! अतिशय प्रति–साम्राज्यवादी. त्यांच्या देशातील एक वेधक व्यक्तिमत्त्व. १९१४ च्या युद्धाच्या वेळी जपानी आक्रमणाऱ्या प्रसंगी ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध त्यांनी आक्रमकांची बाजू घेतली !'

पॅब्लो आपल्या कथनात अशा प्रकारे निवेदन करतात. स्वातंत्र्यकवी पॅब्लोंना भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे आकर्षण वाटले. भारताविषयी आत्मीयतेची भावना त्यांनी अगदी शेवटपर्यंत जोपासली. पुढे एकदा त्याना कटु अनुभव आला तरीसुद्धा त्यांचे हे प्रेम कमी झाले नाही.

...बटाव्हियामध्ये असताना हर्झ नावाचा जर्मन राजदूत त्यांच्या परिचयाचा झाला. तो एक रसिक संवेदनशील ज्यू होता. एके दिवशी पॅब्लोंनी त्याला विचारले–

'या हिटलरचे नाव अधूनमधून पेपरमधून येतं. हा ज्यूद्वेषी, कम्युनिस्टविरोधी गृहस्थ सत्तेवर येईल असं वाटतं का तुम्हाला ?'

'अशक्य !' तो म्हणाला.

'का बावा ? इतिहास तर विचित्र गोष्टींनी भरलाय.' पॅब्लो म्हणाले.

'पण तुम्हाला जर्मनी माहिती नाही.' तो म्हणाला. 'तो एक असा देश आहे की तेथे असल्या वेडपटाना एखादे गावही मिळवणे अशक्य आहे !'

## लोर्का–नेरूदा

ब्युनोझ आयर्समध्ये जेव्हा पॅब्लोची चिलीचा राजदूत म्हणून निवड झाली तेव्हा 'फेडरिको गार्सिया लोर्का'शी त्यांची भेट झाली. आपल्या 'ब्लड वेडिंग' या नाटकाच्या दिग्दर्शनासाठी तो आला होता. अर्जेन्टिनामधील लेखकांनी या दोघा महान साहित्यिकांचा गौरव केला तेव्हा या दोघांनी मिळून आभाराचे भाषण केले. म्हणजे एक वाक्य लोर्काने बोलायचे आणि त्याला जोडून दुसरे वाक्य पॅब्लोने फेकायचे. उदाहरणार्थ

नेरूदा– बंधूनो...

लोर्का– आणि भगिनीनो

नेरूदा– ब्युनोझ आयर्समध्ये 'रुबेन दारीओ' प्लाझा कोठे आहे ?

लोर्का– रुबेन दारीओचा पुतळा कोठे आहे ?

नेरूदा– अशी शंका माझा मित्र लोर्का...

लोर्का– आणि माझा मित्र नेरुदा याला आहे.

असा मजेदार कार्यक्रम त्यांनी रंगवला.

त्यानंतर पॅब्लो माद्रिदला गेले. तेथे त्याना लॉर्काचे बरेच मित्र भेटले आणि थोड्याच दिवसात स्पॅनिश साहित्यिकांशी त्यांचे पक्के सूत जमले. या मित्रांमध्ये मिग्युल हर्नान्डेझ नावाचा एक कवी होता. या कवीमध्ये पॅब्लोना असामान्य कवित्व आढळले. त्याला नोकरी नव्हती म्हणून पॅब्लोनी त्याच्यासाठी प्रयत्न केला. एक उच्चपदस्थ त्यांना मिळाला. त्याने मिग्युलच्या कविता वाचल्या होत्या व तो त्याचा चाहता होता. त्याने पॅब्लोना सांगितले की, त्याला कोणते पद पाहिजे हे सांगितले की ते मिळेल. पॅब्लोंनी मिग्युलला सांगितले की आता कोणतीही बडी नोकरी विचार करून साग.

मिग्युलने विचार केला. अगदी संध्याकाळपर्यंत विचार करून तो पॅब्लोकडे आला आणि म्हणाला–

'त्या साहेबांचा एखादा मेंढ्यांचा कळप असला तर तो राखण्याची नोकरी मला देईल की ?'

स्पॅनिश लेखक दमन गोमेझ डी ला सार्ना पॅब्लोना भेटला. पॅब्लोच्या मते हा स्पॅनिश भाषेतला सर्वात महान साहित्यिक. पॅब्लोनी स्पेनमध्ये काही मासिकाचे संपादन आणि काही कविता प्रकाशित केल्या.

या काळात लोर्का आणि पॅब्लो अत्यंत घनिष्ठ मित्र होते. एकदा पॅब्लो त्याला आपल्या कविता वाचून दाखवत असताना त्याने त्यांना मध्येच थांबवले. 'थाबा थांबा' तो म्हणाला. 'तुम्ही माझ्यावर आपला प्रभाव पाडत आहात.'

'लोर्का' चा स्पॅनिश भाषेवर मोठा अधिकार होता. त्याच्या मनमोकळ्या वृत्तीने, हसतमुख स्वभावामुळे पॅब्लो त्याच्याकडे अत्यंत आकर्षित झाले होते; पण १९ जुलैला त्याचा खून झाला त्या दिवशी पॅब्लोबरोबर तो एक कार्यक्रम बघायला येणार होता.

या 'लोर्का'च्या मृत्यूने पॅब्लो आत्यंतिक व्यथित झाले. क्राती आपल्या पिलाना प्रथम खाते असे म्हणतात. स्पॅनिश क्रांतीने पहिल्यादा आपल्याच भाषेतील सर्वात जास्त प्रतिभावंत लेखक गिळला होता !

फेडरिको गार्सिया उत्कट प्रतिभावंत होता. यादवी युद्धाच्या तीन महिने अगोदर त्याला एक स्वप्न पडले होते. एका जुन्या वस्तीजवळ तो थांबला होता त्या वेळी आतून एक कोकरू धावत आले. लोर्का त्याच्या हालचाली न्याहाळत असतानाच रानडुकराचा एक कळप त्या कोकरावर तुटून पडला. त्यांनी त्या अश्राप कोकराचा फडशा पाडला. स्वप्नातील हे दृश्य; पण कविमनाचा लोर्का त्याने हादरून गेला होता. त्याच्या मृत्यूशी पॅब्लो या स्वप्नदृश्याची संगत जोडतात.

पॅब्लोनी 'लोर्का' वर 'ओडा ए फेडरिको गार्सिया लोर्का' नावाची सुंदर कविता लिहिली. एकाने त्याना विचारले, त्यात 'त्याच्यासाठी दवाखाने निळे रंगवतात.' असं त्यांनी का लिहिलंय ?

'हे पाहा,' पॅब्लो म्हणाले, 'एखाद्या कवीला असा प्रश्न विचारणं, म्हणजे स्त्रीला तिचं वय विचारण्यासारखं आहे. कविता ही स्थिर गोष्ट नाही. कधीकधी निर्मात्याच्या हातून निसटून जाणारा असा तो प्रवाह आहे. त्याच कच्चं सामान म्हणजे अस्तित्वात असणाऱ्या आणि नसणाऱ्या गोष्टींचं बनलेलं असत आणि नसतंही. तरी पण मी उत्तर देण्याचा प्रयत्न करतो. माझ्या दृष्टीनं निळा रंग फारच सुंदर आहे. अवकाशाचे सूचन त्यात आहे. आभाळासारखा स्वातंत्र्य आणि आनंद याचा अनुभव देणारा. फेडरिकोचे अस्तित्व, त्याच्या व्यक्तिमत्त्वातील जादू यामुळे तो असाच अनुभव देई. माझ्या ओळीचा कदाचित असा अर्थ असेल की, दवाखानेसुद्धा त्यातलंही दुःख फेडरिकोच्या जादूई प्रभावाने बदलून सुंदर निळेशार बनले'

स्पेनमधल्या त्या रणधुमाळीने लॉर्काचा बळी घेतला. कवीनी जनतेची बाजू घेतली. मिग्युल हर्नान्देझनं गुराख्याचा वेश उतरला आणि सैनिकाची वस्त्रे धारण केली. उच्चरवात तो आपल्या कविता आघाडीवर ऐकवू लागला.

युद्धआघाडीवरच्या एका जुन्या मठात

पॅब्लोच्या मित्राने प्रेस उघडला आणि तेथे रणधुमाळीत पॅब्लोंचे 'इस्पॅना एन – एल कोरॉझोन' हे पुस्तक प्रकाशित झाले.

### नॅन्सी-अॅरॅगॉन

हे पुस्तक अत्यंत अफलातूनरीत्या प्रसिद्ध झाले. सैनिकांनी स्वतःच याचा टाइप तयार केला. त्याला कागद नव्हता. जवळच एक जुनी गिरणी होती. बॉबच्या वर्षावात सैनिकांनी मिश्रण तयार केले. या मिश्रणात शत्रूचे ध्वज होते, सैनिकांचे रक्तरंजित गणवेश होते; पण तरीसुद्धा कागद सुंदर तयार झाला. आजच्या युगातील एक दुर्मिळ पुस्तक म्हणून याची एक प्रत लायब्ररी ऑफ कॉंग्रेस, वॉशिंग्टन येथे ठेवण्यात आली आहे.


त्याच वेळी लोकसत्ताकाचा पराभव झाला आणि स्पेनच्या इतिहासातले एक अत्यंत दुःखद पर्व सुरू झाले. हजारोंनी स्पॅनिश निर्वासित फ्रान्सच्या दिशेने जाताना दिसू लागले. यामध्ये पॅब्लोंच्या कविता छापणारे शिपाईसुद्धा होते. त्यांच्याकडे पॅब्लोंच्या 'इस्पॅना' च्या प्रती होत्या. त्यातील ओळी गुणगुणत त्यांनी मरण पत्करले. या निर्वासितांच्या तांड्यावर बॉबिंग झाले की, त्यांच्याजवळच्या पॅब्लोंच्या कविता रस्त्यावर पडत. हा मान दुसऱ्या कवीला क्वचित मिळाला नसेल. आपल्या 'वंदे मातरम'चे भाग्य पॅब्लोंच्या कवितांना मिळाले.

पॅब्लोंचा मित्रकवी मिग्युल हर्नान्देझ मात्र तुरुंगाच्या भिंतीत रोगग्रस्त होऊन मेला! त्याच्या जवळच्या मित्रांनीसुद्धा त्यांना आश्रय नाकारला. पॅब्लो याला 'बुलबुल' म्हणतात. त्याला बंदीवास मानवला नाही!

लोकांची बाजू घेतल्याबद्दल पॅब्लोंना चिलियन सरकारने त्यांच्या अधिकारपदावरून दूर केले.

पॅब्लो पॅरिसला आले आणि येथे त्यांना दोन नवे मित्र मिळाले. 'पॉल एल्युअर्ड' आणि अॅरॅगॉन, हे दोन प्रख्यात साहित्यिक. यांच्या सहवासात पॅब्लोंना फ्रेंच साहित्यातील मूलभूत जे आहे त्याचा परिचय झाला आणि या दोघांत प्रचंड फरक असूनसुद्धा पॅब्लोंच्या मैत्रीच्या आड त्यातले काही आले नाही.

या काळात नॅन्सी कनार्ड या मनस्वी कलावतीच्या ते संपर्कात आले. नॅन्सीच्या घरातच एक छापखाना होता. पॅब्लोंनी



जनसामान्यांच्या हृदयात विराजमान झालेला महाकवी

तिच्याबरोबर एक कवितासमीक्षणाचे मासिक तेथून काढले. 'स्पेन' वरील बऱ्याच कविता त्यांनी छापल्या. स्पेनमध्ये जो रक्तपात झाला होता त्याने कवी हादरून गेले होते.

नॅन्सी एक अफाट स्त्री होती. उच्च कुलात जन्माला आलेल्या नॅन्सीने आपल्या भावनांपुढे कोणाची पर्वा केली नव्हती. १९३० सालात एका काळ्या माणसाबरोबर पळून जाऊन तिने इंग्लंडची सरंजामशाही हादरवून सोडली होती. तिच्या आईने वकिलाकरवी तिचे सगळे हक्क तोडले होते. याला उत्तर म्हणून तिने सगळ्या सरंजामदारांना 'निग्रो मनुष्य आणि उच्चकुलीन गोरी स्त्री' नावाचे एक पत्रक पाठवले होते.

नॅन्सी काळ्या लोकांची समर्थक होती. तिचे शब्द अंगारासारखे असत. ती म्हणे 'समजा तुमच्या गोऱ्या स्त्रिया किंवा तुम्हालाच पळवून नेण्यात आले, मारझोड झाली, तुमच्या पायांत साखळ्या पडल्या, एखाद्या जहाजातून नेऊन तुमची गुलाम म्हणून विक्री झाली, मानवी विद्रूपतेचे दर्शन म्हणून तुमचे प्रदर्शन झाले, चाबकाच्या तालावर चतकोर भाकरीसाठी तुम्हाला राबवण्यात आले, तर तुमच्या उच्च वंशाचे काय होईल?'

काळे लोक या सगळ्यातून वर उठले. त्यांच्यातून चांगले खेळाडू पैदा झाले. त्यांनी जगाला अत्यंत कर्णमधुर असे संगीत दिले, यातूनच ते चांगले आहेत; गोऱ्यांपेक्षा उच्च दर्जाचे आहेत हे सिद्ध होते; असे तिचे मत होते.

काळ्या लोकांच्या कारणासाठी नॅन्सी

सर्वत्र फिरली. सर्वत्र त्यांना न्याय मिळावा म्हणून ती झटली. तिने हालअपेष्टा, वनवास सहन केला. पॅब्लोचे आणि तिचे शेवटपर्यंत मैत्रीचे सबंध राहिले. पॅब्लोना ती म्हणजे क्रांतीची जिवंत कविता वाटत होती. आयुष्य-भर उपेक्षा सहन केलेल्या नॅन्सीला नतर मृत्यु आला तोही भयानकच !

पॅब्लोंसारख्या महाकवीने आपल्या आत्म-कथनातील काही पाने नॅन्सीवर खर्च करावीत यातच तिचे मोठेपण आहे.

अॅरॅगॉनशी त्यांचा खरा संबंध आला तो अॅंटी-फॅसिस्ट कॉंग्रेसच्या निमित्ताने. त्याची काम करण्याची क्षमता अफाट होती. अनेक तास तो काम करीत असे. रशियन आणि इंग्लिश लेखकांची भाषातरे तपासून पुन्हा शांतपणे प्रुफरीडिंगच्या वेळी त्याच चुका दुरुस्त करताना जेव्हा पॅब्लोनी पाहिले तेव्हा त्या फ्रेंच कवीची कार्यक्षमता त्यांनी मानली. *या काळात पॅब्लोना नोकरी नव्हती.* अॅरॅगॉन-कडे काम केल्याबद्दल त्यांना चारशे फ्रॅंक मिळत. त्यावर कशीबशी ते आणि त्यांची बायको गुजराण करीत होते. त्या वेळी या अॅंटीफॅसिस्ट कॉंग्रेसचा खर्च भागवण्यासाठी एक मोठया रकमेचा चेक 'स्पेन' च्या सरकारने त्यांच्याकडे पाठवला.

त्या रकमेचे काय करावे हे पॅब्लोंना कळेना. राफाएल आल्बर्टी या मित्राजवळ त्यानी तो विषय काढला. त्या कॉंग्रेसच्या पाठीमागे जी सघटना (अॅरॅगॉन वगैरे असलेली.) त्यांनाच ते पैसे द्यावेत अस त्यानी ठरवलं होतं.

'तुम्ही अतिशय मूर्ख आहात.' आल्बर्टी पॅब्लोना म्हणाला, 'स्पेनसाठी तुम्ही आपली राजदूताची नोकरी गमावलीत आणि फाटके बूट घालून पायपीट करता आहात. तुमच्या वैयक्तिक गरजासाठी आणि कामासाठी काही हजार फ्रॅंक्स तुम्हाला बाजूला ठेवता येत नाहीत ?'

ते खरं होतं; पण पॅब्लोचा तो स्वभाव नव्हता. शेवटी आल्बर्टीनेच त्यांना एक नवा जोड आणून दिला.

अनेक अडचणीवर मात करून अखेर पॅब्लो अनेक कार्यकर्त्यांबरोबर माद्रिदला आले. सगळ्या जगातून महान लेखक, कवी यासाठी आले होते. पैकी काही पॅब्लोचे चाहते होते, काही विरोधक होते; पण सर्व फॅसिझम-विरोधी होते. पॅब्लोंच्या देशातील हुईडोब्रो हा महान कवी काही कारणास्तव पॅब्लोचा विरोधक बनला होता. त्याची सूट-केस हरवली होती. तो त्यावरून गोंधळ घालताना प्रसिद्ध फ्रेंच लेखक आंद्रे मालरा त्याच्यावर प्रचड खवळले. त्याचाही राग त्या चिलियन कवीने पॅब्लोमुळेच असे गृहीत धरले.

## मायदेशीचा प्रतिसाद

कविता म्हणजे शाती. पॅब्लोंच्या भाषेत 'पीठ जसे पावात तसा शांतीत कवी.' आतापर्यंत जे जे नरराक्षस हुकुमशहा झाले, त्यानी प्रथम कवीचाच शोध केला आहे. रशिया अजून ज्या महान कवीच्या शब्दावर डोलतो त्या पुष्कीनला एका दहशतवाद्याने जखमी करून झाडीत फेकून दिले होते. महान पेटोफीच्या मृत देहावरून क्रूरकर्म्यांचे घोडे दौडत गेले होते. स्पेनचा महान कवी 'लोर्का' याच्या खुनानेच इतिहासातील एक रक्तरंजित पान सुरू झाले नव्हते का ?

आपला परममित्र राफाएल आल्बर्टी याचे उदाहरण पॅब्लो देतात. हजारो वेळा त्याने मृत्यूला हुलकावणी दिली. अनेक ठिकाणी त्याच्यावर प्रयत्न झाले; पण तो वाचला ! पॅब्लो म्हणतात—

'पण कविता मेली नाही. तिचे मांजरा-प्रमाणे नऊ जन्म आहेत. ते तिचा छळ करतात. रस्त्यावरून तिची धिंड काढतात, तिच्यावर थुकतात, तिची थट्टा करतात, तिला ठार करण्याचा प्रयत्न करतात तिला हद्दपारी भोगावी लागते. तुरुंगवासही; पण ती या सगळ्या प्रयत्नातून बाहेर पडते तेव्हा तिचा चेहरा तांदळाच्या कणाप्रमाणे सतेज असतो. ती मद स्मित करीत असते !'

आल्बर्टी सैनिकाच्या खांद्याला खांदा लावून लढला. तो ज्या भागातून आला तो भाग कवितेचाच. तो सदैव कवीच होता; पण त्याला स्वत:ला ते उशीरा समजलं.

आल्बर्टीनं सुनीतं लिहिली. बराकीत आणि आघाडीवर त्यानं ती गायली. पॅब्लोंच्या मते काव्यातील गनिमी कावा त्याला उमगला होता. कवितेचं युद्धाविरुद्धचं युद्ध त्यानं खडं केलं. पॅब्लोच्या या मित्रांनी स्पॅनिश भाषेला बहर आणला. त्यात अगार आणले.

रशियन कवी 'मायकाव्हस्की' यांच्याशी तुलना करण्यासारखं त्याच काव्य होतं. कविता स्फूर्तिदायी, शक्तिदायी, आनदमयी वत्सल कविता. ज्याने स्पेनमधले दगड उठले आणि त्यानी फॅसिझमशी मुकाबला केला.

¤

त्यानंतर पॅब्लो मायदेशी परतले. त्या वेळी 'हिटलरिझम' चिलीमध्ये डोके वर काढू लागला होता. लॅटिन अमेरिकेतील जर्मन वंशाचे लोक हिटलरच्या यशाने भारावून गेले होते.

चिलीमध्ये 'स्वस्तिक' चिन्हांकित ध्वज दिसू लागले होते. एकदा फोनच्या वापरासाठी पॅब्लोंना हिटलरला सलामी द्यावी लागली. कारण फोनचा मालक जर्मन होता.

पॅब्लोनी चिलीमध्ये एक 'अरोरा डी चिलो' नावाच्या मासिकाचे संपादन चालवले होते. यातून त्यानी नाझीविरोधी प्रचार चालू केला. हिटलरचा चिलीमधील राजदूत चिलीच्या लायब्ररीला नाझी प्रचार पुस्तके भेट देत होता. पॅब्लोनी वाचकाना आवाहन केले की, खऱ्या जर्मनीसंबंधी किंवा हिटलरने दाबून टाकलेल्या जर्मनीविषयी जी पुस्तके त्यांच्याकडे असतील ती त्यानी त्यांच्या मासिकाकडे पाठवावीत.

वाचकानी उदंड प्रतिसाद दिला. पाचशे पुस्तके हेइन, थॉमस मान, आइन्स्टीन, झ्वाईग इत्यादी लेखकाची ती पुस्तके होती. विरोधी बाजूनी पॅब्लोंना धमक्या मिळाल्या. घाणीनं भरलेली पाकिटं आली. स्ट्राइचरनं संपादलेल्या ज्यूविरोधी पिवळ्या (Yellow) मासिकाचे गठ्ठे मिळाले; पण पॅब्लो विचलित झाले नाहीत. त्यांनी ही पाचशे पुस्तके चिलीच्या नॅशनल लायब्ररीला द्यायचे ठरवले.

पण नॅशनल लायब्ररीने ही पुस्तके घ्यायचे नाकारले. पॅब्लोंनी एक मोर्चा काढला आणि युनिव्हर्सिटीच्या कॉन्सिल हॉलकडे नेला तेथे एका मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली कसला तरी समारंभ चालला होता. पॅब्लोंनी सरळ त्या पुस्तकाचे गठ्ठे व्यासपीठावर नेऊन ठेवले.

मंत्रीमहोदयानी विचार केला आणि नॅशनल लायब्ररीला पुस्तके स्वीकारण्याचा आदेश दिला. अशा प्रकारे आपल्या देशातच नाझीवादाला शह देण्यात पॅब्लो यशस्वी झाले.

स्पेनमधील जे निर्वासित फ्रान्समध्ये गेले होते, जवळजवळ पाच लक्ष लोक. याना फ्रेंच सरकारने छळछावण्यात कोंडले होते. त्यांच्या छळांच्या बातम्या चिलीमध्ये येऊ लागल्या होत्या. चिलीमध्ये जे नवे प्रादेशिक सरकार आले होते, त्या सरकारने पॅब्लोवर एक नवी जबाबदारी टाकली—या कैद्याना तुरुंगातून सोडवून चिलीला आणण्याची.

पॅब्लो अतिशय आनंदित झाले. स्पेनच्या त्या उदात्त सुपुत्रांना त्याच्या हालअपेष्टांतून, दैन्यातून, विजनवासातून सोडवण्याचे महान कार्य त्याची कविता करणार होती. चिलीचा अध्यक्ष सेर्डा त्यांना म्हणाला, 'होय, हजारो स्पॅनिश माझ्याकडे घेऊन या.' त्या सर्वांसाठी आपल्याकडे काम आहे.'

पॅब्लो पॅरिसला आले. त्यांच्या देशातील सरकार बदलले होते; पण पॅरिसमधील वकिलात तशीच होती. तिथल्या कडक इस्त्रीतल्या अधिकाऱ्यांना स्पॅनिश चिलीला पाठवायची योजना कशीशीच वाटली. त्यांनी पॅब्लोशी सहकार्य करायचे नाकारले आणि त्याची जेवढी कोंडी करता येईल तेवढी केली. अगदी लिहिण्यासाठी ताव द्यायचे सुद्धा त्यांनी नाकारले. त्याचे ऑफिस त्यानी स्वयंपाकघराजवळ ठेवले. पॅब्लोच्या प्रयत्नाने स्पॅनिश वीर आता वकिलातीत येऊ लागले होते. यात युद्धात जखमी झालेले अनेक होते.

वकिलातीतील सूडबुद्धींनी एक नवी योजना काढली. या स्पॅनिश लोकांना पाणी पिण्यासाठी वकिलातीच्या चौथ्या मजल्यावर यावे लागे. या महाभागांनी 'लिफ्ट'ची सेवाच बंद करून टाकली. छळछावण्यात दुर्बल झालेल्या युद्धात जखमी झालेल्या त्या स्पॅनिश वीरांना पाण्यासाठी कष्टाने जिने चढताना पाहून पॅब्लोंचा जीव कळवळायचा; पण ते महाभाग वकिलातीतील अधिकारी मात्र क्रूर हसायचे !

तेवढ्यात चिलीने आणखी एक मनुष्य पॅब्लोच्या मदतीला लावून दिला. हा बाजूबदल्या होता; पण मोठ्ठा मिठ्ठास बोलायचा. पॅब्लोंच्या मित्रांमध्येसुद्धा त्याने झटकन वशिला लावला. *पॅब्लोना त्याच्यात काही तरी वाईट आहे असे जाणवले; पण नेमके काय ते कळेना.*

नंतर पॅब्लोना कळले की, तो ऐशआरामी होता. त्याला पैसे खायची सवय होती. एकदा पॅब्लोनी त्याचा सोक्षमोक्ष लावला तर तो अक्षरशः रडायला लागला. पुन्हा पॅब्लो त्याला भेटले नाहीत. पॅब्लो गेल्यानंतर त्याला दोन स्पॅनिश निर्वासित भेटायला आले तेव्हाही तो रडतच होता. अश्रू भरल्या नजरेने त्यांना तो म्हणाला, 'नेरुदानी मला आताच सागितलेय की तुम्हा दोघांना ते गेस्टापोंच्या हवाली करणार आहेत. त्या धक्क्याने मी रडतोय. ती सूटकेस ठेवून पळा !'

आणि ते दोघे सूटकेस ठेवून पळाले आणि ती सूटकेस घेऊन पॅब्लोच्या मदतीसाठी चिलीच्या सरकारने पाठवलेला तो असिस्टंट मध्यपूर्वेकडे आपल्या प्रेयसीसह पळाला !

त्या सूटकेसमध्ये स्पॅनिश कामगार युनियनचे नव्वद हजार डॉलर्स होते.

अर्थात ही पुढची हकिकत पॅब्लोना नंतर समजली.

एके दिवशी मात्र कहर झाला. चिलीच्या राष्ट्राध्यक्षाने, ज्याने स्पॅनिश लोकांना घेऊन या म्हणून पाठवलं होतं, त्यानेच तार केली आपण स्पॅनिश निर्वासिताना घेऊन चिलीला येत आहात असं ऐकून धक्का बसला. ताबडतोब या चुकीच्या बातमीचा इन्कार करावा.

पॅब्लोना आकाश कोसळल्यासारखं झाल. निर्वासिताची निवड करणे, त्यांच्या पाठवण्याच सयोजन करणे हे काम त्यानी किती कष्टानं पार पाडलं होतं. अजूनही निर्वासित येतच होते. *त्यांना काय सागायच ? आपला* वनवास संपला म्हणून ते किती खुशीत होते. स्पेनच्या भूमिगत सरकारने 'विनियोग' नावाचं जहाजही त्यासाठी विकत घेतलं होतं. त्यातून हे निर्वासित जाणार होते. बरं, त्या अध्यक्षान स्वतःच हे काम पॅब्लोवर सोपवलं होतं. तो एवढ्यात बदलला कसा ?

वकिलातीतील अधिकारी मात्र खुश झाले होते.

स्पॅनिश भूमिगत सरकारबरोबर चर्चा करून पॅब्लोंनी त्यांच्या देशाच्या परराष्ट्र*मन्त्र्याला फोन लावला आणि स्पष्ट सागितले* की, त्यांना प्रथम जो आदेश मिळालाय त्यानुसारच ते वागणार. अध्यक्ष पुन्हा पुन्हा विचार बदलत असतील तर अशक्य आहे.

तो मंत्री प्रामाणिक होता. त्याने आपल्या जागेचा राजिनामा दिला. पॅब्लोना दिलेले अधिकारपत्र मागे घेण्यास त्याने नकार दिला. कॅबिनेटमध्ये चर्चा झाली आणि राष्ट्राध्यक्षांना पुन्हा एकदा विवेकाची टोचणी लागली. त्यांच्यावरचे दडपण त्यांनी झुगारून दिले आणि पॅब्लोंना परत तार पाठवली. 'स्पॅनिश लोकांना घेऊन निघा !'

मग 'विनिपेग' स्पॅनिश लोकाना घेऊन निघाले. तो आनंदाचा दिवस होता. अनेक एकमेकांपासून बिछडलेले त्या बोटीत एकत्र भेटले आणि आनंदाने रडले. या आनंदपर्वाचा संयोजक होता 'पॅब्लो, नेरुदा' आणि नेरुदांच्या मागे होती त्यांची कविता !

## शांततेचे दूत

त्यानतर सरकारने त्यांना 'मेक्सिको'ला पाठवले.

या वेळी 'दिएगो रिव्हेरा' या मेक्सिकन पेंटरशी त्यांची मुलाखत झाली. दिएगो गमत्या होता. त्याच्याकडे अनेक स्टोऱ्या असत. एकदा अतिशय गंभीरपणे त्याने पॅब्लोंना सागितले, जनरल रोमेलचा खरा बाप तोच आहे; पण ते गुप्त ठेवणे अतिशय आवश्यक आहे. (रोमेलसाठी !)

'सिक्वेरीज' नावाचा दुसरा महान चित्रकार त्या वेळी तुरुंगात होता. त्याला पॅब्लोनी हिकमती लढवून चिलीला पाठवून दिला. चिलीमध्ये सुंदर सुंदर चित्रे काढून सिक्वेरीजने चिलीच्या वैभवात भर टाकली; पण चिलीच्या सरकारने मात्र पॅब्लोच्या या महान सांस्कृतिक कामगिरीचे बक्षीस म्हणून त्यांना दोन महिने त्यांच्या वकिलातीच्या कामातून रजा दिली. म्हणजे त्यांना दोन महिने निलंबित केले !

पॅब्लोनी गटेमालाला एक भेट दिली. त्या वेळी तेथे 'युबिको' नावाचा हुकुमशहा होता. त्याने गटेमालात भलतीच दहशत

**पॅब्लोंना आकाश कोसळल्यासारखं झालं. आता निर्वासितांना काय सांगायचं ?**

बसवली होती. गटेमालन लोक या युबिकोला भयकर घाबरायचे. त्याच्या एका सेक्रेटरीने कोणत्या तरी एका साध्या बाबीत त्याला विरोध केला म्हणून स्वत: युबिकोने त्याला खांबाला बाधून फोडले होते.

'युबिको' च्या परवानगीने पॅब्लोच्या कविता-वाचनाचा कार्यक्रम गटेमालातील त्याच्या मित्रानी आणि साहित्यिकानी ठरवला होता. खुद्द पोलिसप्रमुख पहिल्या ओळीत बसला होता. तो मध्येच उठला तर चार मशिनगन्स सज्ज होत्या–प्रेक्षक आणि पॅब्लोसाठी.

पण पॅब्लोच्या सुदैवाने तसे काही घडले नाही. पॅब्लोच्या कविता त्या पोलिसप्रमुखाने कसलीही हालचाल न करता शेवटपर्यंत ऐकल्या.

कार्यक्रमानंतर कोणी तरी पॅब्लोना सांगितले की, युबिकोची त्यांच्याशी हस्तांदोलन करण्याची इच्छा आहे.

पण स्वत:ला नेपोलियन समजून त्याच्याप्रमाणेच कपाळावर एक बट सोडून, नेपोलियनच्या पोझमध्ये फोटो काढून घेणाऱ्या त्या नादान हुकुमशहाला न भेटताच पॅब्लो मेक्सिकोला परतले !

मेक्सिकोत त्या दिवसांत रिव्हॉल्वरचे वेड होते. एकदा मेक्सिकन कवीच्या एका गटाने पॅब्लोंना पिकनिकला नेले. पंधरा ते वीस कवी आणि पॅब्लो एका फुलांनी शृगारलेल्या बोटीतून प्रवास करीत होते. एका कवीने आपलं पिस्तूल काढलं आणि एक मान पॅब्लोचा म्हणून त्या पिस्तुलानं त्यानी हवेत बार काढावा अशी विनंती केली. तेवढ्यात दुसऱ्यानेही काढलं आणि मग सगळ्यांनीच पॅब्लोना त्यांच्या पिस्तोलातून बार काढावा अशी विनती केली. प्रत्येकाचं पिस्तूल त्यांच्या डोक्याजवळ पाहून पॅब्लोंना तो धोका वाटू लागला. मग पॅब्लोंनी जवळची एक पेटी उचलली आणि ते म्हणाले,

'मित्रांनो, आपण सगळे कवी आहोत. शांततेचे दूत आहोत. कविता आणि शांती याच्या नावाने सर्वांनी आपली पिस्तूल्स या पेटीत टाकावीत असं मी आपल्याला विनवतो आहे!'

सर्वांनी ती विनंती मानली आणि पिस्तूल्स त्यात टाकली. प्रवास सपेपर्यंत पॅब्लोनी ती पेटी पुन्हा उघडू दिली नाही.

◻

मेक्सिकोमध्ये असताना पॅब्लोना पर्ल हार्बर हल्ल्याची चाहूल लागली होती. एक दिवस अमेरिकेत काही राजकीय हेतूसाठी आलेले काही जपानी त्याच्याकडे चिलीचा व्हिसा मागू लागले होते. कारण चिलीमध्ये त्याना जपानला जाणारी बोट पकडायची होती; पण ती बोट मेक्सिकोकडून जायची. त्या जपान्यांनी त्याना सांगितले की, या खेपेला ती येणार नाही. तेव्हा त्यांना चिलीलाच जायला हवे.

पॅब्लोना सशय आला हे जपानी एवढ्या तातडीने परत का निघालेत ? तीस वर्षांत प्रथमच जपानी बोटी मार्ग का बदलताहेत ? त्याच्या देशाचे धोरण बदलले असावे. पॅब्लोंशी त्यांनी बराच वाद केला; पण पॅब्लोनी त्याना व्हिसा दिला नाही. पॅब्लोनी फ्रेंचांशी संपर्क साधला; पण त्याना ही बाब गंभीर वाटली नाही. तेवढ्यात ते जपानी राजकीय पासपोर्टवर चिलीला गेले आणि तेथून जपानला गेले.

एक आठवड्यात पर्लहार्बरवर बाँबहल्ला झाल्याची बातमी आली.

## कम्युनिस्ट पक्षाचे सभासद

मेक्सिकोमध्ये ते असताना एक अत्यत वाईट घटना घडली.

एका कारखान्यात संप चालू होता आणि तो मिटण्याची काही लक्षणे दिसत नव्हती. त्या कामगारांच्या बायकांनी अध्यक्षांना भेटून आपली गाऱ्हाणी मांडायचे ठरवले. वाटेत त्यांनी अध्यक्ष आणि त्याच्या पत्नीसाठी काही फुले घेतली. त्या अध्यक्षाच्या राजवाड्यात आल्या; पण दरवाजातच त्यांना अध्यक्षाच्या संरक्षकदलाने अडवले. अध्यक्षानी त्यांची भेट घ्यायला नकार दिला होता.

त्या बायकांनी विनवून सांगितले. आम्हाला अध्यक्षाना भेटलं पाहिजे. आमची पोरं उपाशी आहेत. त्यांनी काही केलं तरच हा संप मिटेल.

पण ते संरक्षक काही ऐकेनात. त्या बायकांनी तेथून हलायला नकार दिला.

अचानक संरक्षकदलाने त्या गरीब बायकावर गोळीबार चालू केला. सहा-सात बायका ठार झाल्या आणि इतर बऱ्याच जखमी झाल्या.

ताबडतोब त्याची अंत्ययात्रा काढण्यात आली; पण त्याला हजर राहण्याचे धैर्यही मेक्सिकन लोकानी दाखवले नाही. एका क्रांतिकारक म्हणवल्या जाणाऱ्या कामगारनेत्याने भाषण केले; पण त्या निष्पाप जीवांच्या हत्येबद्दल निषेधाचा एक शब्द त्याने काढला. दुसऱ्या दिवशी सगळ्या वृत्तपत्रांतून बातमी आली.

पण एकानेही त्याचा निषेध केला नाही. चौकशीची मागणी केली नाही. मेक्सिकोच्या हुकुमशहाला ते एवढे घाबरत होते.

पॅब्लोच मन त्या निष्पाप बायकांबद्दल अतिशय कळवळलं. मरेपर्यंत ती स्मृती, अन्यायाची आणि चीड आणणाऱ्या सहनशीलतेची त्याना भेडसावत राहिली.

◻

चिलीकडे परत येताना ते पेरूमध्ये थाबले. 'माच्च्यु पिच्यु'च्या उध्वस्त अवशेषात फिरत असताना त्यांना प्राचीन अमेरिकेच वैभव जाणवलं.

पुन्हा ते चिलीला परत आले. चिलीच्या खाणकामगारांनी त्याना निवडून दिले. त्या खाणकामगारानी पॅब्लोवर नितांत प्रेम केले. राजकारणात पडण्याच्या आपल्या निर्णयाबद्दल ते म्हणाले–

'मी काही कम्युनिस्ट नाही; पण मला चिलीचा कवी व्हायचे असेल तर मी पॅब्लो नेरूदासारखा होईन. इथे तुम्हाला एक बाजू घ्यायला पाहिजे. एक तर कॅडिलॉकवाल्याच्या बाजूला नाही तर गरीबांच्या बाजूला, ज्याना शिक्षण मिळत नाही, अशा फाटक्या बूटवाल्याच्या बाजूला.'

पॅब्लो खाणकामगारांत रमले. त्यांच्याशी एखाद्या दुकानात, एखाद्या गिरणीत अशा त्याच्या सभा होत. आता या कामगारांची स्थिती जरा बरी झाली. यापूर्वी जरा आवाज काढला तर त्यांना कुत्र्याप्रमाणे गोळ्या घातल्या जात.

एकदा पॅब्लोना सभा घ्यायची परवानगी नाकारण्यात आली; पण पॅब्लोनी वाळवटात त्यांची सभा घेतली. निम्मे भाषण होते तोवर लष्कराचा रणगाडा समोर येऊन उभा राहिला; पण अजिबात शांतता न ढळू देता पॅब्लोंनी सभा पूर्ण केली.

चिलीमधली कम्युनिस्ट चळवळ लुईस

रिकाबॅरन याच्यामुळे उभी राहिली. याचे व्यक्तिमत्त्व प्रचंड होते. अनेक संघटना त्याने उभ्या केल्या आणि पधराएक वृत्तपत्रे तो सपादित करत होता. पॅब्लोवर त्याचा मोठाच प्रभाव होता.

कामगारासमवेतच्या या काळात पॅब्लोना त्याचे जीवन, दैन्य, विवचना जवळून पाहायला मिळाल्या. (चिलियन माणसाला दिवसातून अनेक वेळा चहा लागतो. त्यामुळे चहाची टंचाई आली तरी चिलीमध्ये राष्ट्रव्यापी संप होऊ शकतो. इतरांना हे मजेदार वाटेल.) पॅब्लोंना त्याची उत्कटपणे जाणीव झाली.

अनेक वेळा हे कामगार पॅब्लोंना विनंती करत, 'आम्हाला तुमच्या कविता ऐकवा!' सगळ्यांना त्या कविता समजत असे नाही; पण पॅब्लोची आत्मीयता त्यांना पटली होती. पॅब्लोच्या कवितांतून त्यांना आपले दर्शन घडे. लोक त्या कवितांबरोबर हसत, रडत, पॅब्लोंच्या सुरात सूर मिसळून गात.

पॅब्लोंचा परिवार वाढला होता. दुःखीकष्टी कामगाराचे ते बाप बनले होते. त्या काळात पॅब्लो कम्युनिस्ट नव्हते; पण जुलै १५. १९४५ या दिवशी ते रीतसर कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य बनले.

## मातृभूमीचा निरोप

अध्यक्षीय उमेदवारामध्ये 'वायडेला' नावाच्या उमेदवाराने चिलीतील सामान्याच्या विवचना दूर करण्याची शपथ घेतली. प्रत्येक कामगाराला न्याय मिळवून द्यायची त्याने हमी दिली. सर्वांच्या आशा त्याच्याभोवती गोळा झाल्या. पॅब्लोनी स्वतः त्याची प्रचारसूत्रे हातात घेतली. वायडेला बहुमताने चिलीचा राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आला.

पण एकदा सूत्रे हातात आल्यावर तो बदलला. तो काही इतर हुकुमशहांप्रमाणे कडवा नव्हता; पण फक्त भाषणबाजी करणारा वायडेला अध्यक्ष म्हणून दुबळा होता. तो उच्चवर्गातील अन्यायी बुजुर्गांच्या हातातील बाहुले बनला. त्याने चिलीमध्ये दडपशाही सुरू केली आणि लोकांच्या लक्षात येण्यापूर्वीच चिलीचे तुरुंग राजकैद्यांनी भरले. त्याच्या विवेकाच्या टोचणीने त्याची झोप गेली; पण त्याला हलवणाऱ्या शक्तीपुढे तो हतबल बनला आणि पॅब्लोच्या डोळ्यादेखत, त्यानी ज्याचा उदड प्रचार केला होता त्यानेच त्याच्या मायभूमीला एक तुरुग बनवला!

पॅब्लोंनी त्याच्या निषेधाच्या सभा घ्यायला सुरुवात केली. पॅब्लोंचे शब्द, त्याची कविता अंगार बनली आणि तिने चिलियन जनतेला पेटवायला सुरुवात केली.

पॅब्लोच्या विरुद्ध वॉरंट निघाले. पॅब्लो भूमिगत झाले. चिलीतले प्रत्येक घर पॅब्लोंचे होते ते दररोज एका घरात राहात. डॉक्टर्स, इंजिनियर्स, वकील, कामगार, शेतकरी या सर्वांनी पॅब्लोची सोय केली.

या भूमिगत काळातच पॅब्लोंनी 'कँटो जनरल' नावाचे आपले महत्त्वाचे पुस्तक पूर्ण केले आणि पॅब्लो चिलीच्या दक्षिणेस निघाले.

पॅब्लो कोठे आहेत, काय करताहेत याची इत्यंभूत माहिती फक्त एकाच माणसाला असे. पॅब्लोंचा सेक्रेटरी. अविरत काम करून या माणसाने या भूमिगत काळात पॅब्लोना सांभाळले. तो मरेपर्यंत त्याने पॅब्लोंबद्दल एक शब्द बाहेर पडू दिला नाही!

त्यानंतर अनेक अडचणीतून प्रवास करीत पॅब्लो एका जंगलात येऊन राहिले. ज्याच्या जंगलात येऊन ते राहिले, तो त्या भागातील एक मातब्बर असामी होता. तो स्वतः राष्ट्राध्यक्ष 'वायडेला' चा मित्र होता; पण तो काही तत्त्वांना मानणारा मनुष्य होता. एक दिवस तो पॅब्लोना भेटायला आला. 'पेपे रॉड्रिग्ज' हे त्याचे नाव. तो वायडेलाचा मित्र होता पॅब्लोंना पकडायला बक्षीस होते; पण तो भला माणूस पॅब्लोंचा मित्र बनला आणि ती मैत्री अखेरपर्यंत टिकली. त्याने स्वतःच्या देखरेखीखाली पॅब्लोंची चिलीबाहेर जाण्याची व्यवस्था केली.

'वायडेला' च्या या मित्राला नंतर वायडेलाने खोट्या आरोपाखाली तुरुंगवास घडवला आणि पॅब्लोंना अत्यत कठीण समयी साथ केलेल्या रॉड्रिग्जला शेवटचे दिवस निर्धन अवस्थेत दैनावस्थेत काढावे लागले.

चिलीची सीमा पार करताना पॅब्लोनी एका भिंतीवर लिहिले, 'मायभूमी, मी तुझा निरोप घेतोय; पण जाताना तुला बरोबर घेऊन जातोय!'

अर्जेंटिनामधील एका खेडेगावात ते थाबले. तेथील एका पॉश हॉटेलमध्ये त्याना राहायचे होते; पण तो हॉटेलवाला त्याचा अवतार बघून, त्यांना आत घेईना; पण एका लष्करी अधिकाऱ्याने त्यांची बाजू घेतली आणि त्यांना प्रवेश मिळाला. पॅब्लोचा मित्र रामिरेझ आल्यावर ते ब्युनोस आयर्सला निघाले.

पॅब्लोना पासपोर्टची अडचण होती. चिलीचे सरकार त्यांच्यासाठी अडचणी निर्माण करत होते; पण त्यांची ती अडचण ब्युनोस आयर्समध्ये आलेल्या 'आस्टुरियाज' या लेखकाने मिटवली. हा ग्वटेमालाचा लेखक हुबेहुब पॅब्लोसारखा दिसत असे. पॅब्लोनी त्याचा पासपोर्ट घेतला. आस्टुरियाज राजकारणापासून नेहमीच दूर राहिला होता; पण त्याने पॅब्लोना विचार न करता आपला पासपोर्ट दिला. त्याच्या पासपोर्टवर पॅब्लोंनी पॅरिस गाठले.

पॅरिसच्या अधिकाऱ्यांना मात्र ते पटवणे अवघड होते. पॅब्लोंना सल्ला मिळाला. जॉर्ज फिफ्थ या हॉटेलमध्ये राहायला जा. तेथे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे लोक जमलेले आहेत. त्याच्यात तुमचे कागदपत्र कोणी पाहात बसणार नाही.

पॅब्लो त्या हॉटेलमध्ये राहायला गेले. एक दिवस जगद्विख्यात चित्रकार पॅब्लो पिकासो तेथे आला. तो एखाद्या लहान मुलाप्रमाणे उत्तेजित झाला होता. कारण नुकतेच त्याने आयुष्यातील पहिले भाषण ठोकले होते आणि विषय होता, पॅब्लो नेरूदाची कविता—त्यांचा विजनवास. पॅब्लो नेरूदांची अनुपस्थिती.

पिकासोने अनेक अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, अनेक बड्या व्यक्तीशी सपर्क

**पॅब्लोंचे शब्द, त्यांची कविता अंगार बनली. जनतेला तिने पेटवायला सुरुवात केली.**

साधला. पिकासोचा शब्द टाळणे कोणाला शक्य नव्हते. आपला बहुमोल वेळ खर्च करून या महान चित्रकाराने पॅब्लोंचे कागदपत्र तयार करून दिले.

पॅरिसमध्ये शांतीची कॉंग्रेस भरली होती. त्याला अगदी शेवटच्या क्षणी आपली कविता वाचण्यासाठी पॅब्लो हजर राहिले. प्रथम कोणाचा विश्वास बसेना. बऱ्याचजणांचा समज होता की, अज्ञातवासाच्या काळात पॅब्लो मरण पावले. पॅब्लोंना पाहून त्यांनी टाळ्यांचा कडकडाट केला.

चिली सरकारला मात्र आश्चर्य वाटले. पॅरिसमध्ये नेरूदा असणे शक्यच नाही. ते चिलीमध्येच आहेत, असं त्यांचं म्हणणं होतं. लवकरच चिलीमध्ये त्यांना अटक होईल, असं त्यांनी निवेदन दिलं.

पत्रकारांनी यावर पॅब्लोंची प्रतिक्रिया विचारली. ते म्हणाले,

'त्यांना सांगा मी पॅब्लो नेरूदा नाही; पण दुसरा एक चिलियन आहे. जो कविता लिहितो, स्वातंत्र्यासाठी झगडतो आणि ज्याचं नावही पॅब्लो नेरूदा असंच आहे.' पॅब्लोंना फ्रेंच लेखक ॲरॅगॉन आणि पॉल एल्युअर्ड यांनी पॅरिसमध्ये सहाय्य केले.

या काळात तीन प्रसिद्ध रशियन लेखक त्यांना भेटायला आले. त्यांनी पॅब्लोंना आवेगाने मिठी मारली. जणु काही दीर्घकाळ हिरावलेल्या भावाला ते भेटत होते. यातल्या प्रत्येकाने पॅब्लोंचे चुंबनही घेतले. पुरुषांच्या चुंबनाची पॅब्लोंना सवय नव्हती; पण स्लाव्हिक पद्धतीत ते आदर आणि मैत्रीचे लक्षण आहे आणि म्हणूनच पॅब्लोंच्या एका कवितेची सुरुवात आहे–

'माझे पहिले चुंबन घेणारा पुरुष एक झेकोस्लाव्हाकियन राजदूत होता.'

□

(या लेखाचा उर्वरित भाग पुढील अंकात)




# काही श्रेष्ठ परदेशी कलाकृती

**श्री.** विद्याधर पुंडलीक यांना वाचताक्षणीच अतिशय आवडलेल्या पाश्चात्य कथाकारांच्या कथा मराठीतून 'पुष्पांजली' या कथासंग्रहात त्यांनी वाचकांसमोर ठेवल्या आहेत. बहुतांश कथाकार विसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातले आहेत. आपापल्या देशात, कथा या वाङ्‌मयप्रकारावर स्वतःचा ठसा उमटवून तिला लक्षणीय वळण लावण्याचं काम या विविध लेखकांनी केलेलं आहे. या लेखकांमध्ये प्रसिद्ध रशियन कथाकार अँटन चेकॉव्ह, नोबेल पारितोषिकविजेता प्रसिद्ध जर्मन साहित्यिक हाइन्रिश ब्योल, ब्रिटिश लेखक रोल्ड डॅहल, आयरिश कथाकार फ्रॅंक ओ–कानूर, इटॅलियन विनोदी लेखक जोव्हानी ग्वारेइशी आणि अमेरिकन साहित्यिकांमधील जॉन हॅझार्ड वाइल्डमन, कुर्ट फॉगनेट, जेम्स थर्बर, बरनार्ड मॅलमूद, जेम्स ॲगी इत्यादींचा समावेश आहे. आपल्या साहित्यात जी नवकथा दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात म्हणजे साधारण १९५० ते ६० या दशकात उदयाला आली, ती नवकथा या सर्व लेखकांनी शतकाच्या प्रारंभीच हाताळली आहे.

या संग्रहात अनेक लेखकांच्या कथा असल्याने सलग परीक्षण जरा अवघड होतं, म्हणून प्रत्येक लेखकाच्या कथेला स्वतंत्र न्याय देणं योग्य ठरेल. त्यातही मॅलमूद, चेकॉव्ह आणि ग्वारेइशी यांच्या प्रत्येकी दोन कथा असल्याने लेखकाची प्रकृती आणि प्रवृत्ती समजून घेणं शक्य होतं.

चेकॉव्हच्या 'बिशप' आणि 'पिल्लांचे पपा' या दोन कथा आहेत. या दोन्ही कथा वाचल्यावर चेकॉव्हची नवकथेची परंपराही वेगळीच आहे हे जाणवतं. तो वास्तववादी विचारसरणीचा प्रतिनिधी आहे. एकरेषात्मक घटनाप्रधान, प्रारंभ–शेवटाला महत्त्वाचं स्थान देणारी अशी कथा न लिहिता चेकॉव्हने गुंतागुंतीची, मनोविश्लेषणप्रधान आणि मनःस्थितीला निर्णायक स्थान देणारी कथा लिहिली. त्याची प्रचीती या दोन कथा वाचून येते. 'बिशप' या कथेत बिशप पिओत्रची भावयात्रा रंगवली आहे. लहानपण एका दरिद्री खेडेगावात गेलेलं. अभ्यासात लक्ष नसायचं. वयाच्या बत्तिसाव्या वर्षी त्यांनी भक्तिभावाने बिशपची वस्त्रं चढवली. परंतु मागे लागलेल्या आजारामुळे त्यांना दूर परदेशी जावं लागलं. तेव्हापासून आई दुरावली. दहा वर्षांनंतर एका 'पामसंडे'च्या दिवशी कॉन्व्हेंटमध्ये ती त्यांना अचानक भेटली. आई भेटल्यावर त्यांचं मन अधिकच हळवं होऊन भूतकाळात वारंवार जाऊन येऊ लागलं. अखेर आजारपणातच त्यांची जीवनयात्रा संपली. अखेरच्या क्षणी आई जवळ होती. परिस्थितीमुळे घडून आलेला माता–पुत्रांचा विरह–तरीही त्यांचे दृढ असे भावबंध या कथेत रेखाटले आहेत. बिशप आणि आई यांची भेट झाल्यावर त्यांची जी मनःस्थिती होते, तिच्यावरच या कथेत भर आहे. आपला मुलगा बिशप आहे म्हणून तिला आनंद होतो, अभिमान वाटतो पण त्याचबरोबर त्याच्याविषयीच्या आदरामुळे तिच्यावर एक प्रकारचं दडपणही येतं. भीतीही वाटते.

चेकॉव्हच्या 'पिल्लांचे पपा' या कथेत दोन लहान मुलांची मनं चित्रित केली आहेत. दोन्ही मुलं अतिशय व्रात्य. नर्सला सतावणारी; पण घरात मांजरीला पिलं झाली असं कळताच सुतासारखी सरळ होतात. ती पिलं हेच त्यांचं जग बनतं. त्यांच्या बालमनाला जे जे सुचेल ते ते ती मुलं त्या पिल्लांसाठी करतात. मध्येच त्यांना वाटतं की या पिलांना पपा हवेत. पपा कोणाला करायचं? नीरो नावाच्या कुत्र्याला ते पपा करतात. नीरो सगळी पिलं गट्ट करून टाकतो! हे घडल्यावर त्या मुलाचं भावविश्व उध्वस्त होतं; पण घरातले सगळे व्यवहार सुरळीत चालू असतात. मुलं रडकुंडीला येतात. त्या दुष्ट कुत्र्याला कोणीच शिक्षा का करत नाही, असा त्यांना सतत प्रश्न पडतो. चेकॉव्हच्या कथा वाचताना केवळ

पात्रांच्या मनोवस्थेवर लक्ष केन्द्रित केलं तरच त्या आनंद देऊ शकतात.

बरनार्ड मॅलमूद या कथाकाराच्या 'पुष्पांजली' आणि 'जगण्याचा खर्च' अशा दोन कथा आहेत दरिद्री, भग्न आणि एकाकी ज्यू-जीवनाचे सहृदय पण कलात्मक चित्रण त्यानी या कथांमधून केलं आहे. कथेच्या पार्श्वभूमीवर त्याचं बालपणचं एक गाव उभं आहे. 'जगण्याचा खर्च' या कथेत एक दुकानओळ आहे. तिथं वर्षानुवर्षं आपला व्यवसाय जोपासणारे दुकानदार होते; पण काळ बदलला, लोकांच्या गरजा बदलल्या, जुन्या दुकानांच्या कल्पना बदलल्या. जुने दुकानदार जागा सोडून गेले. कारण आजूबाजूला उत्तमोत्तम आधुनिक 'स्टोअर्स' आले. सॅमचंही तिथं एक छोटंस विविधवस्तु-भांडार होतं; पण शेजारी अलिशान दुकान उभं राहणार या बातमीनं त्याची झोप उडते. ते दुकान तिथं उभं राहू नये म्हणून तो खूप प्रयत्न करतो; पण ते नवं चकचकीत दुकान त्याच्या धंद्याला मारक ठरतं. तो वस्तूचे भाव कमी करत जातो आणि त्याचा गल्लाही घटत जातो. इतका की, त्यातून जगण्याचा खर्च भागत नाही. तो आणि त्याची बायको सॉरा दुकान सोडून, सावकाराचं कर्ज फेडून, निघून जातात. या कथेत एक उध्वस्त होत जाणारं गाव, त्या गावावरची शहरीकरणाची पकड आणि जुन्या-नव्याच्या संघर्षात सर्वस्वी हरलेली काही माणसं यांचं अतिशय हृद्य चित्रण आढळतं काही माणसाना जीवनाच्या सर्वच आघाड्यांवर अपयश मिळतं. वैवाहिक जीवनात होणारी प्रतारणा हा त्याचाच एक भाग. याच प्रतारणेची कथा आहे 'पुष्पाजली'. एटाचा पती मेलेला आणि सिझारोची पत्नी मेलेली आहे. दोघंही दफनभूमीत आपापल्या मृत जीवनसाथीला मनापासून श्रद्धाजली वाहायला येत असत. हळूहळू दोघांचा परिचय होतो. परिचयातून एकमेकांची दुःख वाटून घेतली जातात. त्या वेळी दोघंही एक रहस्य सागतात की, दोघांमध्ये एक समान दुवा आहे. एटाने आपला नवरा मरावा म्हणून प्रार्थना केली होती आणि सिझोरोची बायको मेली हे त्याच्या दृष्टीने बरंच झालं होतं. कारण एटाचा नवरा आणि सिझोरोची बायको दोघंही व्यभिचारी असतात. एटा स्वतःला खूप आवरते; पण नकळत सिझारोकडे खेचली जाते आणि तिला दिवस जातात. ही बातमी कळल्यावर सिझारो लपून पळून जातो. दुसऱ्यांदा फसवली गेलेली एटा या प्रतारणेनं खचून जाते. तशी कथा नवीन नाही. विषयही वेगळा नाही; पण एका उजाड-भग्न आयुष्याचं चित्रण ती समर्थपणे करते.

'डॉन कॅमिलो' चा जगप्रसिद्ध निर्माता जोव्हानी ग्वारेइशी याच्या 'एक बाप्तिस्मा' आणि 'कबुलीजबाब' या दोन्ही कथांमधून त्याचा उपहासगर्भ विनोद दृष्टीस पडतो. एका छोट्या गावातील एक पाद्री डॉन कॅमिलो. त्याचा स्थानिक कम्युनिस्टाशी चालणारा संघर्ष हा ग्वारेइशीच्या कथांचा समान धागा. त्यातील कॅमिलोचं व्यक्तिचित्रण फार प्रभावी उतरलं आहे. पाद्री असला तरी अखेर तो माणूसच. माणसाच्या स्वभावातले सगळे कमकुवत दुवे त्याच्याही स्वभावात आहेत. आपण केलं ते बरोबर की चूक हे ठरवताना जेव्हा त्याचा गोंधळ होतो तेव्हा तो प्रभू येशूशीच चर्चा करतो. येशूही त्याच्याशी बोलतो. या संवादांमधून त्यांचा आंतरिक संघर्ष, मनोद्वंद्व साकार होतं. सद् आणि असद् यांचे हेलकावे या संवादांमधून चागल्या रीतीने समजू शकतात धर्म आणि राजकारण या दोन घटकामधला झगडाही ते उभा करतात. दुष्प्रवृत्तींना चिरडण्यासाठी डॉन कॅमिलो युक्तिवादाने येशूलाही गप्प बसवतो.

या सग्रहात 'तिचा मिंकचा कोट' (रॉल्ड हॅंडल), 'मरणगंध' (वाइल्डमन), 'जरा लांब फिरायला-निरंतराकडे' (कुर्ट फॉगनेट), 'बारा किंवा कदाचित वीस सेकंदांचेही स्वप्न' (हाइन्रिश ब्योल) या उल्लेखनीय कथा वाटतात. 'तिचा मिंकचा कोट' या कथेतील हेलन लग्नानंतरही नवऱ्याला फसवून आपल्या प्रियकराला दर आठवड्याला भेटायला जाते. नवरा तिचा लपडाव शेवटी तिच्यावरच उलटवतो. कथेच्या प्रारंभी हॅंडलने अमेरिकन समाजावर मार्मिक भाष्य केले आहे. त्या समाजातले विवाह, घटस्फोट, विवाहबाह्य सबंध, त्यामुळे तरुणावर येणारे ताण आणि शेवटी मादक द्रव्याच्या आहारी जाऊन जीवनाची त्यानी केलेली अखेर! 'मरणगंध' या कथेत वाइल्डमनने मृत्यूची एक सुरेख कल्पना शब्दांकित केली आहे. मिरवणुकांमधील चित्ररथांवर मृत्यूला (मृत्यूचा वेष घेतलेली एक व्यक्ती) सहज लोळवणारा फॉली मुलाना फार आवडायचा. एक दिवस चित्ररथावर अपघात होऊन तो मृत्यूच मेला! त्याची पत्नी एला हिने हा आघात मोठ्या कष्टानं पचवला. तेव्हापासून कोणाच्याही घरात मृत्यू झाला की, एला तिथं जायची. तिचा सर्वांना सात्त्विक आधार वाटायचा. पुढं तिचा एकुलता एक मुलगा रॉब अपघातात मेला. एला सुन्न आणि मूक झाली. एकाकी बनली. तिनं मांजराचं एक पिलू बाळगलं. तेही एका कारखाली येऊन चिरडलं गेलं. शेवटी तिनं मृत्यूशी समझोता केला. तिलाच मृत्यू समजला होता. ती तर 'मृत्यूची' पत्नी होती!

'बारा किंवा कदाचित वीसही सेकंदाचे स्वप्न' असे लांब शीर्षक असलेली कथा सर्कशीतील सुराफेकीच्या थरारक खेळाचं वर्णन करते. आईच्या मृत्यूनंतर जगात एकटा पडलेला कार्ल सर्कशीत चाकू फेकण्याचा खेळ करून आपल पोट भरत असतो; पण त्याला पैसे पुरेसे मिळत नाहीत. मनात तर साहसाची धुंदी असते. काही तरी आणखी करून दाखवायचे असते. तो आपल्या एका मित्राला हाताशी धरतो. त्याचीही शौर्याची जात वेगळी असते. सर्कशीत कार्ल त्या मित्राच्या अंगाभोवती लखलखत्या पात्याचे अनेक धारदार चाकू केसाच्या अंतरावर खसाखस खुपसतो. १२ ते २० सेकंदापुरता श्वास रोखून, आपल्या जिवाची बाजी लावून उभा असलेला मित्र प्रेक्षकाच्या


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

टाळ्यांच्या कडकडाटाने भानावर येतो. काही सेकंदांचं हे स्वप्न त्याला, त्या दोघांनाही आयुष्यभर पुरेल इतकी नशा देऊन जातं. त्या स्वप्नासाठी मग रोजच जगायचं ! नोटांचा वर्षाव त्यांच्यावर होतो. ही कथा वाचताना आपलेही श्वास रोखले जातात इतकं सगळं वर्णन प्रत्यय-कारी आहे.

या सर्व कथा वाचताना एक गोष्ट जाणवते ती ही की, सर्व कथांचे विषय आपल्याला वास्तवातच वावरायला लावतात आणि विषयापेक्षाही कथेच्या मांडणीला, आशय विस्तारानं सांगण्याला कथाकारांनी महत्त्व दिलेले दिसते. कथेत तपशील बरेच असतात; पण ते पूरकच ठरतात. ते तपशील व्यक्ती आणि वातावरण, त्या व्यक्तीचा स्वभाव यांचं पारदर्शी चित्रण करतात. साधा विषय कलात्मक हाताळणीने किती आकर्षक होऊ शकतो, ते या कथांवरून कळते. सर्वच कथा मानवी मनाचं अंतरंग धुंडाळणाऱ्या आहेत.

या कथा अत्यंत श्रेष्ठ कथाकारांच्या असल्यामुळे त्यांच्या गुण–दोषांची चर्चा अप्रस्तुत ठरते. विद्याधर पुंडलिकांनी त्यांची ओळख समर्थपणे करून दिली आहे. या कथा मुळातून वाचण्याने तर आनंद द्विगुणितच होईल याची खात्री या अनुवादातूनच पटते. हा अनुवाद आहे हे खरं वाटू नये इतका तो सहज झाला आहे. तो कृत्रिम नाही, शब्दशः तर नाहीच नाही. विदेशी कथा मराठी वाचकांसमोर ठेवताना पुंडलिकांनी अस्सल मराठी शब्द वापरून तिला मराठी पेहराव सुरेख चढवला आहे. फक्त संवाद काही ठिकाणी खटकतात. अचानक मूळ इंग्लिश इथं असं असेल असं उगाचच आठवून जातं. इंग्रजी शैली आठवते. बाकी या श्रेष्ठ कलाकृतींची मराठी रसिकांशी भेट घडवून दिल्याबद्दल श्री. विद्याधर पुंडलिक यांना धन्यवादच द्यायला हवेत !

–आशा कर्दळे

पुष्पांजली
विद्याधर पुंडलिक
पृष्ठे : १५८
प्रतिमा प्रकाशन

# गारांचा पाऊस

शोभा भागवत

## माणूस आणि दगड

खेळ अगदी साधाच; पण खूप मजा आली.

तुम्हीपण हा खेळ घरात खेळून बघा. मुलगा आणि मुलगी दोघांना सांगितलं– एकानं दगड व्हायचं, एकानं माणूस. दगडानं अगदी हलायचं नाही. माणसानं त्याला जे सुचेल ते करायचं. प्रथम मुलगी म्हणाली, मी दगड होते. मुलगा माणूस झाला. मुलगी जमिनीवर हातपाय पोटाशी आवळून बसली. मुलानं तिला ढकललं, उचललं, थापट मारली, इकडून तिकडे गडगडवलं आणि म्हणाला, झालं माझं. आता पाळी मुलाची. तो दगड झाला. मुलगी माणूस. तिनं त्याला हातसुद्धा लावला नाही. म्हणाली, मी याला शेंदूर लावते आहे. रंग लावल्यासारखं केलं. मग त्याला हार घातला. कुंकू वाहिलं. नमस्कार केला. नैवद्य दाखवला. आरती केली आणि पुन्हा नमस्कार करून म्हणाली, झालं माझं.

मग त्यांना विचारलं, कसं काय वाटलं तुम्हाला तुम्ही दगड झाला होतात तेव्हा ? मुलगी म्हणाली, मला अजिबात आवडलं नाही त्यानं मला ढकललं, मारलं ते. असं कुणाशी वागू नये असं वाटलं. असं आपल्याशी वागणाऱ्याचा अगदी राग येतो. मुलगा म्हणाला, मला पण राग आला तिचा. मी काय देव आहे का ? मला नाही आवडलं मला देव केलेलं.

अजून मी या त्यांच्या प्रतिक्रियांबद्दल विचार करते आहे. दगडाला ह्या दोघांनी अशी वेगळी वागणूक दिली ती का ? मुलगे कृतीच्या पातळीवर जास्त जगतात म्हणून का ? आणि मुली भावनांच्या ! आपली शक्ती वापरायला मुलगे आसुसलेले असतात का ? आणि मुली काही चांगलं करायला ? चांगलं कशाला म्हणायचं ? देव केला म्हणून मुलानं कष्टाचा मार्ग निवडला. मुलीनं बिनकष्टाचा. आपण दगडाला त्रास दिला याचं मुलाला नंतर वाईट वाटलं. मुलगी मात्र खूष होती जे केलं त्याबद्दल. एखाद्या कृतीनं ज्याच्यावर कृती करतो त्याचं जसं रूप पालटतं तसं. जो कृती करतो त्याचंही रूप बनतं. प्रतिध्वनीसारखी ही कृती परतून येत असते.

माझी अशीही खात्री नाही की सगळ्याच मुली अशा वागतील आणि मुलगे असे. प्रश्न मूळ वृत्तीचा आहे. संस्कारांचाही आहे. घरातल्या, बाहेरच्या, शाळेच्या, मित्रांच्या. आम्ही तरी कधी घरात जाणूनबुजून मुलाला मुलगा म्हणून जास्त भाव देणं आणि मुलीला मुलगी म्हणून वेगळं वागवणं असं जाणीवपूर्वक केलं नाही; पण नकळत अनेक गोष्टी घडत असतीलच.

घाईघाईत बाहेर पडताना एकदा रविवारी मी मुलीला सांगत होते–दुपारी आजीला चहा करून दे ग आणि चटकन लक्षात आलं दोघांनाही चहा करता येतो मग मी घाईत मुलीलाच का हाक मारली ?

मुलांचे वडील एकदा मुलाला म्हणत होते, तू आर्किटेक्ट होणार ना ? माझ्या धंद्यात भागीदार होणार ना मोठा झाल्यावर ! आणि लक्षात आलं की मुली काय आर्किटेक्ट होत नाहीत, का धंदा करू शकत नाहीत ? मग हे मुलालाच का म्हटलं गेलं ?

मुलगा व मुलगी यांना वाढवताना फरक करू नये. त्यातले ढोबळ फरक आपल्याला पाठ झालेत. मुलाला स्वतःची कामं स्वतः करायला शिकवायला हवं. आयतोबा करू नये. त्याला स्वैपाक यायला हवा, घर चालवणं, खरेदी, आजारी माणसाची सेवाशुश्रूषा, सगळं यायला हवं. रांगोळ्या, भरतकाम, बारीक कलाकुसरीचं काम हेही मुलांच्या हातून जायला हवं. पुरुषांच्या हातांना आणि बोटांना अशा नाजूक हालचाली करण्याची सवय असणं मोठेपणी नवरा बायकोंना काम जीवनातही किती आनंद देतं याचा अनुभव आपण घेत नाही का ?

मुलांना आणि मुलींना त्यांच्या त्यांच्या भूमिका आधीच ठरवून दिल्यासारखं आपण बोलतो, वागतो, वागवतो. मुलामुलींची चित्रं, त्यांच्या पाठ्यपुस्तकांतली, गोष्टींच्या पुस्तकांतली चित्रं या दृष्टीनं बघावीत. प्रथमोपचारावरच्या मजकुरावरचं एक चित्र पाहिलं. त्यात मुलाला लागलंय आणि मुलगी पट्टी बांधत आहे असं होतं. हे उलट का नाही काढलं चित्रकारानं? नकळतच हे होत रहातं.

सूक्ष्मपणेही या गोष्टी कशा होतात त्याची परवा गंमत वाटली. माझी आजी आजारी होती लांब गावी. आईलाही खास बरं नव्हतं. आईला वाटत होतं आपण आपल्या आईला भेटू शकू की नाही? तिची अस्वस्थता पाहून मी म्हटलं, 'हे बघ, तू काळजी करू नको. आपण खास गाडी काढून जाऊन येऊ म्हणजे तुलाही त्रास होणार नाही!' तेव्हा खरं तर माझ्या भावाला रजा मिळेल का नाही माहीत नव्हतं. माझ्या नवऱ्याला सवड असेल का नाही माहीत नव्हतं. त्यांना जमलं तर ठीक; नाही तर आपण जाऊ असं मी म्हटलं. प्रत्यक्षात त्या दोघांनीही यायचं जमवलं. आम्ही सगळे गेलो. आजीला भेटलो. ती शेवटचीच भेट ठरली! आता आई अगदी कृतज्ञतेनं म्हणत असते, 'माझा जावई आणि माझा मुलगा यांनी मनावर घेतलं म्हणून माझी भेट झाली हो आईशी!' मी हे क्रेडिट मला मिळावं म्हणून काही म्हणणार नाही; पण माणसाच्या मनाला नकळत लागलेल्या वळणाचं नवल वाटलं. याचा अर्थ आईला माझं महत्त्व नाही असं आहे का? तिचं माझ्यावर प्रेम नाही असं आहे का? अजिबात नाही; पण बायकांचं कौतुक त्यांच्या निर्णयक्षमतेबद्दल कधी करायचं असतं हे तिच्या मनात नाही. माझं ती कौतुक करतेच. म्हणते– 'हिनी डबा भरून दहीभात, एवढी सॅंडविचेस, कॉफी घेतली बरोबर म्हणून कुठे काही अडलं नाही, का त्रास झाला नाही!' हे माझं कौतुक!!

एकुलत्या एका मुलीला शिकवणारी, तिनं स्वतंत्र व्हावं याबद्दल काळजी घेणारी, भरपूर प्रेम करणारी माझी आई; पण तिच्या मनात स्त्री आणि पुरुषांच्या भूमिका ठरलेल्या आहेत.

हा भेद आपल्या रक्तातच मुरला आहे. दृष्टिकोणच असा बनलेला आहे आपल्याला लहानपणी तसंच वागवलं गेलं आहे. मोठेपणीही वागवलं जातं आहे. आपण लोकांना, मुलांना असंच वागवतो आहोत. फार खोलवर विचार करून ही मुलं हलक्या हातानं दूर करायला हवीत. एक–दोन पिढ्या जातील अशाच मरेनरेपर्यंतच; पण निदान हे विचार पेरून तरी ठेवू या!

माझी एक मैत्रीण. तिला दोन मुली आहेत. ती म्हणते मला मुलगा हवा होता; तो मुलगा म्हणून नव्हे तर 'चांगला पुरुष' आपण निर्माण करू शकतो ही स्वतःची खात्री पटवण्यासाठी; जो मुलीपेक्षा स्वतःला वेगळं समजणार नाही, श्रेष्ठ समजणार नाही, तसं वागणार नाही.

'चांगला पुरुष' निर्माण करणं आपणा पालकांच्या हाती आहे याबद्दल विश्वास वाटतो! निदान जमेल तेवढा तरी– □

---

## रंगभूमी

### पळसाला पाने पाच

वि. भा. देशपांडे

पुण्यातील काही युवकांनी (विशेषकरून महाविद्यालयीन तरुणांनी) एकत्रित येऊन एक नाट्यसंस्था स्थापित केली आहे. तिचे नाव आहे 'अनुभव.' खरे तर संस्था म्हणण्याइतके वय आणि अनुभव त्यांच्याकडे नाही. म्हणून तूर्त एक 'ग्रुप' तयार झाला असे म्हणता येईल. त्यांनी दिलेल्या नावाप्रमाणेच त्यांचे म्हणणे असे की, आज जी नाटके लिहिली जातात त्यात आमच्या-युवकांच्या भावभावनांना, प्रश्नांना फारसे स्थान नसते, म्हणून आम्ही आमचे अनुभव आमच्या पद्धतीने मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत!

आजचे हौशी–व्यावसायिक नाटक आपण पाहिले तर या तयारीत निश्चितच अर्थ आहे असे म्हणता येईल. तरुणांचे–युवकांचे आजचे प्रश्न नाटककार मोठ्या प्रमाणावर नाटकांतून मांडीत नाहीत. एकांकिकांमधून काहीसा हा प्रयत्न होतो. 'अनुभव' च्या मुलांनी 'पळसाला पाने पाच' या दीर्घांकामध्ये त्यांचा एक अनुभव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचे थोडक्यात स्वरूप असे की, एक मध्यमवर्गीय सधन घरातील एक मुलगा, एक मुलगी आणि त्यांचे तीन मित्र–मैत्रीण नव्या फ्लॅटमध्ये राहण्यासाठी येतात. या मुलांचे आई–वडील परगावी गेलेले आहेत. या मुलांना दोन महिने स्वतंत्रपणाने राहण्यासाठी मिळतात. अशी संधी मिळाल्यावर ही मुले आपल्या जगण्याच्या संदर्भातले कोणकोणते निर्णय घेतात, त्या वेळी त्यांची कोंडी कशी होते वगैरे. मुख्यतः स्वतःचे निर्णय स्वतःच घेण्याची वेळ आल्यावर त्या प्रश्नांचा गुंता अधिकाधिक वाढत जातो. काहीसा घडवलेला, कृत्रिम वाटणारा किंवा मूळ प्रसंगाबद्दल अनेक शंका निर्माण होणारा असा नाट्यभाग आहे; परंतु तो गृहीत धरूनच नाटक पाहणे आवश्यक आहे.

एखादी कल्पना भावणे आणि तिला नाट्यरूप देणे ही गोष्ट वाटते इतकी सोपी नाही. कारण प्रसंगातले आणि संवादातले हलकेफुलकेपण नाट्याशय परिणामकारी करण्यास उपयोगी पडतेच असे नाही. त्यातले कच्चेपण नाटकभर त्रासाचे होते. लेखनातील किंवा अनुभव व्यक्त करण्यातील कच्चेपणाची जाणीव या मुलांना निश्चितच आहे. त्यामुळे त्यांच्या लेखनाची अथवा प्रयोगाची तुलना थोरामोठ्यांशी करण्यात मतलब नाही.

लेखनातील कच्चेपण, पसरटपण आहे

त्यापेक्षाही संपादित करायला हवे. हा अनुभव मध्यंतर देऊन व्यक्त करण्याची गरज नाही. कारण तो सलगरूपाचा अनुभव आहे. नाट्यपरिणामाच्या दृष्टीने ही सलगता महत्त्वाची आहे. सादरीकरणासाठी या मुलांनी खूपच मेहनत घेतलेली होती. विशेषतः नाट्यविषयाच्या संदर्भातील वस्तूंचा वापर, प्रसंगानुरूप पात्रांच्या हालचाली, विरचना आणि संगीताचा वापर चांगला होता. यामध्ये सती भावे, सुषमा साने, सुनील सुकथनकर, सारंग जोग, सुनील गोडसे आणि श्रीरंग उमराणी (संगीत याचेच होते)ही युवककलाकार मंडळी होती.

पहिल्या प्रयत्नातल्या चुका किंवा अडचणी पुढच्या प्रयोगाला दिशा देणाऱ्या, शहाणपण शिकवणाऱ्या असतात. अशाच पद्धतीने मार्ग काढणे महत्त्वाचेही असते. पुढचा अनुभव मांडताना ती काळजी घेतली जाईलच. या युवकांना विनंती अशी की, त्यांनी ज्या आग्रहबिंदूपासून प्रवास आरंभित केला आहे ते सूत्र सुटता कामा नये. त्यांचे स्वतःचे खूप प्रश्न आहेत, अनुभव आहेत. त्यांमध्ये व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक. (त्यातच शैक्षणिक-लैंगिक) अशा अनेक पदरी अनुभवनांना ही मुले सामोरी जात आहेत. ते अनुभव त्यांनी नाट्यरूपाने व्यक्त करावेत. त्यासाठी बंदिस्त प्रेक्षागृह किंवा कमानी रंगमंचच हवा असे नाही. शाळा, कॉलेजचे वर्ग, आधुनिक वस्त्या (कॉलनी) किंवा रहदारीच्या मोक्याच्या ठिकाणी मिळेल ती जागा पकडावी आणि आपले अनुभव व्यक्त करावे. त्याला सातत्य हवे ! ¤


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

मला निसटलंच पाहिजे !

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०


## दूरदर्शननिर्मिती ‘कळत-नकळत’

दूरदर्शनची नाटके पाहण्याचा योग अलीकडे जमतोच असे नाही. विशेषतः ज्या वेळात म्हणजे ७.४० ते ९ च्या दरम्यान ही नाटके पेश होतात, तेव्हा पाहणे ज़मतेच असे नाही. त्यातही पाहणे जमले तर हाती काही चांगले लागेल याचा भरंवसा नाही. तसे क्वचितच घडते. गेल्या आठवड्यात असाच एक चांगला योग आला. सुरेश खरे यांनी लिहिलेले ‘कळत–नकळत’ हे नाटक पाहिले.

नवऱ्याची मैत्रीण आणि बायकोचा मित्र हा तसा म्हटला तर सनातन कुतूहलाचा विषय आहे; पण आधुनिक जीवन जगणाऱ्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या युगात हा प्रश्न अनेक घरांमध्ये ठाण मांडून बसला आहे. प्रत्येकजण आपापल्या कुवतीनुसार त्याची सोडवणूक करण्याच्या प्रयत्नात असतो; पण या प्रश्नाला तशी मोकळेपणाने उत्तरे सापडत नाहीत. कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तो सल ठसठसत राहतोच ! वरकरणी मात्र आपल्या जीवनात तसा काही प्रश्न किंवा समस्या नाहीच असे प्रत्येकजण भासवीत असतो आणि त्याच वेळी तो त्या चक्रात अडकलेला असतो. सुरेश खरे यांनी हा प्रश्न अगदी सरळ, ढोबळ पद्धतीने पण नेमका मांडला आहे. हा प्रश्न आजचा, अनेक घरातला किंवा समाजातल्या एका थरातला तरी नक्कीच आहे. तो तितक्या समजदारीने व्यक्त झालेला आहे. केवळ आजचा प्रश्न मांडला म्हणून हे लेखन अपूर्व आहे असे नव्हे तर दूरदर्शनच्या माध्यमात तो विशिष्ट वेळात व्यक्त झाला आहे. म्हणजे असे की, एरवी सुरेश खरे काय किंवा अन्य नाटककार काय, लहानमोठी नाटकें लिहितात; पण खास दूरदर्शनच्या माध्यमासाठी महत्त्वाचा विषय घेऊन लेखन करणे फारच विरळा घडते. असे जाणते प्रयत्न व्हायला हवेत; पण ते केव्हा तरीच घडत असते. त्याला सातत्य नसते.

या लेखनाचे श्रेय सुरेश खरे यांना तर आहेच; पण ते तितक्याच प्रभावीपणाने पेश करणाऱ्या विनायक चासकरांनाही आहे. चासकरांनी या नाटकासाठी आवश्यक असे घराचेच नेपथ्य वापरले होते; पण त्या नेपथ्याचे तेच-तेचपण त्रासाचे ठरले नाही. याचे मुख्य कारण निरनिराळ्या प्रसंगभागाच्या वेळी त्या घराचा, फर्निचरचा भाग वापरला गेला. कॅमेराने तेवढाच टिपला. घरातील भिंतीवरचे काही दृश्यभाग व्यक्तीच्या पार्श्वभागी जाणीवपूर्वक ठेवून प्रसंगाची दृश्यमानता निश्चितच वाढवली !

या सर्वांच्या बरोबरीनेच अभिनयाचा वाटाही तितकाच महत्त्वाचा आहे. सविता प्रभुणे, अविनाश मसुरेकर आणि रमेश भाटकर ह्या तीन कलाकारांचे हे नाटक होते; पण संपूर्ण वेळ तीनच कलाकार आहेत याचा कंटाळा आला नाही. या तिघांनी एक तर अतिशय मोकळेपणाने अभिनय केला. विशेषतः सविताने नवऱ्याबद्दलची प्रीती आणि आपल्या पूर्वजीवनातील मित्राच्या मैत्रीची दाखवलेली आस्था परिणामकारी होती. रमेश भाटकरनेही निरनिराळ्या प्रसंगांतले भाव ताकदीने व्यक्त केले. बायकोचा मित्र येण्यापूर्वीचे वागणे आणि तो मित्र आहे हे कळल्यावर झालेली उलघाल त्याने उत्तमपणाने दाखवली. हा सगळा खेळ खेळणारा मित्र अविनाश मसुरेकरने तितक्याच गांभीर्याने आणि नंतर मिस्किलपणाने दाखवून नाटकाची रंगत अधिक वाढवली !

दूरदर्शनच्या कार्यक्रमाबाबत आपण तक्रारी तर सतत करतोच. त्यातल्या काही खऱ्याही असतात; पण जेव्हा अशा काही कार्यक्रमांमुळे किंवा एखाद्या नाटकाच्या दर्शनामुळे बरे वाटले तर दादही तितक्याच मोकळेपणाने द्यायला हवी ! □

# नाट्य-चित्रसृष्टीच्या सौभाग्याला दृष्ट लागली !

आशा काळे

गुरुवार २१ जूनला दुपारी अडीच–तीनच्या दरम्यान फोन खणखणला. तापलेल्या सळया कानात खुपसाव्यात तसे शब्द कानांवर आले 'एक अत्यंत वाईट बातमी आहे. अरुण सरनाईक, त्यांच्या पत्नी आणि मुलगा अपघातात ठार झाले !' ऐकल्यावर मी सुन्न झाले. मी काय ऐकतेय् तेच मला समजेना. माझ्या साऱ्या संवेदनाच नष्ट झाल्या. सांगितलेली घटना माझ्या मेंदूपर्यंत पोहचेना. मी बधिर झाले होते. बऱ्याच वेळाने भान आल्यावर मी सावरले, वाटलं बातमी खोटी असेल म्हणून भराभरा अनेक ठिकाणी फोन केला; पण दुर्दैवाने अशा वाईट बातम्या कधी खोटया ठरत नसतात. प्रत्येक ठिकाणी या दुष्ट बातमीला दुजोरा मिळाला आणि थोडया वेळाने कोल्हापूरहून माझ्या घरून फोन आला आणि सविस्तर बातमी समजल्यावर मात्र मी ओक्साबोक्शी रडायला लागले.


अगदी अस्साच प्रसंग पंधरा दिवसांपूर्वी माहेरची माणसं' या चित्रपटासाठी अरुण सरनाईक यांच्याचबरोबर माझा चित्रित झाला होता. अरुणजींचा प्रत्यक्ष घडलेला मृत्यू आणि चित्रपटातील मृत्यू या दोन्हीमधील साम्य हा एक दुर्दैवी योगायोगच म्हणायला हवा.

चित्रपटातील त्या प्रसंगाच्या वेळी मी अभिनय केला होता; पण खरोखरीची तशी बधिर अवस्था येऊन ओक्साबोक्शी रडायची वेळ अरुण सरनाइकांच्यामुळे येईल असे मात्र वाटले नव्हते. पंधरा दिवसांपूर्वी ज्या माणसाबरोबर आपण काम करत होतो तो माणूस अचानक आपल्यातून कायमचा निघून गेला आहे या गोष्टीवर विश्वास ठेवायला मन अजूनही तयार होत नाही. त्यांच्या मृत्यूची बातमी कळली तेव्हा डोळयांसमोर उभा राहिला तो चित्रपटातील त्यांच्या मृत्यूचा प्रसंग !

'माहेरची माणसं' या चित्रपटात अरुण आणि मी एकमेकांवर जिवापाड प्रेम करणाऱ्या पति-पत्नीच्या भूमिकेत आहोत.

आपली दोन लहान मुले आणि पत्नी यांच्यावर निरतिशय प्रेम करणारा श्रीपती (अरुण) लग्नाच्या वाढदिवशी आपल्या पत्नीला भेट देण्यासाठी मोत्यांच्या कुडया आणायला जातो. वाढदिवसाच्या समारंभाला घरी माणसे जमलेली असतात. पत्नी आनंदाने गाणे म्हणत असते. गाण्याचे बोल असतात 'ओघ मायेचा हा कधी थांबू नये, माझ्या सौभाग्याला दृष्ट लागू नये' गाणे संपल्यावर श्रीपतीचा मित्र विचारतो 'वहिनी, आम्ही सर्व मंडळी जमलो आहोत आणि हा श्रीपती कुठे गेला आहे ?' पत्नी लाजून सांगते, 'माझ्यासाठी कुडया आणायला गेलेत !' तेवढयात बाहेर माणसे येतात त्यांनी श्रीपतीचा देह उचलून आणला आहे. 'काय झालं ?' असं विचारताच ते सांगतात 'सायकलीवरून लगबगीने येत होते, ट्रकची जोरदार धडक बसली आणि जागच्या जागी ठार झाले !'

ज्या दिवशी हा प्रसंग चित्रित झाला त्या दिवशी सेटवरचे वातावरण अतिशय गंभीर होते. कोणी कोणाशी बोलत नव्हते. माझ्या मनावर तर खूपच दडपण आले होते, हा सीन माझ्याकडून कसा होईल याबद्दल मी साशंक होते. पतीचा मृतदेह पाहिल्यानंतर आलेली बधिरअवस्था आणि त्याच्या मुठीतली कुडयांची डबी पाहिल्यानंतर वास्तवाचे भान येऊन त्याच्या मृतदेहावर कोसळून हंबरडा फोडणारी पत्नी, या भावना मला व्यक्त करता येतील की नाही असे मला सारखे वाटत होते पण रक्ताने माखलेला, काळानिळा पडलेला चेहरा आणि निर्जीव झालेला अरुणचा देह लोकांनी उचलून आणला तेव्हा मी अभिनय विसरून खरोखरीची बधिर आणि सुन्न झाले आणि त्यांच्या मुठीतल्या कुडया पाहिल्यानंतर अरुणच्या देहावर कोसळून मी खरोखरीची ओक्साबोक्शी रडायला लागले. शॉट संपल्यावरही माझे रडणे थांबेना, तेव्हा अरुण मला हसून म्हणाले 'अग आशा, इतकं रडायला



त्यांच्या सहजसुंदर अभिनयाने भूमिका जिवंत झाल्या.

काय झालं? मी काही खरोखरचा मेलो नाही. जिवंत आहे! ' त्या दिवशी त्यांच्या मृत्यूची बातमी आली तेव्हा वाटलं, अरुणनी पुन्हा तेच शब्द उच्चारावेत आणि माझं रडणं थांबवावं; पण ते घडायचं नव्हतं!

## नियतीनं शब्द खरे केले!

तो प्रसंग चित्रित झाला तेव्हा अरुण-मधल्या जातिवंत कलाकारचे मला दर्शन झाले. त्याच्या देहावर कोसळून रडण्याचा माझा शॉट झाल्यानंतर कुणी तरी म्हणाले, 'हा शॉट परत घेऊ या!' त्यावर अरुण आपली मृतावस्था टाकून ताडकन् उठले आणि म्हणाले, 'नको, नको हा शॉट पुन्हा घेऊ नका. आशाने फार छान शॉट दिलाय. पुन्हा ती तसा देऊ शकणार नाही!' त्यांच्या आग्रहामुळे शॉट पुन्हा घेतला नाही. अरुण-सारख्या समर्थ कलाकाराने दिलेली दाद आणि सहकार्य यामुळे मी भारावून गेले. वास्तविक त्याना त्या सीनमध्ये मेल्यासारखे पडून राहायचे होते. शॉट एकदा घेतला काय किंवा चार वेळा घेतला काय त्यांना काही फरक पडत नव्हता; पण तो जातिवंत कला-कार स्वतःपुरतं पहाणारा नव्हता. आपल्या बरोबरीच्या सहकारी कलाकाराचा अप्रतिम शॉट तसाच राहावा ही तळमळ होती. प्रत्येक सीनच्या वेळी ते मला बहुमोल सूचना करा-यचे. माझे काही चुकलं की ते मला लगेच सांगायचे आणि चांगलं झालं की त्याची भरभरून दाद द्यायचे. म्हणूनच त्यांच्या-बरोबर काम करताना मला विलक्षण आनंद वाटायचा. त्यांच्याबरोबर मी चार-पाच चित्रपटांत कामे केली; पण 'माहेरची माणसं' या चित्रपटात त्यांच्याबरोबर काम करताना मी स्वत:ला विसरून गेले होते. त्यांच्या-बरोबरचे प्रसंग रंगवताना मला स्वतःला मी आशा काळे आहे असं कधी वाटलंच नाही! हा अरुण सरनाइकाच्या अभिनय सामर्थ्याचा विजय आहे. प्रत्येक प्रसंग ते आपल्या अभिनयसामर्थ्याने जिवंत करा-यचे आणि प्रत्येक प्रसंगात मलाही आपल्या-बरोबर घेऊन जायचे. त्यांचा दमदार आवाज आणि संवाद बोलणं हे तर त्यांचं फार मोठं वैशिष्ट्य होतं ते संवाद इतक्या सहजतेने आणि टायमिंगने बोलत की ऐकत राहावसं वाटे. त्यांचा आवाज ऐकणाऱ्याला मंत्रमुग्ध करून टाकत असे. ते बोलत अस-लेले संवाद लेखकाचे न वाटता ते साकार करीत असलेल्या भूमिकेचेच वाटायचे.

'माहेरची माणसं'मधील त्यांची भूमिका पाहून प्रत्येक स्त्रीला वाटावं आपल्याला असा पति मिळावा, इतकी सुंदर भूमिका त्यांनी केली आहे त्या चित्रपटात! इतर भूमिकांच्या तुलनेनं त्यांची भूमिका लहान आहे; पण आपल्या अकृत्रिम अभिनयाने त्यांनी ती अशी सजवली आहे की, संपूर्ण चित्रपटात त्यांचा ठसा शेवटपर्यंत कायम राहतो.

अरुणने साकार केलेल्या चित्रपट-नाटका-तील सर्वच भूमिका त्यांच्या सहजसुंदर अभिनयाने अजरामर झाल्या आहेत. त्यांच्या आवाजात आणि अभिनयात अशी विलक्षण जादू होती की, ते संवाद बोलायला लागले की, साऱ्या भावना त्यांच्या अभिनया-बरोबरच संवादात प्रकट व्हायच्या आणि त्यांच्याबरोबरीच्या कलाकाराला त्यांच्यामुळे आपोआप भावना यायच्या. मी त्यांना तसे बोलून दाखवायची, तेव्हा ते नम्रपणे म्हणायचे, 'नाही आशा, तू एक्सप्रेशन छान दिलंस' स्वत: मोठा कलाकार असूनही दुसऱ्याचे कौतुक करण्याचा दुर्मिळ गुण त्यांच्याजवळ होता.

ते कलाकार म्हणून जितके मोठे होते, तितकेच ते माणूस म्हणूनही मोठे होते. सेटवरचे त्यांचे वागणे अतिशय सभ्यपणाचे असायचे. ते मस्करी करायचे, विनोद करायचे; पण त्यांच्या मस्करीत, विनोदात कधी पांचटपणा, वाह्यातपणा असायचा नाही. सर्वांना हसवायचे आणि स्वत: खळखळून हसायचे. 'माहेरची माणसं'-मधील ट्रक-ॲक्सिडेंटचे दृश्य चित्रित व्हायचे होते तेव्हाही ते असेच मस्करीने बोलले होते. त्या सीनच्या आदल्या दिवशी दिग्दर्शकांनी त्यांना सांगितले, 'अरुण, उद्याचे दृश्य जबरदस्त व्हायला हवे. प्रेक्ष-काच्या अंगावर काटा यायला हवा!' मी त्या वेळी सेटवरच होते. ते ऐकून अरुण माझ्याकडे पाहून डोळे मिचकावून म्हणाले, 'दृश्य चांगले व्हायला हवे हे ठीक आहे; पण त्या ट्रकचे ब्रेक्स नाही लागले तर या चित्रपटात माझ्या नावामागे कै. अरुण सरनाईक लिहावं लागेल!' आणि नेहमीप्रमाणे खळखळून हसले. त्यांच्या हसण्याला मी प्रतिसाद दिला नाही. उलट चिडून म्हणाले, 'काही तरीच काय बोलता हो अरुणजी?' तेव्हा माझ्या शेजारी उभे असलेले कॅमेरा-मन म्हणाले, 'बोलू दे, बोलू दे. असं बोलून काही होत नाही. उलट आयुष्य वाढेल

त्यांचं!' पण आम्हाला जे हवं होतं ते दुष्ट नियतीला मंजूर नव्हतं. अरुण सहजतेने बोलले; पण नियतीने ते शब्द अक्षरशः खरे करून दाखवले आणि अरुणना, त्यांच्या पत्नीला आणि मुलाला आमच्यापासून निर्द-यतेने हिरावून घेतले!

अरुणच्या पत्नी, आमच्या वहिनी अति-शय सालस होत्या, देखण्या होत्या; पण त्यांच्या देखणेपणात शालीनता होती, घरं-दाजपणा होता. त्या पांढरी साडी नेसून डोक्यावर पदर घेऊन सेटवर आल्या की, सेटवरचं वातावरण प्रसन्न व्हायचं. त्यांचं बोलणं, वागणं अतिशय आदबशीर होतं. त्या सेटवरून जाऊच नयेत असं वाटा-यचं. त्या आल्या की, मी नेहमी म्हणा-यची, 'वहिनी, तुम्ही आलात की, पारि-जातकाचा सडा पडल्यासारखं सुगंधी वाता-वरण होतं!' यावर त्या खूप गोड हसायच्या. अरुणसारख्या कलंदर कलाकाराच्या जीव-नात त्यांनी हसतमुखाने साथ दिली आणि अरुणबरोबरच्या अखेरच्या प्रवासालाही त्या सौभाग्याचं लेणं घेऊन गेल्या! स्वर्गी सोन्याच्या झाल्या!

वहिनी, अरुण आणि संजय यांच्या अकाली जाण्याने सविता एकटी पडली. तिच्यावर झालेल्या आघाताने मन व्याकूळ होतं; पण ती समर्थ आई-बापांची मुलगी आहे. ती सावरेल; पण या तिघांच्या मृत्यूचे दुःख तिला आणि आम्हाला चिरंतन काळ-जात ठेवूनच राहावे लागणार!

अरुणसारखा जबरदस्त ताकदीचा कला-कार आपल्यातून असा अचानक निघून गेला; पण त्यांनी अजरामर केलेल्या भूमिका रसिक प्रेक्षकांना त्यांचा कधीही विसर पडू देणार नाहीत. त्या भूमिकांमुळे ते चिरंजीव ठरले आहेत!

माझ्या सहकारी कलावंताच्या आठवणी लिहिताना माझे डोळे वारंवार भरून येता-हेत. मन गलबलून जातंय आणि मनात एकच विचार येतोय, 'माहेरची माणसं'-मधील प्रसंग वठवताना मी रडले ती त्यातली नायिका विधवा झाली म्हणून, तिच्या सौभाग्याला दृष्ट लागली म्हणून! आणि अरुण सरनाईक गेले हे ऐकल्यावर मी रडले ते मराठी नाट्य-चित्रसृष्टी विधवा झाली म्हणून! अरुण हे मराठी चित्र-नाट्य-सृष्टीचे सौभाग्य होते. त्यांच्या जाण्याने मराठी चित्र-नाट्यसृष्टीच्या सौभाग्याला दृष्ट लागली! □

# खंडहर– भग्नतेची कविता

रोजच्या दैनंदिन चक्राच्या गतीत अडकलेल्या रुटिन जगण्याला तडा द्यायचा या उद्देशानं तीन तरुण मुलं थोडी अनिच्छेनंच शहराबाहेर पडतात. कारण जायचं असतं शहरापासून दूर, एका न पाहिलेल्या जागी. जागा अशी की, जिथे एस-टीसुद्धा पोचत नाही. या जागेचा माहितगार दिपू. त्या जागेशी त्याचं रक्ताचं नातं. कधी काळी त्याचे पूर्वज तिथ राहिलेले. बाकी दोघं मित्र. त्यातला एक सुभाष (नसीर) तर दुसरा असाच कुणी. सुभाष आहे कमर्शिअल फोटोग्राफर थोडा संवेदनाक्षम, न बोलता जास्त पहाणारा आणि थोडा गंभीर. दुसरा बडबडया, उतावळा.

तिघांचा प्रवास त्या अज्ञात जागेकडे. रानावनातनं एकाकी जाणारा नि:स्तब्ध, नीरव, भयाण काळोखी रस्ता आणि त्या गर्द काळोखाची जाणीव करून देणारा बैलगाडीला लटकवलेला कंदील. काळोखाला सरावलेला मुकादम आणि काळोखापासून लपू बघणारे हे तिघे शहरी तरुण.

गाडी गावात पोचते. मुकादम रस्ता दाखवत त्याना घरात घेऊन जातो. सकाळ होते आणि सगळा परिसर उजळून निघतो. डोळयापुढे पसरते एक पडकी वास्तू. तिच्यातली प्रचंड दालनं, झुंबर, उंच उच गेलेले तुटके खांब, त्याच्यावरची मळकी नक्षी आणि आजूबाजूला पसरलेलं पिवळं गवत.

चित्रपट जसजसा पुढे जातो तसतसे या भग्न वास्तूचे तपशील डोळयासमोर येतात. प्रश्न पडतो, या एवढया मोठया प्रचंड वास्तूचं असं का व्हावं ? इथं कोणीच रहात नाही का ? दिपू म्हणतो, कधी काळी आम्ही सगळे इथ एकत्र रहात होतो. गावात मलेरियाची साथ आली; त्यात काही मेले, काही गाव सोडून गेले. आता त्या उजाड वास्तूत राहिले दोघच. एक मुकादम आणि दुसरी जामिनी– दिपूची चुलत बहीण !

जामिनी आपल्याला दिसते पहिल्याच दिवशी. सुभाष बॅटरीच्या झोतात काळोखातले अवशेष न्याहाळताना. तेव्हा त्याला ती दिसते. मंद उजेडाचे झरोके बंद करताना.

जामिनी आणि तिची आई या दोघीच त्या दुसऱ्या प्रचड वास्तूच्या धनी. आई अर्धांगानं अंथरुणाला खिळलेली. जामिनी तरुण–विशी–बाविशीची; पण तारुण्याची जाणीव विसरलेली जामिनीची आई एका तंतूच्या आधारानं आयुष्याचं जाळ विणत बसली आहे. लहानपणी जामिनीचं लग्न निरंजनशी ठरवल आहे. तो कधी काळी येईल आणि जामिनीला घेऊन जाईल या आशेवर एकएक दिवस ढकलणारी, तरुण बिनलग्नाची जामिनी फक्त निरंजनशीच लग्न करू शकते असं मानणारी, तो येईल आणि जामिनीला आणि आपल्याला घेऊन जाईल आणि या एकांत जागेतून आपली सुटका होईल याच स्वप्नात रंगणारी.

निरंजन कधीही येणार नाही हे जामिनी आणि दिपू जाणून आहेत. हा धागा ताणून धरला आहे तो जामिनीच्या आईच्या जगण्यासाठी.

चित्रपटाच्या अर्ध्या भागात ही कथा उलगडत जाते आणि जामिनीच्या दूरस्थ, अबोल, उदास चेहऱ्यावरची प्रत्येक रेषा बोलकी होते. चिडून आईला दटावणारी – आणि पुढच्याच क्षणी तिला अगतिकतेनं समजावून सागणारी, तिच्या अध नजरेवर प्रेम करणारी. आईची अगतिकता, दिपूच्या मित्राला–सुभाषला तिन निरंजन समजणं जामिनीला असहाय्य करत, अपमानित करत. दिपूबरोबर सहजच आलेल्या सुभाषला जामिनीची अंध वृद्ध आई पुन्हा पुन्हा विचारते, 'तुम निरंजन हो न ?' तिची तडफड थांबण्यासाठी सुभाष अगतिकपणे ते कबूल करतो आईची तडफड थाबते. ती पुन्हा आपल्या अंधाराच्या दुनियेत बुडून जाते. इकडे सुभाष आणि जामिनीमध्ये काही नवं निर्माण होतं का ? त्या प्रसंगानतर त्यांची २/३ वेळा चुटपुटती भेट होते. त्यातही जामिनीच्या आयुष्याचे उदास रग पुसले जाऊ शकत नाहीत. जे झालं ते अगतिकतेपोटी हे दोघांनाही माहीत असतं.

शहरी मडळीची सुट्टी संपून जाते. सुभाष त्या २/३ दिवसात घेता येईल तितकं कॅमेऱ्यात टिपून घेतो. त्याच्या दृष्टीनं ती भग्नवास्तू म्हणजे 'पॅरॅडाइज' असतं– खोल दु:खाची जाणीव करून देणारं.

पुन्हा परतीचा प्रवास. बैलगाडीत सामान भरल जातं. सुभाष घाईघाईनं खाली उतरतो. पुन्हा त्या वास्तूच्या काही कडा–कोनाडे कॅमेऱ्यात टिपतो आणि त्याच वेळी त्या बेसावधक्षणी दाराआडून ओल्या डोळयांनी त्याला निरखणारी जामिनी दिसते ती नजर तो सराईत फोटोग्राफरच्या नजरेनं टिपतो आणि जो तो पुन्हा रुटिनमध्ये गुतून जातो.


चित्रपटाची सुरुवात होते सुभाषच्या स्टुडिओत एका फोटोच्या निगेटिवची पॉझिटिव करताना. दाराआडून डोकावणारी त्या खोटया निरंजनला न्याहाळणारी–डोळयांतून उदास दु:ख शिपडणारी जामिनी फोटोत साकार होते आणि फ्लॅशबॅक तंत्रानं चित्रपटाची कथा उलगडत जाते.

चित्रपटाचं नाव आहे 'खंडहर.' खंडहर म्हणजे भग्न अवशेष. हे भग्न अवशेष संपूर्ण चित्रपटभर इथे तिथे साडलेले आहेत. त्या उजाड प्रशस्त भग्न वास्तूतून, जामिनीच्या डोळयांतून, जामिनीच्या आईच्या चिरक्या हट्टी आवाजातून, दिपूच्या बेदरकार नजरेतून तर सुभाषच्या अलिप्त–अगतिक वागण्यातून.

खडहर ही भग्न स्वप्नाची, भग्न नात्याची आणि भग्न निसर्गाची एक अर्थपूर्ण कविता आहे यातल्या व्यक्ती, प्रसंग, निसर्ग आणि कथा एकमेकात अलगद मिसळतात. जामिनीच दु:ख हलके हलके मनात चिरत जात.

चित्रपटाच्या शेवटी सुभाष एका मॉडेलचे वेगवेगळया व्यावसायिक कोनातून फोटो काढताना दिसतो. त्याच्या मागच्या फ्रेममध्ये जामिनी दिसते. सुभाष निर्विकारपणे फोटो टिपत असतो. जणू काही त्या भग्न वास्तूत त्याच्या मनात जे काही नाजूक घडलं होतं त्याला त्या व्यावसायिक दुनियेत थाराच नाही !

–मेधा राजहंस



## मनःचक्षूचे सामर्थ्य

एखाद्या माणसाला कशाबद्दलही अतोनात भीती का वाटते याची कारणमीमांसा अनेक तज्ज्ञांनी अनेक प्रकारे केली आहे; परंतु या विषयावर तज्ज्ञांचे एकमत झालेले दिसत नाही. मात्र सुदैवाची गोष्ट अशी आहे की, जर तुम्हाला तुमच्या मनातील एखाद्या भीतीवर मात करावयाची असेल तर ती भीती तुमच्या मनात का व कशी निर्माण झाली, हे समजावून घेण्याची आवश्यकता नाही. तुमच्या मनातील भीतीचे मूळ कारण न कळताही तुम्हाला मनःचक्षूच्या सहाय्याने त्या भीतीवर मात करता येईल.

□

लेखांक : चार । लेखक : कि. मो. फडके

# भित्रेपणावर मात

कित्येक माणसांना कशाची तरी अतोनात भीती वाटत असते. कोणाला कुत्र्याची, मांजराची, उंदराची किंवा अशाच काही प्राण्यांची भीती छळत असते, तर कोणाला विमानातून, मोटारीतून किंवा फटफटीवरून प्रवास करणे ही कल्पनाच असह्य वाटते. कोणी पोहण्याचा धसका घेतलेला असतो, तर कोणी मुष्टियुद्ध पाहणेसुद्धा टाळत असतो ! एखाद्याला उंच इमारतीतील लिफ्टचा वापर करणे म्हणजे मोठी आपत्ती वाटत असते, तर एखाद्याला उंच इमारतीतील जिन्यावरून खाली उतरताना जिन्याच्या कठड्यावरून खाली पाहिले की भोवळ आल्यासारखे वाटते. काही माणसांना एखाद्या लहान, बंद खोलीत पाऊल टाकल्याबरोबर जीव घाबरा झाल्यासारखे वाटते. उलट काही माणसांना मोकळ्या मैदानातून चालत जाणे म्हणजे मोठे संकट वाटते. थोडक्यात म्हणजे कोणाला कशाची भीती वाटेल याचा काही नेम नाही !

एखाद्या माणसाला कशाबद्दल तरी अशी अतोनात भीती का वाटते याची कारणमीमांसा अनेक तज्ज्ञांनी अनेक प्रकारे केली आहे; परंतु या विषयावर तज्ज्ञांचे एकमत झालेले दिसत नाही. मात्र सुदैवाची गोष्ट अशी आहे की, जर तुम्हाला तुमच्या मनातील एखाद्या भीतीवर मात करावयाची असेल तर ती भीती तुमच्या मनात का व कशी निर्माण झाली, हे समजावून घेण्याची आवश्यकता नाही. तुमच्या मनातील त्या भीतीचे मूळ कारण न कळताही तुम्हाला मनःचक्षूच्या साहाय्याने त्या भीतीवर मात करता येईल.

आता मी माझ्या मनातील कुत्र्याबद्दलची अवास्तव भीती काढून टाकण्यासाठी मनःचक्षूच्या सामर्थ्याचा उपयोग कसा केला, ते थोड्या विस्ताराने सांगतो. माझ्या अनुभवावरून धडा घेऊन तुम्ही तुमच्या मनातील तशाच प्रकारच्या भीतीपासून स्वतःची सुटका करून घेऊ शकाल.

काही वर्षांपूर्वी कुत्रा म्हटले की, माझी भीतीने गाळण उडत असे. त्यामुळे साहजिकच मी कुत्र्यांपासून अगदी दूर राहत असे. ज्या लोकांच्या घरी पाळलेला कुत्रा असेल, त्यांच्या घरी जाणे मी शक्यतो टाळीत असे; परंतु माझ्या एका जिवलग मित्राचे लग्न झाल्यावर माझ्यापुढे एक नवीनच प्रश्न उभा राहिला. माझ्या त्या मित्राने त्याच्या बायकोच्या आग्रहाखातर घरात एक अल्सेशिएन कुत्रा आणल्यापासून मला त्याच्याकडे जाणे म्हणजे एक दिव्यच वाटू लागले !

अर्थात, मी त्याच्याकडे गेलो की तो किंवा त्याची बायको त्यांच्या मोठ्या कुत्र्याला घरातील आतल्या खोलीत साखळीने बांधून ठेवीत असत. कारण कुत्र्याबद्दलची माझी भीती त्यांना ठाऊक होती. तरीसुद्धा त्यांच्याकडे जाणे मी टाळू लागलो. खरे म्हणजे मी व माझा तो मित्र शाळेत असल्यापासून दिवसाकाठी एक–दोन वेळा एकमेकांच्या घरी जात येत होतो; परंतु आता मी त्याच्या घरी गेलो की, मी असेपर्यंत माझ्यामुळे त्यांच्या कुत्र्याला बांधून ठेवावे लागत असे, हे काही मला आवडत नसे. शिवाय त्या दोघांनाही त्यांचा कुत्रा घरात असताना त्याला बांधून ठेवणे पसंत नसे, हेही मी ओळखले होते. त्यामुळे माझा भित्रेपणा इतरांना त्रासदायक व्हावा, याची मला खंत वाटू लागली. याचा परिणाम असा झाला की, आपण आपल्या भित्रेपणावर मात केली पाहिजे, असे मला अगदी मनापासून वाटू लागले व मी लगेच त्या कामाला लागलो.

सुरुवातीलाच माझ्या असे लक्षात आले की, मी कुत्र्याला कमालीचा भीत असे हे खरे होते तरी मला सर्वच कुत्र्यांची सर्वच प्रसंगी काही भीती वाटत नसे. उदाहरणार्थ, मी बागेत फिरावयास जात असे तेव्हा काही मी घाबरत नसे. तसेच, अगदी मध्यरात्रीसुद्धा

सिनेमा संपल्यावर मित्रांबरोबर घरी परत येत असताना रस्त्यावरील कुत्रे भुंकले तरी माझ्याबरोबर मित्र असल्यामुळे माझी घाबरगुंडी उडत नसे आणि सिनेमामध्ये कुत्रा पाहून तर मला काहीच भीती वाटत नसे ! ही वस्तुस्थिती विचारात घेऊन मी पंधरा प्रसंगांचे थोडक्यात वर्णन करणारी एक यादी तयार केली. मी निवडलेल्या त्या पंधरा प्रसंगांचे वैशिष्टय असे होते की, प्रत्येक प्रसंगात कोणत्या ना कोणत्या प्रकारे कुत्र्याचा समावेश झालेला होता. ते निवडक पंधरा प्रसंग खाली दिले आहेत.

१. मी कुत्र्यांच्या जीवनावरील एक सिनेमा पाहत आहे.

२. माझ्या घरासमोरील इमारतीमधील एका कुत्र्याचे भुंकणे मला ऐकू येत आहे.

३. मला रस्त्यात भेटलेल्या व्यक्तीच्या हातात साखळीने बांधलेला कुत्रा असताना, मी त्या व्यक्तीशी सुरक्षित अंतरावरून गप्पा मारीत आहे.

४. मी मोटारीतून जात असताना, एक कुत्रा मोठ्याने भुंकत, काही वेळ मोटारीच्या मागे धावत येत आहे.

५. मी एका घरात प्रवेश करीत असताना, साखळीने बांधलेला एक कुत्रा माझ्याकडे पाहून जोरजोरात भुंकत आहे.

६. मी बागेत फिरावयास गेलो असताना, एक माणूस चेंडू दूर फेकून देतो व त्याचा पाळीव कुत्रा धावत जाऊन तो चेंडू आपल्या धन्याला परत आणून देतो.

७. मी परगावी गेलो असताना ज्या अतिथिगृहात उतरलो आहे, त्या अतिथिगृहाच्या मालकाने पाळलेले तीन कुत्रे सर्वत्र संचार करीत आहेत.

८. सिनेमा पाहून मी मध्यरात्री एकटाच घरी परत येत असताना, मला दूरवर भुंकणाऱ्या कुत्र्यांचा आवाज ऐकू येतो.

९. माझ्या घराशेजारी राहणाऱ्या देशपांडेचांचा आठ वर्षांचा चंदू, कुत्र्याचे छोटे पिल्लू घेऊन माझ्या घरी आला आहे.

१०. चंदूच्या हातातील कुत्र्याच्या पिल्लाला मी मोकळेपणाने गोंजारत व थोपटत आहे.

११. चंदूला त्याच्या आईने हाक मारल्यामुळे, हातातील कुत्र्याचे पिल्लू खाली ठेवून, तो त्याच्या घरी पळून जातो आणि त्याचे कुत्र्याचे पिल्लू माझ्याजवळ येऊन मला हुंगू लागते.

१२. मी माझ्या जिवलग मित्राच्या घरी जाऊन, त्याच्याशी गप्पा मारीत बसलो आहे. त्याचा न बांधलेला अल्सेशियन कुत्राही शेजारीच बसला आहे. माझा मित्र मध्येच उठून आतल्या खोलीत जातो व त्याचा कुत्रा तसाच माझ्या शेजारी बसून राहतो.

१३. मी माझ्या जिवलग मित्राच्या घरी जातो तेव्हा, त्याचा साखळीने न बांधलेला कुत्रा माझ्या अगदी जवळ येऊन मला हुंगावयास लागतो.

१४. मी माझ्या जिवलग मित्राच्या घरी गेलो आहे व त्याच्या अल्सेशियन कुत्र्याला गोंजारत व थोपटत आहे.

१५. माझा मित्र व त्याची बायको घरी नसताना, मी त्याच्या अल्सेशियन कुत्र्याशी मजेत खेळत आहे.

वरील यादी तयार करण्यासाठी निवडलेल्या प्रसंगांना क्रमांक



देताना, मी एक खबरदारी घेतली होती, ती म्हणजे ज्या प्रसंगाची मला अजिबात भीती वाटत नव्हती त्या प्रसंगाला पहिला क्रमांक देणे आणि नंतर मला ज्या प्रसंगाबद्दल अधिकअधिक भीती वाटत होती त्यांना २,३,४ असे क्रमांक देत जाऊन, अखेर ज्या प्रसंगाबद्दल मला सर्वांत जास्त भीती वाटत होती त्या प्रसंगाला पंधरावा क्रमांक देणे. म्हणजे असे म्हणता येईल की, यादीतील प्रसंग खरोखरच त्यांना वरती दिलेल्या क्रमाने घडत गेले असते तर प्रत्येक प्रसंगी माझ्या मनातील भीती वाढत गेली असती व शेवटच्या प्रसंगाच्या वेळी त्या भीतीने सर्वांत जास्त तीव्र स्वरूप धारण केले असते.

एवढी पूर्वतयारी झाल्यावर, मी माझ्या मनातील रंगभूमीवर एकपात्री प्रयोग सादर करण्यास सुरुवात केली. पहिला प्रयोग सादर करण्याच्या दिवशी मी सकाळी ६॥ वाजता, चहा पिऊन झाल्यावर, पलंगावर डोळे मिटून स्वस्थ पडलो. पहिली दहा मिनिटे मी माझे सर्व अंग मोकळे, सैल सोडून पडून राहिलो. माझ्या शरीरातील सर्व स्नायूंमधील ताण–तणाव खूप कमी झाले होते असे वाटल्यावर, मी डोळे उघडून माझ्याजवळील पंधरा प्रसंगांची यादी उजव्या हातात घेऊन, त्यातील पहिल्या क्रमांकाचा प्रसंग वाचला. नंतर ती यादी

परत पलंगावर माझ्याजवळ ठेवून देउन मी डोळे मिटून घेतले. काही वेळाने मी माझ्या मनातील रंगभूमीवर असा प्रयोग सादर केला की, मी कुत्र्यांच्या जीवनावरील एक सिनेमा पाहत होतो. माझ्या मनातील रंगभूमीवर अगदी तपशीलवारपणे सादर केलेला हा प्रयोग चालू असताना, मी अगदी शांत होतो. मला कसलीही भीती वाटत नव्हती.

## आठवड्यातून फक्त एक तास !

पुढच्या टप्प्यावर, मी डोळे उघडून माझ्याजवळील यादी उजव्या हातात घेउन, त्यावरील क्रमांक दोनचा प्रसंग वाचला आणि ती यादी परत पलंगावर माझ्याजवळ ठेवून दिली. नंतर मी डोळे मिटून घेतले व माझ्या घरासमोरील इमारतीतील एका कुत्र्याचे भुंकणे मला ऐकू येत होते, असा प्रसंग कल्पनेच्या कुंचल्याने माझ्या मन:पटलावर रंगविला. माझ्या मन:पटलावरील या प्रतिमेमुळेही मी यत्किंचितसुद्धा अस्वस्थ झालो नाही.

याच पद्धतीने नंतर मी जेव्हा माझ्या यादीतील तिसरा प्रसंग मन:चक्षूंच्या सहाय्याने पाहू लागलो, तेव्हा मी थोडासा अस्वस्थ झालो. त्यामुळे मी तो प्रसंग पुन्हापुन्हा माझ्या मन:पटलावर रेखाटला आणि अखेर अशी एक वेळ आली की, मानसिक अथवा शारीरिकदृष्ट्या अजिबात अस्वस्थ न होता, मी तो प्रसंग माझ्या मन:पटलावर अगदी सर्व बारकाव्यांसह चित्रित करू शकलो.

अशा प्रकारे मी माझ्या यादीतील उरलेले सर्व प्रसंग क्रमाक्रमाने माझ्या मनातील रंगभूमीवर सादर करीत राहिलो. असा सराव करण्यामागे माझे उद्दिष्ट स्पष्ट होते. ते म्हणजे माझ्या यादीतील सर्वच्या सर्व प्रसंग मी कल्पनेच्या कुंचल्याने माझ्या मन:पटलावर रेखाटले तरी मला ते प्रसंग शारीरिक अथवा मानसिकदृष्ट्या अस्वस्थ न होता पाहता आले पाहिजेत. माझे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नेटाने सराव करीत असताना, मी एक पथ्य अगदी काटेकोरपणे पाळले होते. ते पथ्य म्हणजे समजा माझ्या यादीतील एखादा प्रसंग माझ्या मनातील रंगभूमीवर सादर केल्यावर मला मानसिक अथवा शारीरिकदृष्ट्या जरी अगदी किंचित अस्वस्थता जाणवू लागली, तरी लगेच तो एकपात्री नाट्यप्रयोग बंद करून, मी माझे सर्व शरीर सैल सोडून माझ्या डोक्यापासून पायांच्या बोटांपर्यंत स्नायूमधील ताण–तणाव, करता येतील तितके कमी करीत असे आणि माझ्या मनाची व शरीराची आरामदायक अवस्था परत अनुभवाला आल्यावरच तो रद्द केलेला नाट्यप्रयोग मी परत माझ्या मनातील रंगभूमीवर चालू करीत असे.

मी करीत होतो ते काम काही अगदी सोपे नव्हते. कारण माझ्या यादीतील क्रमांक बाराचा प्रसंग जेव्हा मी माझ्या मन:पटलावर रंगविण्यास सुरुवात केली तेव्हा मी इतका अस्वस्थ झालो की, मी डोळे उघडून पलंगावर चुळबुळ करू लागलो आणि मी पाळीत असलेल्या पथ्यानुसार माझ्या मनातील रंगभूमीवरील तो नाट्यप्रयोग मी बंद तर केलाच; पण मला स्पष्टपणे जाणवत होते ते मानसिक व शारीरिक ताण–तणाव कमी होऊ देण्यासाठी मी काही वेळ डोळे मिटून, चुळबुळ न करता पलंगावर शांतपणे पडून राहिलो. थोड्या वेळाने मी जेव्हा माझी मानसिक व शारीरिक शांती परत मिळविली, तेव्हा बंद केलेला तो प्रयोग मी परत माझ्या मनातील रंगभूमीवर सादर करण्यास सुरुवात केली.

थोड्याच दिवसांत माझी चिकाटी फळाला आली. पहिल्या आठवड्यात, एका सकाळी एकूण २० मिनिटे अशा पद्धतीने माझ्या मनातील रंगभूमीची आराधना करण्यास सुरुवात केल्यावर चौथ्याच दिवशी माझ्या शेजारी राहणाऱ्या चंदूच्या कुत्र्याला मी अचानक आपणहून कुरवाळले आणि तीन आठवड्यांनंतर मी जेव्हा माझ्या एकदा जिवलग मित्राच्या घरी गेलो होतो, तेव्हा त्याला आपणहूनच सांगितले की, 'कुत्रा बांधून ठेवण्याची काही गरज नव्हती; कारण मला माझ्या मनातील भीतीवर मात करावयाची आहे.' अर्थात माझ्या मित्राचा मोठा अल्सेशियन कुत्रा जेव्हा माझ्याजवळ येऊन मला हुंगू लागला, तेव्हा मी थोडासा अस्वस्थ झालो; पण माझी भीतीने गाळण उडाली नाही. पुढे काही दिवसांनी मी त्या कुत्र्याशी खेळण्यापर्यंत मजल मारली.

माझ्या मनातील कुत्र्याबद्दलची भीती नष्ट करण्यासाठी मला तीन आठवड्याच्या काळात एकूण किती वेळ खर्च करावा लागला? प्रत्येक आठवड्यात तीन दिवस सकाळी २० मिनिटे मी माझ्या मनातील रंगभूमीची आराधना करण्यात घालविली. म्हणजे एका आठवड्यात एक तास, याप्रमाणे तीन आठवड्यांत मी एकूण तीन तास या आराधनेसाठी खर्च केले. अर्थात एखादा माणूस हेच काम याहूनही कमी वेळात करू शकेल किंवा एखाद्या माणसाला हेच काम करण्यास याहूनही अधिक वेळ लागेल.

माझ्या भित्रेपणावर मात करण्यासाठी मी जी पद्धत वापरली, ती पद्धत एका तत्त्वावर आधारलेली आहे. ते तत्त्व म्हणजे ज्या गोष्टीबद्दल माणसाला प्रत्यक्ष जीवनात भीती वाटते, तीच गोष्ट त्याच्या मनातील रंगभूमीवर काल्पनिक स्वरूपात उभी राहिली, तरीही त्याला तिचे भय वाटते आणि जी गोष्ट त्याच्या मनातील रंगभूमीवर काल्पनिक स्वरूपात उभी राहिली असता कालांतराने त्याला भीती वाटेनाशी होते, तीच गोष्ट त्याच्या जीवनात प्रत्यक्ष घडली, तरीही त्याला तिचे भय वाटेनासे होते.

वरील तत्त्वाचा उपयोग करून, मी माझ्या मनातील कुत्र्याची भीती काढून टाकण्यासाठी मुख्यत: काय बरे केले ? मी माझ्या मन:पटलावर कुत्र्यासंबंधी अनेक काल्पनिक प्रतिमा परत-परत उभ्या करून, टप्पाटप्प्याने प्रथम माझ्या मनाला त्या काल्पनिक प्रतिमांना निर्भयपणे सामोरे जाण्यास शिकविले. मी तयार केलेल्या यादीतील पंधरा प्रसंग, माझ्या मनातील रंगभूमीवर केव्हाही सादर केल्यावर मी जेव्हा त्यांना निर्भयपणे सामोरे जाण्यास शिकलो, तेव्हा अखेर एक दिवस असा उजाडला की, त्या दिवशी मी माझ्या जिवलग मित्राकडे गेलो व त्याच्या मोठ्या अल्सेशियन कुत्र्याशी प्रत्यक्ष खेळावयास लागलो !

माझ्या वरील उदाहरणावरून माणसाच्या मनातील खाजगी रंगभूमीवरील नाट्य–जीवनाचा व त्याच्या प्रत्यक्ष जीवननाट्याचा किती घनिष्ट संबंध असतो, हे तुमच्या लक्षात आले असेल. त्यामुळे आपल्या मनातील एखाद्या गोष्टीविषयीची अवास्तव भीती काढून टाकण्याच्या पुढील दोन पद्धती समजावून घेणे तुम्हाला सोपे जाईल. त्या दोन्ही पद्धती मी वापरलेल्या पद्धतीहून भिन्न असल्या तरी त्या

पद्धतींची रचना मी वापरलेल्या पद्धतीत अध्याहृत असलेल्या तत्वानुसारच केलेली आहे.

त्या दोन पद्धतींपैकी पहिल्या पद्धतीचा उपयोग करून जगदीशने स्वतःच्या मनातील एका त्रासदायक भीतीचे अगदी थोड्या दिवसांत पारिपत्य करून टाकले. त्याला एखाद्या उंच इमारतीत लिफ्टमधून वर अथवा खाली जाण्याची भयंकर भीती वाटत असे. आपण लिफ्टमध्ये असताना विजेचा प्रवाह बंद पडून किंवा इतर काही कारणामुळे लिफ्ट बंद पडली तर, आपण अनेक तास लिफ्टमध्येच अडकून पडू याची त्याला इतकी कमालीची भीती वाटत असे की, तो शक्यतो लिफ्टमध्ये पाऊल टाकणेही टाळत असे. एखाद्या इमारतीत सहाव्या मजल्यावरही तो आपला सरळ जिना चढून जात असे व त्यामुळे त्याला धाप लागत असे ! अखेर एक दिवस त्याने आपल्या मनातील लिफ्टची भीती नाहीशी करण्याचे ठरविले.

एकदा निर्णय पक्का झाल्यावर, जगदीश डोळे मिटून शांतपणे आरामखुर्चीत बसला व त्याने स्वतःच्या मनातील रंगभूमीवर एक वीररसप्रधान नाटक सादर केले. त्या नाटकाचे मध्यवर्ती कथानक म्हणजे जगदीशचे प्रसंगावधान ! त्याने अशी कल्पना केली की, तो एका इमारतीतील लिफ्टमधून सहाव्या मजल्यावर जात आहे व त्या लिफ्टमध्ये आणखीही तीन माणसे आहेत. अचानक विजेचा प्रवाह बंद पडून लिफ्ट बंद पडली आहे. लिफ्टमधील ती तीन माणसे घाबरून गेली आहेत; परंतु जगदीश घाबरलेला नाही. उलट तो त्या तीन माणसांना धीर देत आहे. अशा प्रसंगी लिफ्टमधील माणसांना काही वेळ अडकून पडावे लागत असले तरी विजेच्या प्रवाहाशिवाय लिफ्ट तळमजल्यावर नेण्याची सोय असते, असे तो त्या तीन व्यक्तींना समजावून सांगत आहे. त्यामुळे त्या चौघांच्या पुढील मुख्य प्रश्न म्हणजे काही तरी करून लिफ्टबाहेरच्या लोकांना लिफ्टमध्ये काही माणसे अडकून पडलेली आहेत हे जाणवून देणे हा आहे, असेही तो त्याच्या बरोबरच्या तीन माणसांना पटवून देत आहे...

जगदीशने आपल्या मनातील रंगभूमीवर सादर केलेल्या नाटकाचे वैशिष्टच म्हणजे त्या नाटकात असे दाखविले होते की, जगदीश स्वतः प्रसंगावधान राखून त्याच्या समोरील बिकट परिस्थितीला धैर्याने तोंड देत आहे. शिवाय यासंबंधीचे बारीकसारीक तपशीलही जगदीशच्या नाटकात चित्रित केलेले होते.

वरील स्वरूपाचे मध्यवर्ती कथानक असलेल्या नाटकाचा एकपात्री प्रयोग, जगदीशने आपल्या मनातील रंगभूमीवर सादर करण्याचा सराव न चुकता ओळीने पाच दिवस केला. त्यानंतर तो जेव्हा काही कामासाठी इतर दोघांबरोबर लिफ्टमधून एका उंच इमारतीच्या आठव्या मजल्यावर गेला, तेव्हा त्याला फारच थोडी भीती वाटली. काही दिवसांनी त्याची भीती जवळजवळ नष्ट झाल्यावर, त्याने आपल्या मनातील रंगभूमीवर असा प्रयोग सादर केला की, तो एकटाच लिफ्टमधून एका इमारतीच्या आठव्या मजल्यावर जात असताना मध्येच लिफ्ट बंद पडली आहे; परंतु एकटा असूनही, गांगरून न जाता जगदीश प्रसंगावधान राखून त्या परिस्थितीशी धैर्याने मुकाबला करीत आहे. त्या नाट्यप्रयोगातही, अशा वेळी नेमके काय करावयास हवे, ते तपशीलवारपणे चित्रित करावयास जगदीश विसरला नाही.



वरील सुधारित नाटकाचा प्रयोग जगदीशने फक्त दोनच वेळा आपल्या मनातील रंगभूमीवर सादर केल्यावर त्याला असे वाटू लागले की, आता एकदा लिफ्टमधून एकट्याने जाऊन पाहण्यास हरकत नाही. म्हणून तो एका इमारतीतील लिफ्टने मुद्दाम एकटाच, सहा वेळा तळमजल्यावरून शेवटच्या मजल्यावर जाऊन परत आला. याचा परिणाम असा झाला की, आपल्याला लिफ्टची इतकी भीती का वाटत होती याचे त्याला आश्चर्य वाटले !

## शैलाच्या जीवनातील क्रांती !

दुसऱ्या पद्धतीचा उत्तम उपयोग शैलाने केला. ती दहा वर्षांची होती तेव्हापासून तिने कोणालाही कधी आपला फोटो काढू दिला नव्हता. शिवाय कळत अथवा न कळत कोणी तरी आपला फोटो काढील, अशी विचित्र भीती तिच्या मनात ठाण मांडून बसली होती. स्वतःचा फोटो काढला गेला तर तिच्यावर अशी कोणती आपत्ती कोसळेल हे जसे तिला कधी सांगता येत नसे, तसेच ही भीती तिला नेमकी केव्हापासून अस्वस्थ करू लागली होती, हेही तिला सांगता येत नसे मात्र कोणत्याही परिस्थितीत ती कोणाला कधी आपला फोटो काढू देत नसे. दोन वर्षांपूर्वी तिच्या मोठ्या बहिणीचे लग्न झाले तेव्हा घरातील सर्व कुटुंबियांचे जे अनेक फोटो काढले होते, त्यांतील एकाही फोटोमध्ये शैला सामील झाली नव्हती. आज वीस वर्षांची शैला एका महाविद्यालयात शिकत आहे; परंतु गेल्या दहा वर्षांत तिने स्वतःचा फक्त एकदाच फोटो काढून घेतला आहे. महाविद्यालयातील ओळख–पत्रिकेवर तिचा फोटो आवश्यकच होता,

म्हणून तिने महाप्रयासाने धीर धरून स्वतःचा एक फोटो कसाबसा काढून घेतला होता !

तीन महिन्यापूर्वी, शैलाने आपल्या मनातील स्वतःचा फोटो काढून घेण्याबद्दल वाटणारी भीती काढून टाकण्यासाठी, आपल्या मनातील खाजगी रंगभूमीची आराधना करण्याचा निर्धार केला. एक दिवस ती डोळे मिटून शांतपणे आरामखुर्चीत बसली व मग तिने आपल्या मनातील रंगभूमीवर खालील नाटयप्रयोग सादर केला :

शैलाच्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या एका गटाने काही तरी क्षुल्लक गाऱ्हाणी उकरून काढून संप पुकारला आहे; परंतु विद्यार्थ्यांच्या त्या तथाकथित क्रांतिकारक गटाला बहुसंख्य विद्यार्थी–विद्यार्थिनींचा अजिबात पाठिंबा नसल्यामुळे, महाविद्यालयाचे कामकाज सुरळीतपणे चालू आहे. साहजिकच संप पुकारल्याला चार दिवस झाल्यानंतर त्या तथाकथित क्रांतिकारक गटातील विद्यार्थ्यांनी दहशतीचे मार्ग अनुसरण्यास सुरुवात केली आहे. वर्गात नियमितपणे हजर राहणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींना तो गट धमक्या देऊ लागला आहे आणि एका स्थानिक वृत्तपत्राचा उपयोग करून तो गट शहरात असा समज पसरवीत आहे की, जणू काही त्या गटाने पुकारलेल्या संपाला महाविद्यालयातील विद्यार्थी–विद्यार्थिनींचा प्रचंड पाठिंबा आहे.

महाविद्यालयाच्या चालकांनीही आता एका वृत्तपत्रातखरी परिस्थिती काय आहे, याबद्दल एक निवेदन प्रसिद्ध करण्याचे ठरविले आहे. वस्तुतः महाविद्यालयातील सर्व वर्ग नेहमीप्रमाणे चालू आहेत; फक्त काही विद्यार्थ्यांचा एक गट दहशतीचे वातावरण करण्याचा प्रयत्न करीत आहे, ही वस्तुस्थिती जनतेपुढे ठेवण्यासाठी महाविद्यालयाच्या चालकांनी असेही ठरविले आहे की, त्यांच्या निवेदनाबरोबर वर्गात विद्यार्थी–विद्यार्थिनी शांतपणे व्याख्याने ऐकत आहेत, हे दाखविणारे दोन–तीन फोटोही वर्तमानपत्रात प्रसिद्ध करावेत.

शैला तिच्या वर्गात बसली आहे. तिच्या वर्गात जवळजवळ शंभर विद्यार्थी–विद्यार्थिनी हजर आहेत. प्राध्यापक शिकवीत असताना अगोदर ठरल्याप्रमाणे उप–प्राचार्य प्राध्यापकांना विचारून वर्गात प्रवेश करतात. महाविद्यालयाच्या चालकांनी वृत्तपत्राकडे कोणते निवेदन पाठविण्याचे योजिले आहे, यासबंधी उप–प्राचार्य वर्गातील विद्यार्थी–विद्यार्थिनींना थोडक्यात माहिती सांगतात आणि नंतर त्यांच्याबरोबर आलेल्या फोटोग्राफरला काही फोटो घ्यावयास सांगून ते स्वतः वर्गातून निघून जातात. वर्गातील प्राध्यापक पुन्हा आपले शिकवण्याचे काम चालू करतात.

शैलाच्या वर्गात ही घटना घडत असताना, त्या क्रांतिकारक विद्यार्थ्यांच्या गटातील काही विद्यार्थी वर्गाबाहेर उभे राहून मोठमोठ्याने घोषणा देत असतात. ते विद्यार्थी इतके खवळले आहेत की, शैला आपला आता वर्गात फोटो काढला जाईल या भीतीने वर्गातून मागच्या दरवाज्याने बाहेर जाईल तर, ते खवळलेले विद्यार्थी तिच्याशी कशा प्रकारे वागतील ते काही सांगता येत नाही. त्यामुळे एकटीने बाहेर जाण्याऐवजी, शंभर विद्यार्थी–विद्यार्थिनींच्याबरोबर वर्गात बसून आपला फोटो काढला जाण्याचा धोका पत्करावा, असे तिने ठरविले. कारण तो धोका बाहेरील परिस्थितीपेक्षा कमी तापदायक आहे, असे तिला वाटले. इतक्यात फोटोग्राफरने दोन फोटो काढूनही टाकले आणि थोड्या वेळाने शैलाला वाटू लागले की, तिचा फोटो काढला जाणे ही तिला वाटत होती तेवढी काही घनघोर आपत्ती नव्हती.

दुसऱ्या दिवशी एका वर्तमानपत्रात, तिच्या महाविद्यालयातर्फे दिलेले निवेदन तीन फोटोसहित प्रसिद्ध झाले. त्यापैकी एका फोटोतील कोपऱ्यात शैलाचा चेहरा स्पष्टपणे दिसत असतो; परंतु तो फोटो पाहूनही शैलाला वाटते की, आदल्या दिवशी एकटीने वर्गाबाहेर जाण्याऐवजी तिने वर्गातच बसून राहण्याचे ठरविले, हेच शहाणपणाचे होते.

शैलाने तिच्या मनातील रंगभूमीवर सादर केलेल्या नाटकाचे कथानक अतिशय काळजीपूर्वक रचले होते त्या नाटकात शैलाने आपला फोटो काढला जाण्याबद्दलच्या भीतीचा अर्थातच समावेश केलेला होता; परंतु त्या नाटकाचे मुख्य कथानक अशा खुबीने रचले होते की, शैला तिच्या मनातील फोटोबद्दल वाटणाऱ्या भीतीनुसार वागली असती तर ती आगीतून फुफाट्यात गेली असती, असे स्पष्टपणे सूचित केले होते आणि उलट तिने आपल्या मनातील फोटोबद्दल वाटणाऱ्या भीतीवर मात केली असती तर तिला दुसऱ्या एका अधिक त्रासदायक घटनेपासून स्वतःचा बचाव करता येणे शक्य होते, हेही त्या कथानकातून निदर्शनास आणले होते.

पुढील दोन आठवड्यात शैलाने स्वतःच लिहिलेल्या वरील नाटकाचा प्रयोग आपल्या मनातील रंगभूमीवर एकूण फक्त चार वेळा तपशीलवारपणे सादर केला आणि नंतर एक दिवस ती सरळ एका फोटोस्टुडिओत गेली व तिने आपले स्वतःचे दोन फोटो काढून घेतले !

स्वतःच्या मनातील भीतीला अर्धचंद्र देण्यासाठी, मी, जगदीशने व शैलाने ज्या तीन पद्धतींचा अवलंब केला त्या तिन्ही पद्धती समजावून घेताना एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे तुम्ही विशेष लक्ष दिले पाहिजे. तो मुद्दा म्हणजे त्यापैकी कोणतीही पद्धत वापरताना तुम्ही अगोदर शांतपणे सर्व अंग मोकळे सोडून खुर्चीवर आरामशीरपणे बसण्याचा किंवा पलंगावर पडून राहण्याचा सराव करावयास हवा. आपल्या शरिरातील शक्य तेवढ्या सर्व स्नायूमधील ताण–तणाव खूप कमी झाल्यावरच, तुम्ही आपल्या मनातील रंगभूमीवर एकपात्री नाटयप्रयोग सादर करण्यास सुरुवात केली पाहिजे. तसेच, तुम्ही आपल्या मनातील रंगभूमीवर नाटयप्रयोग सादर करीत असताना, तुम्हाला कोणत्याही क्षणी मानसिक किंवा शारीरिक अस्वस्थता जाणवू लागली तर नाटयप्रयोग बंद करून तुम्ही परत आरामशीरपणे बसण्याची किंवा पडून राहण्याची खबरदारी घेतली पाहिजे. थोडक्यात म्हणजे तुमच्या मनातील रंगभूमीवर तुम्हाला भीतिदायक वाटणारा प्रसंग सादर केला जात असताना, तुम्हाला जेव्हा अजिबात अस्वस्थ न होता तो प्रसंग पाहता येईल, तेव्हाच अशी शक्यता निर्माण होईल की, तो प्रसंग तुमच्या जीवनात प्रत्यक्ष घडला तर तुम्ही त्या प्रसंगाला निर्भयपणे सामोरे जाऊ शकाल आणि मग कालांतराने तुम्ही तुमच्या मनातील अवास्तव भीतीला कायमचा रामराम ठोकाल.

आता तुमच्या मनात साहजिकच असा प्रश्न उभा राहील की, सर्व अंग मोकळे सोडून, आरामशीरपणे खुर्चीत बसण्याचा किंवा पलंगावर पडून राहण्याचा सराव कसा करावा ? असा सराव करण्याची दोन सोपी तंत्रे या पुस्तकाच्या शेवटी दिलेल्या परिशिष्टात वर्णन करून सांगितलेली आहेत. सुरुवातीला तुम्ही त्या दोन्ही तंत्रांचा प्रयोगादाखल अवलंब करून, आरामशीरपणे बसण्याचा किंवा पडून राहण्याचा प्रयत्न करा आणि मग त्या दोन तंत्रांपैकी तुम्हाला जे तंत्र अधिक सोपे व सोयीचे वाटेल, त्या तंत्राची नेहमीच्या सरावासाठी निवड करा. तुम्ही निवडलेल्या तंत्रानुसार काही दिवस सराव केल्यावर तुम्हाला शारीरिक व मानसिकदृष्ट्या आरामशीरपणे बसण्याचे किंवा पडून राहण्याचे कसब साध्य करून घेता येईल. ☐

(क्रमशः)

# अनवट

## □ मार डालो हमें !

परवाच पुण्यातले एक वृद्ध शीख गृहस्थ भेटले. अमृतसरच्या सुवर्णमंदिरातील प्रकाराबद्दल बोलत असतानाच त्यांनी म्हटले, 'मुझे कहो, भिंडरांवाले लोंगोवाल का कहना क्या गलत था? भारत के खिलाफ कब उन्होने नारा लगाया? वो तो सिर्फ 'धरमपथपर चलो' कह रहे थे!'

पंजाबात इतक्या हत्या का होतात? त्यावर सरदारजी उत्तरले, 'अरे बाबा, जो हमारे धरम के खिलाफ हैं, हमेशा हमारे धरम को कोसता है, उसेही मार डालते हैं, दूसरे को नहीं।'

आम्ही आपले चाट. हे बरं आहे आपल्याविरुद्ध बोलला की मारा!

त्यावर सरदारजी म्हणाले, 'ये देखो बेटा, मैं खुद पाकिस्तानसे यहाँ आया (पूना में)। हम जी जानसे इस देश में रहते हैं। पंजाब मे हिंदुओ के अंग्रेजी, हिंदी अखबार, लाला जगतनारायण के अखबार–सब सिख्खो के खिलाफ लिखते हैं। अरे, जरा पंजाब में जाकर देखो तो क्या हाल है। बस वह इंद्रा ( गांधी ) और ये अखबारवाले इन के बहकाये में तुम आते हो।'

'बुरे-हठीले आदमी किस मजहब में नही। उन के खातिर सब सिख्खों को बदनाम मत करो!' असं काकुळतीनं सांगून हा म्हातारा मग भिंडरांवाले, अतिरेकी याचेही समर्थन करू लागला.

राजकारण, धर्म आणि आध्यात्मिक–नैतिक धर्म याची सामान्य शीख व त्याचे नेते ( आपल्या दृष्टीने ) नेहमीच गल्लत करतात. तशी हा वृद्धही करीत होता

परंतु शीख माणसाची आपल्याला बळी बनविले जात आहे, बदनाम केले जात आहे अशी भावना वाढतच जात आहे. त्यातच वरील प्रकारची गल्लत चूक असेल; पण ती वास्तव आहे, याची नोंद सर्वांनीच घ्यायला हवी.

या सर्व गोष्टी ऐकवतानाच हा म्हातारा म्हणाला, 'करो, और मारो, मार डालो हमें; कतल करो, मत रहने दो यहाँ। छुप-छुप के, मिलिटरी के जरिये क्या लडते हो, सामने आओ–हो जाने दो खुल्ला जंग!–' वगैरे

ऐकताना हे सर्व विनोदी वाटत असलं तरी एक होतात्म्याची व अलगतेची दृढ होत चाललेली भावना स्पष्ट होत होती. तो म्हणाला, 'छापो पेपर में यह सब। नाम लिख्खो. जेल में डालने दो मुझे!'

–तर हे पुण्याचे एक व्यापारी कर्तारसिंग राजपाल.

## □ सुटकेचा निःश्वास

दरम्यान अमृतसरच्या सर्वच रहिवाशांनी आता सुटकेचा निःश्वास टाकला. रोज बंदुकांच्या अनाम धाकाखाली जगणे संपले. ६ जूनच्या लष्करी कारवाईत ५७६ जण मारले गेल्याचे सांगितले, तरी किमान १ हजारजण ठार झाले असावेत असा अंदाज आहे

'इंडियन एक्स्प्रेस'च्या वार्ताहराने लगोलग पंजाब, अमृतसरमध्ये जाऊन पाहणी केली. त्या वेळी जलियांवाला बाग भागात राहणारे बांतासिंग म्हणाले की, 'सहा जूनच्या पहाटे प्रेतांनी लदबदलेल्या ट्रॉलिजच्या ट्रॉलिज माझ्या घरावरनं गेल्या!' इंदर प्रकाश ही गृहिणी म्हणते की, १९६५ व १९७१ च्या हल्ल्यापेक्षा हा प्रकार भयानक होता! सुवर्णमंदिराच्या आसपास २०० यार्डपर्यंत सर्वच उद्ध्वस्त झाले आहे. आता या जागी नवीन दुकाने परत वसविण्यापेक्षा अत्यंत अरुंद रस्ता रुंद करावा अशी तिथल्या लोकांची मागणी आहे.

सुवर्णमंदिरातील रक्त धुऊन काढण्याचे व शस्त्रे हुडकण्याचे काम चालू असतानाच आसपासच्या लोकांना दहशतवाद्यांच्या धाकाचे दिवस आठवताहेत. हे लोक आसपासच्या कोणत्याही दुकानात जाऊन पैसे किंवा वस्तू बिनदिक्कत उचलून चालू लागायचे. सुवर्णमंदिरातील भक्तांची वर्दळदेखील कमी झाली होती. १९८२ मध्ये 'बैसाखी'च्या दिवशी १ लाख ९० हजार नैवेद्याचा निधी जमला. १९८३ मध्ये तो ७६ हजारांवर आला, तर गेल्या बैसाखीत तो ४२ हजारांवर होता!

## □ धर्माचाच कणा मोडला !

तिकडे भिंडरांवाले यांच्या 'रोडे' या गावात त्याचे स्मरण चालू होते. 'इंडियन एक्स्प्रेस'वाले तिकडेही अनेक हिकमतीनी जाऊन आले. जर्नेलसिंगचे वडील जथेदार जोगिंदरसिंग म्हणाले की, 'त्याला मारून सरकारने दहशतवादाचा नव्हे तर धर्माचा कणाच मोडला!' जर्नेलसिंगने अनेक हिंदूंना मदत केली असे काहींनी सांगितले. रोडे गावात कुठलाच धार्मिक तणाव नव्हता.

१९४७ साली जन्मलेले जर्नेलसिंग हे जोगींदरसिंग यांच्या दुसऱ्या पत्नीचे दुसरे अपत्य. त्यांना पाच सावत्र भाऊ व एक सख्खा भाऊ आहे. त्यांचा एक भाऊ शिक्षक तर दुसरा लष्करात सुभेदार आहे दोघांनाही कोणताच आकस्ताळेपणा नाही

त्याचे मोठे भाऊ जागीरसिंग व इतर नातलग लष्करी कारवाईच्या वेळी सुवर्णमंदिरातच होते.

जर्नेलसिंग याना पत्नी व इस्सर (१३) इंदरजित (११) अशी दोन मुले आहेत; परंतु नंतर त्यांच्याशी त्यानी फारसा संबंध ठेवला नाही. त्याच्या पंजाबातील आकर्षणाचा त्याच्याच गावात मागमूस नव्हता. गावकरी म्हणाले, 'लहानपणापासून नागरटीच्या कामात एकत्र होतो आम्ही–काय प्रभाव वाटणार आम्हाला!'

## □ फेमिनिस्ट पुस्तकांचे प्रदर्शन

(जूनपासून एक आठवडा लंडनमध्ये फेमिनिस्ट (स्त्रीवादी!) पुस्तकांचे पहिले जागतिक प्रदर्शन भरले होते त्यानंतर ब्रिटन व आयर्लंडमध्ये इतरत्र अशीच प्रदर्शने भरणार आहेत, यात परिसंवाद, वर्कशॉप, सभा हे प्रकार आहेत

सुमारे दहा–एक वर्षांपूर्वी स्त्रियांवरील पुस्तके प्रकाशित करणारी संस्था उभारली गेली सध्या ब्रिटनमध्ये ओन्ली वूमन प्रेस, शिबा फेमिनिस्ट पब्लिशर्स, स्ट्रॅमुलियन को–ऑप., वूमन्स प्रेस, व्हिरखो इत्यादी फेमिनिस्ट प्रकाशनसंस्था आहेत.

स्त्रियांसंबंधीच्या विषयाची ब्रिटन–अमेरिकेत दखल घेतली जात नाही असे नाही–रोमॅंटिक कादंबऱ्या, आपले माजघर, घर कसे ठेवावे, बागकाम–अशा अनेक तऱ्हेने स्त्रियांची दखल घेतली जाते.

मात्र फेमिनिस्ट (स्त्रीवादी) दृष्टिकोनाला पूर्णपणे बंदीच आहे याबाबत तेथील पत्रकारिताही 'सेन्सॉरशिप ऑफ सायलेन्स'चे धोरण पाळून आहे. फेमिनिझममुळे 'जैसे–थे' व्यवस्थेला धक्का बसतो, त्यामुळे त्याला दुर्लक्षित करावी अशी तेथील भावना. त्यामुळे स्त्रियांनी फक्त नारळाच्या वड्या करण्याची नवी पद्धत (वणकुद्रे–बर्वे–कारवारकर), आपली मुलं, सहजीवन, खर्च कैसे घटाएं, स्वेटरवरील डिझाइन यातच रस घ्यावा असे प्रयत्न होतच असतात! □

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28


# जानेवारी ते जून मधील दहा राजहंस प्रकाशने

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव
पुणे ४११ ०३०

## आपली मुलं
**शोभा भागवत** । वीस रुपये.

☐ आपली मुलं लहानाची मोठी होत असताना त्यांच्याकडे पाहण्याचा, त्यांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व देण्याचा दृष्टिकोन देणारं पुस्तक.

## फिडेल, चे आणि क्रांती
**अरूण साधू** । आवृत्ती दुसरी । बावीस रुपये.

☐ जुलमी राजवटींच्या टाचांखाली दडपल्या–चिरडल्या गेलेल्या लॅटिन अमेरिकन समाजाला नवी स्वप्ने देऊ करणाऱ्या एका क्रांतिचा इतिहास.

## तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय !
**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । वीस रुपये.

☐ विज्ञानातील अनेक आश्चर्यकारक नव्या गोष्टी, नवे प्रयोग तुम्हाला सोप्या भाषेत समजून–उलगडून दाखविणारे पुस्तक.

## विज्ञानेश्वरी
**डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । वीस रुपये.

☐ किचकट गणितांच्या आणि अवघड प्रमेयांच्या, दाट जंगलातून मूलभूत शास्त्रीय सिद्धांताच्या पाऊलवाटा शोधणारे– खास ललितशैलीतील पुस्तक.

## राजहंस विद्यार्थी दैनंदिनी
**सं. डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर** । पंधरा रुपये

☐ हसत-खेळत मुलांना विज्ञानयुगातील विरवल बनवणारी –शाळेतील अभ्यासाला पूरक अशी दैनंदिनी.

## बलसागर
**श्री. ग. माजगावकर** । तीस रुपये.

☐ राष्ट्रवादी भूमिकेतून नव्या क्षितिजांचा घेतलेला शोध.

## डॉ. आयडा स्कडर
**सौ. वीणा गवाणकर** । बावीस रुपये.

☐ ग्रामीण भागात डॉक्टरी सेवा नेण्याचा प्रयत्न भारतात प्रथम डॉ. आयडांनी केला. त्यांच्या त्यागमय जीवनाची कहाणी.

## पूर्णिया
**अनिल अवचट** । आवृत्ती तिसरी । बारा रुपये.

☐ अलिप्तपणे तरी भेदकतेने घडवलेले बिहारच्या माणसाचे दर्शन.

## लेक वालेसा
**डॉ. श्रीकांत मुंदरगी** । बावीस रुपये

☐ लेक वालेसा आणि पोलिश जनता यांनी रशियन दडपशाहीविरुद्ध दिलेल्या लढ्याचे चित्रण–मराठीत प्रथमच.

## मला निसटलंच पाहिजे !
अनु. **श्रीकांत लागू** । वीस रुपये

☐ इतिहासाच्या त्या धामधुमीच्या काळात, एका हुकुमशहाच्या मगरमिठीतून, जिवावर उदार होऊन, मृत्यूला पाठीशी घेत, ते निसटले व भारताच्या सुरक्षित भूमीत उतरले. त्यांच्या अतुलनीय साहसाची कथा.